CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १४ जून २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४१ वे अंक २१६ । पाने १२ । किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



**सोलापूर – भवानी पेठ** – राठी सिमेंट, **नई जींदगी** – एस.ए.बडेपीर, **वि.डी घरकुल** – वैष्णवी स्टील, **न्यु पाच्चा पेठ** – हारूण स्टील, **होटगी रोड** – एम.आर.सेल्स, **शेळगी** – शहा ट्रेडर्स, **सिध्देश्वर पेठ** – बेसकर ॲण्ड कंपनी, **कुर्डुवाडी** – श्री.गणेश स्टील, **सांगोला** – महालक्ष्मी स्टील सेंटर, **माढा** – तांबोळी स्टील ॲण्ड हार्डवेअर, **पिंपळनेर** – डिमांड ट्रेडर्स, **नातेपुते** – पोतेकर एंटरप्रायजेस, **पंढरपूर** – दुर्गा स्टील, **मांडवे** – बालाजी ट्रेडर्स, **टेभुंर्णी** – श्री साई ट्रेडर्स, **बार्शी** – भराडीया स्टील, **करमाळा** – शिवम स्टील, **अक्कलकोट** – माशाळे स्टील, **मोहोळ** – तलफदार स्टील, **कुरूल रोड** – श्री.भैरवनाथ स्टील ट्रेडर्स, **अकलुज** – चकेंश्वरा स्टील, **वैराग** – गांधी एजन्सी, **दहिटने** – एस. एस. मकंदर स्टील कॉर्पोरेशन, **जेऊर** – तांबोळी सिमेंट ॲण्ड मार्बल, **मरवडे** – सह्याद्री ट्रेडर्स, **मोडलिंब** – शिवाई ट्रेडर्स, **करकंब** – लक्ष्मी स्टील, **मंगळवेढा** – महालक्ष्मी ट्रेडर्स, **बेगमपूर** – सिध्दनाथ ट्रेडर्स, **वेळापूर** – रॉयल बिल्डींग सोल्युशन, **टाकळी** – गुरूकृपा ट्रेडर्स, **कंदलगाव** – श्री.केदारेश्वर हार्डवेअर ॲण्ड सिमेंट, **मुळेगाव** – आदित्य ट्रेडर्स, **महुद** – शेवाळे हार्डवेअर, **हुन्नूर** – लक्की ट्रेडर्स, **साळमुख** – त्रिमूर्ति स्टील, **माळशिरस** – अभिनंदन टाईल्स्, **मैंदर्गी** – खलील ट्रेडर्स, **वसंत विहार** – पूजा स्टील, **श्रीपुर** – शक्ती स्टील अँड किसान मॉल, **भोसे (क)** – पटेल स्टील, **कुरुल** – जगदंबा हार्डवेअर, **सोड्डी** – ओम ट्रेडर्स, **तडवळ** – स्वामी समर्थ ट्रेडर्स, **टाकळी सिकंदर** – लक्ष्मी टाईल्स, **नरखेड** – राहुल एंटरप्रायझेस, **जवळा**– आंद्रेश्वर स्टील सेंटर, **तांदुळवाडी**– साईराज ट्रेडींग कंपनी, **कोंडी**– तिरूपती बिल्डींग मटेरियल्स, **बाळे**– वर्धान ट्रेडर्स.

आयकॉन स्टील
टीएमटी बार

## विचारपुष्प



सर्वांवर प्रेम करणे, सर्वांना आपले मानणे, सर्वांना सोबत घेऊन चालणे, सत्यावर कायम राहणे, सत्य बोलणे आणि साधेपणा जपणे. या गुणांच्या आधारे चांगल्या वर्तनाचे काही सिद्धांत स्थापित करायचे आहेत, जसे की, सर्वांशी समान व्यवहार करणे. कोणत्याही व्यक्तीचे वय, पद, प्रतिष्ठेने प्रभावित न होता, प्रत्येकाशी समान व्यवहार करणे आपला प्रथम सिद्धांत आहे.

**- प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

# सर्व बोईंग ड्रीमलाईनरची उड्डाणपूर्वी होणार तपासणी

## नागरी विमान उड्डयन महासंचालनालयाचा आदेश




◆ **नवी दिल्ली, १३ जून**

अहमदाबाद येथून लंडनला निघालेले बोईंग ८८७ ड्रीमलाईनर विमान उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही मिनिटांच्या आतच विमानतळाजवळील वस्तीत इमारतीला धडकले. या अपघातात २४२ प्रवाशांसह २६५ जणांचा मृत्यू झाला. या भीषण अपघातानंतर जागे झालेल्या नागरी विमान उड्डयन महासंचालनालयाने देशातील सर्व बोईंग ८८७ ड्रीमलाईनर विमानांची उड्डाण करण्यापूर्वी सुरक्षा तपासणी करण्याचा दिला आहे.

एअर इंडियाच्या ताफ्यातील बोईंग ८८७ ड्रीमलाईनर विमानाला अहमदाबाद विमानतळाजवळ अपघात झाल्यानंतर या विमानांच्या सुरक्षेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहेत. २०१३ मध्येही याच कंपनीच्या विमानाला जपानमध्ये अपघात झाल्यानंतर नागरी विमान उड्डयन महासंचालनालयाने सुरक्षा तपासणीचे आदेश दिले होते. त्यामुळे उड्डाण करण्यापूर्वी सर्व विमानांची सुरक्षा तपासणी करावी, असा आदेश जारी करीत १५ जूनच्या मध्यरात्रीपासूनच हा आदेश बंधनकारक असल्याचे नमूद केले आहे.

उड्डाण करण्यापूर्वी सर्व पॅरामीटर्सचे योग्यरित्या तपासणी करावी लागणार आहे. ही प्रक्रिया पुढील आदेशापर्यंत सुरू ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. सोबतच दोन आठवड्यांच्या आता पॉवर ॲशुरन्स तपासणी बंधनकारक केली आहे. गेल्या १५ दिवसांत ड्रीमलाईनर विमानात आढळलेल्या समस्या आणि वारंवार आलेले बिघाड आदींचा आढावा घेऊन यासंदर्भातील अहवाल सादर करण्याचे आदेश नागरी विमान उड्डयन महासंचालनालयाने दिले आहेत. *(वृत्तसंस्था)*

### या यंत्रणांची तपासणी बंधनकारक

विमानाच्या उड्डाणापूर्वी महत्त्वाच्या तांत्रिक तपासणीचे निर्देश देण्यात आले. इंधन पॅरामीटर मॉनिटरिंग, केबिन एअर कॉम्प्रेसर सिस्टिम, इलेक्ट्रॉनिक इंजिन कंट्रोल टेस्ट, इंजिन फ्यूएल ॲक्चूएटर ऑपरेशन, ऑईल सिस्टिम आणि हायड्रोलिक सिस्टिम या यंत्रणांची चाचणी करणे बंधनकारक असल्याचे आदेशात म्हटले आहे.



## पंतप्रधान मोदींची घटनास्थळी भेट

◆ **अहमदाबाद, १३ जून**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी ज्या ठिकाणी एअर इंडियाचे विमान कोसळले त्या मेघानीनगर येथील घटनास्थळाला भेट दिली. अहमदाबाद येथील अपघातामुळे सर्वांना मोठा धक्का बसला आहे. अनेक जीव असे अकस्मात सोडून गेल्याने झालेले दुःख शब्दात व्यक्त करणे अशक्य आहे. ज्यांनी जवळचे आप्त गमावले आहेत त्यांना या दुःखातून बाहेर येण्यास अनेक वर्षे लागतील, अशा शब्दात पंतप्रधानांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

पंतप्रधानांनी रुग्णालयात जावून जखमींची भेट घेऊन विचारपूस केली. अपघातातून बचावलेले एकमेव प्रवासी रमेश विश्वास कुमार यांचीही विचारपूस केली. त्यानंतर विमानतळावर गुजसैल इमारतीत वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. *(वृत्तसंस्था)*

# विमानाचा ब्लॅक बॉक्स, डीव्हीआर सापडला

◆ **अहमदाबाद, १३ जून**

सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर लगेचच कोसळलेल्या आणि जवळच्या निवासी संकुलात अपघातग्रस्त झालेले एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलाईनर विमानाचा डिजिटल व्हिडिओ रेकॉर्डर अर्थात् डीव्हीआर आणि ब्लॅक बॉक्स शुक्रवारी ढिगाऱ्यात सापडला. अपघाताची कारणे शोधण्यासाठी हा एक अतिशय महत्त्वाचा पुरावा असून गुजरात एटीएसने तो फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीकडे तपासणीसाठी पाठविला आणि अपघाताची चौकशी सुरू केली आहे.

गुजरात एटीएस अधिकाऱ्याने सांगितले की, एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलाईनर एआय-१७१ विमान ज्या ठिकाणी कोसळले तेथील ढिगाऱ्यात आम्हाला डीव्हीआर सापडला. आम्ही तो ताब्यात घेतला असून तपासणीसाठी फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीकडे पाठविला आहे. घातपाताच्या संशयातून आम्ही प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.




मेघानी नगरमधील बीजे मेडिकल कॉलेजच्या यूजी हॉस्टेलच्या परिसरात विमानाचा अपघात झाला. अपघाताच्या काही मिनिटापूर्वी काय घडले याचे रहस्य डीव्हीआरच्या माध्यमातून उलगडले जाणार आहे. फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरीकडून अहवाल मिळाल्यावर घटनेच्या कारणाची माहिती समोर येईल. *(वृत्तसंस्था)*

## महत्त्वाचे

### बावनकुळे व बच्चू कडू यांच्यात सकारात्मक चर्चा

**अमरावती** : माजी मंत्री बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाची दखल घेऊन महसूल मंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी सायंकाळी मोझरी येथे धाव घेतली. बच्चू कडू यांच्यासोबत त्यांची सकारात्मक चर्चा झाली आहे. तत्पूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आपल्यासोबत बोलल्याचे बच्चू कडू यांनी सांगितले. शासनाने जे आश्वासन दिले आहे, त्यावर कार्यकर्त्यांशी चर्चा करून उपोषण सुरू ठेवायचे की नाही याचा निर्णय घेऊ असे बच्चू कडू यांनी जाहीर केले. आता त्यांच्या शनिवारच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष आहे. शेतकऱ्यांना वर्गवारीनुसार कर्जमाफी द्यावी लागणार आहे. त्यासाठी एक समिती स्थापन केली जाईल. त्या समितीत बच्चू कडू यांना निमंत्रित करून त्यांच्यासोबत घेऊन चर्चा केली जाईल. त्यानंतर समिती जो निर्णय देईल त्यानुसार आम्ही कर्जमाफी करू, असे स्पष्ट केले.

### पंढरीच्या दिशेने जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी चरण सेवा

**पंढरपूर** : पंढरपूरला जाणाऱ्या लाखो वारकऱ्यांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्षातर्फे चरणसेवा हा उपक्रम राबवण्यात येत आहे. राज्यातील नाशिक, जालना, सातारा, सोलापूर आणि पुणे या जिल्ह्यांमधून निघणाऱ्या पालख्यांमध्ये सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्य तपासणी, उपचार आणि चरणसेवा करण्यासाठी जवळपास ५ हजार वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तैनात करण्यात आले आहे. पायी चालत जाणाऱ्या वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार मुख्यमंत्री वैद्यकीय साहाय्यता कक्ष सज्ज करण्यात आला आहे. त्यांच्याद्वारे चरणसेवा उपक्रम राबवला जात आहे.

### विमान कोसळताच तापमान १००० अंशांपर्यंत

**अहमदाबाद** : अहमदाबादमध्ये गुरुवारी दुपारी एअर इंडियाच्या बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान कोसळल्यानंतर इंधनाने पेट घेतला आणि संपूर्ण परिसर आगीच्या विळख्यात आला. यामुळे विमानाच्या आत आणि आजूबाजूच्या परिसरातील तापमान सुमारे १,000 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. यामुळे अपघातस्थळापासून जवळपास पाचशे फूट अंतरावर असलेली झाडे, कुत्रे आणि पक्षी जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने घटनेच्या दाहकतेची माहिती देताना सांगितले की, ही घटना इतकी भीषण होती की, स्फोटानंतर परिसरातील तापमान हजार अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले होते. तापमानामुळ घटनास्थळी असलेले कुत्रे आणि पक्षीही आगीत कळून राख झाले.

# शेकडो इस्रायली विमानांचा इराणवर हल्ला

## ● कमांडर इन चीफ सलामीसह २० वरिष्ठ कमांडर ठार ● आण्विक, लष्करी तळे उद्ध्वस्त

◆ **तेहरान, १३ जून**

इराणच्या आण्विक आणि बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कार्यक्रमाविरोधात इस्रायलने ऑपरेशन रायझिंग लायन ही लष्करी मोहीम सुरू केली. या अंतर्गत शुक्रवारी पहाटे इराणची राजधानी तेहरान, शिराज आणि तबरीज शहरांसह नतांज या अण्वस्त्र ठिकाणांसह आयआरजीसी लष्करी मुख्यालयावर सुमारे शंभर लढाऊ विमानांनी एकाच वेळी हल्ले केले. यात इराणचे सशस्त्र दलाचे प्रमुख जनरल मोहम्मद बाघेरी आणि इस्लामिक रेव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स अर्थात् आयआरजीसीचे प्रमुख मेजर जनरल होसैन सलामी यांच्यासह २० वरिष्ठ लष्करी अधिकारी ठार झाले. याशिवाय सहा अणुशास्त्रज्ञांचा मृत्यू झाला.

या हल्ल्यात चार अणू केंद्रे आणि सहा लष्करी तळे आणि हवाई संरक्षण प्रणाली उद्ध्वस्त झाली असून अनेक इमारती जमीनदोस्त झाल्या. प्रत्युत्तरात इराणने इस्रायलच्या अनेक शहरांवर शंभर ड्रोन डागले. इराणचे सर्व ड्रोन हवेतच नष्ट केल्याचा दावा इस्रायलने केला आहे. हल्ल्यानंतर इराणची राजधानी तेहरानमध्ये जोरदार स्फोट झाले आणि शहरभर धुराचे लोट दिसून आले. हल्ल्यात इराणच्या शंभरपेक्षा अधिक लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याचा दावा इस्रायलने केला. प्रत्युत्तरात इराणने केलेल्या हल्ल्यानंतर इस्रायलचे संरक्षण मंत्री इस्राइल कात्झ यांनी संपूर्ण देशात विशेष आपत्कालीन स्थिती जाहीर केली आहे. शाळा, महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेशही देण्यात आले. दरम्यान भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने इराणमधील आपल्या नागरिकांना काळजी घेण्याचे आणि शक्य तितक्या लवकर मायदेशी परतण्याचे निर्देश दिले आहे.



इस्रायलने केलेल्या हल्ल्यात राजधानी तेहरानमध्ये इमारतीचे मोठे नुकसान झाले

**इस्रायलला पश्चात्ताप करावाच लागेल : मसूद पेजेशकियन**

इराणचे राष्ट्रपती मसूद पेजेशकियन यांनी देशाला संबोधित करताना म्हटले की, हल्ल्यात हवाई संरक्षण प्रणाली, लष्करी तळे आणि अण्वस्त्र ठिकाणांचे मोठे नुकसान झाले आहे. हल्ल्यात इराणचे लष्कर प्रमुख मोहम्मद बाघेरी आणि इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कोरचे कमांडर हुसैन सलामी यांचा मृत्यू झाला. *(वृत्तसंस्था)*

### आम्ही डोळे झाकून राहू शकत नाही : नेतान्याहू

पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, आम्ही कुठल्याही परिस्थितीत इराणला अण्वस्त्रे निर्माण करण्यापासून रोखू. इराणने इतके समृद्ध युरेनियम तयार केले आहे की ते नऊ अणुबॉम्ब तयार करू शकते. हे आपल्या अस्तित्वासाठी धोका आहे. आम्ही डोळे झाकून राहू शकत नाही. लष्कराचे ऑपरेशन रायझिंग लायन सुरूच राहणार आहे.

### कठोर शिक्षा भोगावी लागेल : खामेनी

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी म्हणाले, इस्रायलला कठोर शिक्षा भोगावी लागेल. इस्रायलचे हात रक्ताने माखलेले आहेत. त्यांनी आपल्या देशात गुन्हा केला आहे. निवासी केंद्रांवर हल्ला करून इस्रायलने आपला द्वेष उघड केला आहे. याला योग्य उत्तर दिले जाईल.

### कच्च्या तेलाचे दर भडकले

इस्रायलच्या इराणवर हल्ल्यानंतर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत १० टक्क्यांनी वाढ झाली. ब्रेंट क्रूड ऑईलची किंमत ६७ वरून ७८ डॉलर्स प्रति बॅरलवर पोहोचली. इराण हा जगातील तिसरा सर्वांत मोठा तेल उत्पादक देश आहे. इराणची भौगोलिक स्थितीदेखील खूप महत्त्वाची आहे. इराणच्या मार्गाने सौदी अरेबिया, कुवेत आणि इराकसारख्या देशांना तेल पुरवठा करण्याचा हा मार्ग आहे.



# सोलापुरात जोरदार पाऊस

- विविध ठिकाणी सखल भागात साचले पाणी
- काही भागांमध्ये वीज पुरवठा खंडित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

शहरात विजेच्या कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. शहरातील विविध ठिकाणी सखल भागात पाणी साचल्याचे चित्र पाहायला मिळाले. यामुळे वाहनांना वाहतुकीस अडथळा निर्माण झाला.

सोलापूर शहरात रात्री पावणे नऊच्या सुमारास विजेच्या कडकडांसह मुसळधार पाऊस झाला. वादळी वाऱ्यासह या पावसाने हजेरी लावले. मुरारजी पेठ, निराळे वस्ती, अवंती नगर, वसंत विहार, नई जिंदगी परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, सम्राट चौक परिसर, सैफुल परिसर, विजापूर रोड, पाच्छा पेठ, कन्ना चौक, साखर पेठ, जमखंडी पुल यासह शहरातील विविध भागांमध्ये जोरदार पाऊस बरसला. या पावसामुळे शहरातील विविध ठिकाणी सकल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले होते. रस्त्यावर पाणी साचल्याने वाहनांना ये - जा करण्यात अडचणी निर्माण झाल्या. काही नगरांमध्ये अचानक लाईट गेल्याने नागरिकांची मोठी गैरसोय झाली. दरम्यान, महापालिका आपत्कालीन मदत केंद्राशी संपर्क साधला असता पावसामुळे कोणतीही हानी झाल्याची तक्रार अद्याप रात्री दहा वाजेपर्यंत आली नसल्याचे सांगण्यात आले.


# प्रभाग रचनेसाठी पालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत


## अतिरिक्त आयुक्त कारंजेंसह सहा अधिकाऱ्यांचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

महापालिका आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचना तयार करण्याचे काम सुरु झाले असून आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली ६ जणांची समिती स्थापन करण्यात आली आहे.

या समितीमध्ये महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगररचना संचालक मनिष भिष्णुरकर, सहाय्यक आयुक्त गिरीश पंडित, विभागीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता महेश क्षिरसागर, संगणक विभाग प्रमुख स्नेहल चपळगावकर आणि अनुरेखक जयंत भोसले यांचा समावेश आहे. ही समिती निवडणूक आयोगाने दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे प्रभाग रचना तयार करणार आहे. ११ जूनपासून कामकाजाला सुरुवात झाली असून पहिल्यांदा २०११ च्या जनगणनेची माहिती घेतली जाणार आहे. येणारी निवडणूक २०११ च्या जनगणनेप्रमाणे होणार आहे. चार सदस्यीय प्रभाग रचना असून नगरसेवकांची संख्या १०२ असणार आहे. २०१७ मध्ये म्हणजे याआधीची निवडणूक ज्या पध्दतीने घेण्यात आली त्याच पध्दतीने येणारी निवडणूक होणार आहे.





# जीव मुठीत धरून तिने धुरातून काढली वाट...

## अकोल्याच्या ऐश्वर्याचा थरारक अनुभव

◆ **अकोला, १३ जून**

दुपारची वेळ, कॉलेजच्या वसतिगृहात ती होती. अचानक भला मोठा आवाज आला व धुरांचे अक्षरशः मोठमोठे लोट पाहायला मिळाले. काहीतरी विपरीत झाल्याचे कळताच तिने स्वतःला सावरत ब्लँकेटच्या साह्याने थेट पाचव्या मजल्यावरून पायऱ्यांनी तळमजला गाठला. या इमारतीला देखील आग लागली होती. हा थरारक अनुभव अकोल्याच्या ऐश्वर्याने अनुभवला. दैव बलवत्तर म्हणून तिचे प्राण वाचले.



अहमदाबादवरून लंडनकडे निघालेल्या एअर इंडियाच्या विमानाला गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास अपघात झाला. या भीषण अपघातात शेकडो जणांचे बळी गेले. दरम्यान, या अपघाताची प्रत्यक्षदर्शी राहलेली अकोल्याची ऐश्वर्या तोष्णीवाल ही थोडक्यात बचावली. विमानाचा अपघात झाला तेव्हा ऐश्वर्या वसतिगृहात पाचव्या मजल्यावर आपल्या खोलीत होती.

वसतिगृहाच्या इमारतीवर विमान कोसळल्यावर इतर इमारतींना आग लागली. यातून मार्ग काढत ऐश्वर्याने जीव वाचवला. तिच्या या धाडसाचे कौतुक होत आहे. ऐश्वर्या ही अहमदाबादच्या बीजे मेडिकल कॉलेजच्या ऑन्कोपॅथॉलॉजी विभागात पदवीत्तर पदवीचे शिक्षण घेत आहे. घटनेच्या दिवशी सकाळीच ती अकोल्यावरून अहमदाबादला पोहोचली होती. या घटनेचा तिला धक्का बसला असला, तरी ती सुखरूप असून, तिच्या कुटुंबातील सदस्य अहमदाबादला शुक्रवारी रवाना झाले असल्याची माहिती अमोल तोष्णीवाल यांनी 'तरुण भारत'शी बोलताना दिली. *(तभा वृत्तसेवा)*

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्वाचे...



## शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचा वर्धापन दिन साजरा

**सोलापूर, दि. १३ जून-**

श्री एस. एस. शेळके प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय, वागदरी येथे श्री परमेश्वर विद्यावर्धक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री एस. एस. शेळके प्रशालेचा ५८ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या निमित्ताने प्रतिमांचे महापूजन संस्थेचे ज्येष्ठ संचालक माणिकराव नीलगार व चनबसय्या स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन बसवराज शेळके सावकार, सचिव मल्लप्पा निरोळी, माजी चेअरमन मल्लिनाथ शेळके, संचालक भाऊराव पाटील, कनिष्ठ महाविद्यालय अध्यक्ष रविकिरण वरनाळे, संचालक सिद्धाराम कलबुर्गी, संचालक बसवणप्पा ढवणे, सदस्य निंगप्पा दुधगी, प्रशालेचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक यमाजी, जावळे, बागवान, स्वामी, प्रशालेचे मुख्याध्यापक देशमुख, पर्यवेक्षिका जाधव उपस्थित होते.



## भाविकांच्या सेवेला वटवृक्ष मंदिर समितीचे प्राधान्य

### आमदार बाबूराव कदम : समितीने केला सत्कार

**अक्कलकोट, दि. १३ जून-**

श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे कार्य हे सेवाभावी वृत्तीने व समर्पित कार्याने चालते, म्हणून भाविकांच्या सोई सुविधांना व भाविकांच्या सेवेला वटवृक्ष मंदिर समितीचे नेहमीच प्राधान्य असल्याचे मनोगत नांदेड जिल्ह्यातील हदगांव-हिमायतनगर मतदार संघाचे विद्यमान आमदार बाबूराव कदम यांनी व्यक्त केले. त्यांनी नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी आ. बाबूराव कदम व त्यांच्या समवेत असलेले मिलींद कुलकर्णी, रमेश तावडे, नांदेडचे युवा सेना जिल्हा प्रमुख संदेश पाटील, शहरप्रमुख बबन माळवदे, अरविंद जाधव यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा, देऊन यथोचित सन्मान केला. आमदार कदम यांनी ही धन्य सेवा पाहून स्वामी सेवेप्रती असलेल्या मंदिर समितीच्या कार्याचा आपल्याला अभिमान असल्याचे मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी प्रथमेश इंगळे, मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, अमर पाटील, विपूल जाधव, संतोष जमगे आदींसह भाविकभक्त उपस्थित होते.

## वधू-वर परिचय सेवेनिमित्त संजय पाटील यांचा उद्या सत्कार



**मंगळवेढा, दि.१३ जून -**

श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याच्या कामगार पतसंस्थेचे माजी व्हाईस चेअरमन संजय अण्णासो पाटील व त्यांच्या सुविद्य पत्नी यांनी आजपर्यंत लिंगायत समाजातील वधू-वर परिचय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. त्यानिमित्त त्यांचा सत्कार १५ जून रोजी लातूर येथे व्हीआयपी इव्हेंट २०२५ लिंगायत वधू वर परिचय मध्ये माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील ठाकूर यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याचे शिवा लिंगायत युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष दयानंद पाटील यांनी सांगितले आहे. त्यांच्या होणाऱ्या सत्कार निमित्त कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील, कामगार पतसंस्थेचे चेअरमन विश्वास सावंजी, कामगार संघटनेचे सर्व पदाधिकारी व सर्व कामगारांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## 'देऋब्रा' संस्थेत आज अर्थसहाय्यसह शैक्षणिक साहित्य वाटप कार्यक्रम

**सोलापूर, दि.१३ जून-**

येथील देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेच्यावतीने दहावी बारावीतील गुणवंताचा सत्कार तसेच गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्यासह शैक्षणिक साहित्याचे वाटप शनिवारी दि.१४ जून रोजी सायंकाळी पाच वाजता दत्त चौकातील संस्था सभागृहात करण्यात येणार असल्याची माहिती उपाध्यक्ष विजय कुलकर्णी यांनी दिली. सोलापूर शहर परिसरातील ब्राह्मण समाजातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना संस्थेतर्फे दरवर्षी अर्थसहाय्य तसेच शैक्षणिक साहित्याचे वाटप केले जाते. दहावी व बारावी परिक्षेत उत्तम यश संपादन केलेल्यांचा यथोचित सन्मान केला जातो. यंदाही ८५ टक्केपेक्षा अधिक गुण संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. याशिवाय इयत्ता पहिली ते दहावीतील शालेय तसेच अकरावीच्या पुढील महाविद्यालयील व उच्च महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अर्थसहाय्याचे व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

## निधन वृत्त...

### आनंद देशपांडे



**सोलापूर, दि. १३ जून-**

महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा जुळे सोलापूर चे कोषाध्यक्ष असलेले आनंद देशपांडे ( वय ६३) यांचे शुक्रवार १३ जून रोजी सकाळी १०.३० वाजता पुणे येथे निधन झाले.

### तुकाराम गायधनकर



**सोलापूर, दि. १३ जून-**

सैफुल, विजापूर रोड येथील तुकाराम सिद्राम गायधनकर (वय ८६) यांचे शुक्रवारी १३ जून सकाळी ७ वाजता आकास्मित निधन झाले. सायंकाळी त्यांच्या पार्थिवावर मोदी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, चार मुली, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार मनोज होटकर यांचे ते सासरे होत.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक प्रक्रियेला सुरुवात

### प्रभागरचना निश्चित करण्याच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून -**

सोलापूर जिल्हा परीषदेतील सदस्यांचा कालावधी मार्च २०२२ मध्ये संपला आहे. तीन वर्षांपासून जिल्हा परिषदेत प्रशासक राज आहे. ओबीसी आरक्षणासह इतर अडचणीमुळे सरकारकडून निवडणूक पुढे ढकलण्यात येत होते. ओबीसी आरक्षण मुद्दा प्रलंबित असल्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका पुढे ढकलण्यात येत होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने लोकभावनेचा आदर करीत व प्रलंबित विकासकामांना चालना देत चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांचे पदाधिकारी होणाऱ्या इच्छुकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे. सर्वच पक्षाच्या नेत्यांकडून न्यायालयाच्या आदेशाचे स्वागत करण्यात आले असून निवडणूकीची तयारी करण्यात येत आहे. सर्वच पक्षांकडून स्वबळावर निवडणूक लढविण्याचे संकेत दिले जात आहेत. तर काही वेळा युती व आघाडीच्या माध्यमातून निवडणूक लढविणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र आता निवडणूक प्रक्रियेला सुरूवात झाली असून प्रभाग रचना निश्चित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका चार महिन्यात घेण्यात येणार असल्याने सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी झेडपी व पंचायत समितीच्या सदस्य व प्रभाग रचना निश्चित करण्याचा कार्यक्रम जाहीर करावा, असे आदेश महाराष्ट्र शासनाचे उपसचिव व्ही एम भरोसे यांनी गुरुवार १२ जून रोजी दिले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने सहा मे रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत आदेश पारित केला आहे. या आदेशानुसार राज्याच्या सहसचिवांनी राज्यातील ३२ जिल्हा परिषद व ३३६ पंचायत समितीच्या सदस्य संख्या व प्रभाग रचना करण्यासंदर्भात आदेश पारित केले आहेत. संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गण सदस्य संख्या व प्रभाग रचना करण्यासंदर्भात अधिसूचना जारी करावी. प्रभाग रचना करण्यासंदर्भात अधिकारांचे आदेश काढावेत व प्रभाग रचना कार्यक्रम व वेळापत्रक जाहीर करावे असे या आदेशात नमूद करण्यात आले आहे. या आदेशानुसार सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील निवडणूक शाखेतर्फे जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य संख्या व प्रभाग रचना करण्याचा कार्यक्रम लवकरच जाहीर होणार आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती मेंबर होऊ इच्छिणाऱ्यांना आता तयारी करावी लागणार आहे.

### इच्छुकांकडून तयारी सूरू

तीन वर्षापासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक प्रक्रियेला सुरूवात झाली आहे. आजपासून जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रभाग व गणरचना निश्चितीस सुरुवात होणार आहे. त्यामुळे निवडणूक निश्चित गृहीत धरून इच्छुकांकडून निवडणूकीची तयारी सूरू करण्यात येत आहे.

### असा असणार प्रभागरचना निश्चित कालावधी

प्रभाग रचना अधिसूचना प्रसिध्द.. १४ जून
हरकती व सूचना सादर.. २१ जून
हरकती व सूचना आयुक्तांकडे सादर .. २८ जून
आयुक्तांनी हरकती व सूचनांवर निर्णय देणे.. ११ ऑगष्ट
अंतिम प्रभाग रचना मंजूरी.. १८ ऑगष्ट

### तालुकानिहाय जिल्हा परिषद गण व गट

२०१७ मधील सोलापूर जिल्हा परिषद ६८ गण व पंचायत समिती १३६ गट

| तालुका | गण | गट |
|---|---|---|
| करमाळा | ६ | १२ |
| माढा | ७ | १४ |
| बार्शी | ६ | १२ |
| उत्तर सोलापूर | ३ | ६ |
| मोहोळ | ६ | १२ |
| पंढरपूर | ८ | १६ |
| माळशिरस | ९ | १८ |
| सांगोला | ७ | १४ |
| मंगळवेढा | ४ | ८ |
| दक्षिण सोलापूर | ६ | १२ |
| अक्कलकोट | ६ | १२ |

## कोरोनाग्रस्तांना ॲडमिट होण्याची गरज नाही : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ जून -**

महाराष्ट्रामध्ये कोरोनाचे रुग्ण अजूनही सापडत असून यामध्ये गेल्या काही दिवसांत काहीशी वाढ झाल्याचेही दिसत आहे. आषाढी वारी तोंडावर आली असून या पार्श्वभूमीवर काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही असे महाराष्ट्राचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटले आहे.

आरोग्यमंत्री आबिटकर हे शुक्रवारी (ता.१३ जून ) पंढरपूर दौऱ्यावर आलेले होते. यावेळी त्यांना कोरोनाच्या वाढत्या प्रसाराबद्दल विचारण्यात आले. यावेळी त्यांनी आपल्याला कोरोनाचे सध्या नक्की किती रुग्ण आहेत याची माहिती नसल्याचे सांगितले.

आषाढी पालखी सोहळ्याला सुरूवात होण्यापूर्वी अकलूज आणि माळीनगर इथे चार संशयित कोरोना रूग्ण आढळून आले आहेत. त्यामुळे चिंता वाढलेली असताना आरोग्यमंत्र्यांनी कोरोनाबाबत केलेल्या विधानांमुळे आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आबिटकर यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, कोरोना आता पूर्वीसारखा राहिलेला नाही.

सध्याच्या कोरोनाची लक्षणे सौम्य प्रकारची आहेत. त्यामुळे कोरोनाला फारसे गांभीर्याने घेण्याची गरज नाही आणि कोरोना झाला तरी कुठे ही रुग्णालयात जाण्याची गरज नाही.

### आकडे बोलतात

दरम्यान महाराष्ट्रात सध्याच्या घडीला ६२९ कोरोनाग्रस्त असून काल १४ रुग्णांची भर पडली होती.१ जानेवारी २०२५ पासूनची आकडेवारी पाहिल्यास कोरोनाची लागण झालेले आणि त्यातून बरे झालेले किंवा रुग्णालयातून डिस्चार्ज मिळालेले एकूण १ हजार १६२ रुग्ण होते. कालच्या तुलनेत बऱ्या झालेल्या रुग्णांची संख्या ९८ ने वाढली आहे. भारतातील कोरोनाच्या रुग्णांबद्दल बोलायचे झाल्यास सध्या कोरोनाची लागण झालेल्या रुग्णांची संख्या ७ हजार १३१ इतकी असून १० हजार ९७६ रुग्णांना आतापर्यंत डिस्चार्ज देण्यात आला आहे किंवा ते बरे झाले आहेत.

## चौफाळा ते मंदिर आरोग्यमंत्री गेले चालत

### नो व्हेईकल झोन चा परिणाम; पायी जात घेतले विठ्ठल दर्शन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि-१३ जून**

पंढरपूरातील मंदिर परिसरातील नो व्हेईकल झोन आदेशामुळे राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंदिरापर्यंत काही अंतर चक्क चालत जात श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिर समितीकडून उपलब्ध वाहनांस नकार देत एक चांगला पायंडा निर्माण केला.



मंदिर समितीच्या वतीने समितीचे ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर यांनी आरोग्य मंत्री श्री आबिटकर यांचा शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार केला. यावेळी समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके,आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवार, अतिरिक्त संचालक डॉ. संदीप सांगळे, आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकिशन पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुहास माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीकांत कुलकर्णी, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. महेश सुडके उपस्थित होते. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी चौफळा ते श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर व मंदिर परिसर वाहन प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या अनुषंगाने मंत्री तसेच राज शिष्टाचार नुसार अति महत्त्वाच्या व्यक्तींसाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी मंदिर समितीमार्फत वाहनांची उपलब्धता करण्यात आली आहे. परंतु सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री.आबिटकर यांनी मंदिर व मंदिर परिसरात भाविकांची मोठ्या प्रमाणात असणारी गर्दी लक्षात घेता भाविकांना कोणताही वाहतुकीचा त्रास अथवा अडथळा निर्माण होऊ नये यासाठी चौफाळा ते मंदिरापर्यंत दर्शनासाठी चालत जाणे पसंत केले.



## सह्याद्रीच्या कॅम्पसमधून १४६ विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१३ जून-**

सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी, मेथवडे, ता.सांगोला येथे कॅम्पस रिकरुटमेन्ट ड्राईव्हमधून रिलायन्स फार्मा पीव्हीटी, एलटीडी मुंबई, एजिओ फार्मासुटिकल पुणे या नामांकित फार्मा कंपन्यांमध्ये मेथवडेच्या ४१ तर इतर ८ फार्मसी कॉलेजच्या १०५ विद्यार्थ्यांची वरील कंपन्यांमध्ये निवड झाली असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले यांनी दिली.

याचे उदघाटन एजीवो फार्मासुटिकलचे एचआर विश्वनाथ पाटोळे, रिलायन्स फार्मासुटिकलचे एचआर गोपाळ आवळे, अद्वित सर्विसेस प्रशिक्षणचे संतोष स्वामी, निर्माण संस्थेचे राहुल आरे, डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते झाले. मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्रांचे वाटप करण्यात आले. डॉ. इंगवले, डॉ. मनोजकुमार पाटील यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.स्वप्नील मोरे, सूत्रसंचालन डॉ.औदुंबर माळी यांनी केले. कॅम्पस यशस्वी करण्यासाठी कॉलेज ट्रेनिंग व प्लेसमेंट ऑफिसर प्रा.एस.एस.काळे व प्रा.एस.पी.जोकार यांचे योगदान लाभले.

## घरात घुसून ४० वर्षीय विवाहितेचा केला विनयभंग

### चौघांविरुध्द गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि.१३ जून-**

एक ४० वर्षीय विवाहित महिला भावाच्या घरी एकटी असल्याची संधी साधून तू मला खूप खूप आवडतेस तु माझे सोबत चल असे म्हणून विवाहितेस जवळ ओढून शरीराशी झोंबाझोंबी करत लज्जा वाटेल असे कृत्य करुन शिवीगाळी, दमदाटी केल्या प्रकरणी राहुल लक्ष्मण बनसोडे, लक्ष्मण महादेव बनसोडे, गंगूबाई महादेव बनसोडे, गौरी राहुल बनसोडे या चौघांविरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील ४० वर्षीय विवाहित महिलेच्या पतीला दारुचे व्यसन असल्याने सदर फिर्यादी ही गेली २० वर्षापासून माहेरी भावाकडे राहते. दि.९ जून रोजी सकाळी ७.३० वाजता फिर्यादीच्या कुटूंबातील भाऊ व इतर लोक शेतातील कामामुळे घरातून शेतातकडे गेले होते. तर फिर्यादी ही एकटीच घरात असल्याची संधी साधून आरोपी राहुल बनसोडे याने घरी येवून घरातील मानसे कोठे गेली आहेत? घरात कोणीच दिसत नाही? असे विचारले. त्यावेळी फिर्यादीने शेताच्या कामामुळे सर्वजण शेतात गेले असून स्वयंपाक करण्यासाठी मी घरी थांबली आहे असे सांगितले.

त्यावेळी आरोपीने जवळ येवून फिर्यादीचा हात पकडून तू मला खूप खूप आवडतेस तू माझेसोबत चल असे म्हणून जवळ ओढून मिठीत घेण्याचा प्रयत्न करीत असताना फिर्यादीने त्यास बाजूला हो असे म्हणत असताना तुझे घरकूलचे बांधकाम पैसे नसल्यामुळे थांबले आहे ते पैसे मी तुला देतो असे म्हणून फिर्यादीच्या अंगाला झोंबाझोंबी करु लागला त्यावेळी फिर्यादीने जोरात ओरडल्यामुळे आरोपीने जाताना फिर्यादीच्या गळ्यातील दीड तोळ्याचे सोन्याचे घंटण घेवून निघून गेला व जाताना घडल्या प्रकाराबाबत कोणाला बोलू नको जर बोललीस तर तुला जीवंत सोडणार नाही अशी धमकी देवून पळून गेला. फिर्यादी ही घाबरली असल्यामुळे तिने भावास व भावजयीस फोन करुन ही घटना कथन करताच सदर दोघेजण घरी आले व सदरच्या घटनेबाबत जाब विचारण्यासाठी आरोपीकडे गेले असता वरील नमूद आरोपींनी शिवीगाळ करुन हातातील काठीने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस करीत आहेत.

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) च्या जिल्ह्याध्यक्षपदी वसंतराव देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगांव, दि.१३ जून-**

पंढरपूर तालुक्यातील कासेगांव येथील वसंतराव देशमुख यांची राष्ट्रवादी काँग्रेस(शरद पवार) गटाच्या जिल्ह्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

वसंतराव देशमुख पंढरपूर तालुक्यातील जेष्ठ नेते आहेत. त्यांचा जनसंपर्क मोठा आहे. त्यांना नियुक्तीबाबतचे पत्र माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहीते-पाटील व खासदार धैर्यशील मोहीते पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

या वेळी आमदार उत्तमराव जानकर, व्यापारी सेलचे प्रदेश अध्यक्ष नागेश फाटे आदींसह जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवडीनंतर कासेगांव येथे वसंतराव देशमुख यांच्या समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला.





## तांदुळवाडीच्या सुयश विद्यालयात प्रवेशोत्सव उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१३ जून**

सुयश विद्यालयात तांदुळवाडी येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे ढोल ताशांच्या गजरात, पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांवर फुलांचा वर्षाव करत स्वागत केले.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटन पांगरी पोलीस स्टेशनचे पीआय हेमंत काटकर, संस्थापक शिवदास नलावडे, बप्पा बोकेफोडे व मुख्याध्यापक प्रदीप शिर्के यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप शिर्के यांनी केले. नवीन विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता. तसेच लहान मुलांना आकर्षण असणाऱ्या मोटू पतलू (कार्टून) जोडीने मुलांचे स्वागत केले. विद्यार्थ्यांना चॉकलेट, फुगे देण्यात आले. खेळण्यासाठी चिल्ड्रन पार्क तयार करण्यात आला असून यामध्ये लहान मुलांचे खेळण्याचे विविध साहित्य आहे.

सूत्रसंचालन गणेश मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी प्रयत्न केले.

सोलापूर तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा



# विखुरलेले अवशेष... आप्तजनांचा आक्रोश आणि सुन्न करणारी भीषणता...!








१२ जून रोजी गुरुवारी दुपारी एअर इंडियाच्या विमानाचा अहमदाबाद विमानतळानजीक भीषण अपघात झाला आणि त्याची भीषणता खऱ्या अर्थाने दुसऱ्या दिवशी समोर आली. पहिल्या दिवशी मृतदेहांचे सांगाडे, सामान, विमानाचे अवशेष उचलण्याचे काम झाले. मात्र, दुसऱ्या दिवशीपर्यंत पोहोचलेले मृतांचे नातेवाईक आणि आप्तजनांचा आक्रोश संपूर्ण घटनास्थळ हादरवून सोडणारा होता. केवळ एकाच्या आश्चर्यकारक बचावानंतर उर्वरित सर्वांचे मृतदेह शोधण्याचे काम वेगाने सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अहमदाबादला भेट दिली. स्वतः त्यांनीदेखील घटनास्थळाची भीषणता पाहून शब्दात वर्णन न करता येणारी भीषणता, अशा शब्दात आपली संवेदना व्यक्त केली. विमान अपघातात दगावलेले कोणी आपल्या स्वगृही परतत होते, कोणी नातेवाईकांना भेटायला जात होते, कोणी शिकायला तर कोणी कायम वास्तव्याच्या इराद्याने भारत सोडून निघाले होते. दगावलेल्या २४१ जणांपैकी प्रत्येकाची एक कथा होती आणि त्यांच्या नातेवाईकांचे दुःख अपार होते. आम्हाला नुकसान भरपाई नको तर आपला गेलेला स्वजन परत द्या हो... असा आक्रोश संपूर्ण परिसरात पसरला आणि अपघाताच्या भयावहतेने प्रत्येक पाहणाऱ्याला कापरे भरले. ■



## विमान अपघातात देशाने गमावलेले नेते...



गुजरातमधील विमान अपघातात २६५ जणांचा मृत्यू झाला. दुर्दैवाने त्यात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांचाही समावेश होता. रूपाणी यांच्याआधी देशाने विमान अपघातात अनेक मोठे नेते गमावले आहेत.

### होमी जहांगीर भाभा



देशातील महान शास्त्रज्ञ होमी जहांगीर भाभा यांचेही एअर इंडियाच्या विमान अपघातात निधन झाले होते. २४ जानेवारी १९६६ रोजी एअर इंडियाच्या फ्लाईट १०१ ला अपघात झाला.

### संजय गांधी



इंदिरा गांधी यांचे पुत्र आणि काँग्रेस पक्षाचे दिग्गज नेते संजय गांधी यांचेही विमान अपघातात निधन झाले होते. ही दुर्घटना २३ जून १९८० रोजी घडली.

### माधवराव शिंदे



देशाचे माजी रेल्वेमंत्री माधवराव शिंदे यांचे ३० सप्टेंबर २००१ रोजी कानपूर येथे एका राजकीय रॅलीला जात असताना विमान अपघातात निधन झाले.

### जीएमसी बालयोगी



तेलुगू देशम पार्टीचे नेते आणि लोकसभा अध्यक्ष जीएमसी बालयोगी यांचे ३ मार्च २००२ रोजी अपघाती निधन झाले. त्यांना घेऊन जाणाऱ्या खाजगी हेलिकॉप्टरने आंध्रप्रदेशातील कृष्णा जिल्ह्यातील कोल्लेरू क्रेगियनमधील कोव्वादलंका गावात आपात्कालीन लँडिंग करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांचे हेलिकॉप्टर क्रॅश झाले.

### वायएस राजशेखर रेड्डी



आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री वायएस राजशेखर रेड्डी यांचे विमान अपघातात निधन झाले होते. २ सप्टेंबर २००९ साली खराब हवामानामुळे त्यांच्या हेलिकॉप्टरचा अपघात झाला. फोटो दोरजी खांडू

### दोरजी खांडू



३० एप्रिल २०११ रोजी अरुणाचल प्रदेशचे मुख्यमंत्री दोरजी खांडू यांचे हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. त्यांचे पवन हंस हेलिकॉप्टर जमिनीवरील नियंत्रणाशी संपर्क तुटल्याने अपघातात पडले. पाच दिवसांनंतर, तवांगमध्ये विमानाचा अवशेष सापडले होते.

### ओपी जिंदल आणि सुरेंद्र सिंह




प्रसिद्ध उद्योगपती आणि हरयाणाचे ऊर्जामंत्री ओपी जिंदल आणि कृषीमंत्री सुरेंद्र सिंह २००५ मध्ये हेलिकॉप्टर अपघाताचे बळी ठरले. त्यांचे किंग कोब्रा हेलिकॉप्टर दिल्लीहून चंदीगडला जात असताना, उत्तरप्रदेशातील सहारनपूर येथे अपघात झाला होता. यामध्ये दोघांचाही मृत्यू झाला.

### सीडीएस बिपीन रावत



देशाचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ (सीडीएस) जनरल बिपीन रावत देखील अशाच अपघाताचे बळी ठरले. ८ डिसेंबर २०२१ रोजी सीडीएस बिपीन रावत हेलिकॉप्टरने सुलूरमधील वेलिंग्टनला जात होते, त्या दरम्यान त्यांचे हेलिकॉप्टर तामिळनाडूतील कुन्नूर येथे कोसळले. त्यांची पत्नी आणि इतर ११ लोकही विमानात होते. ■

## फुटपाथवर झोपलेल्या चिमुकल्याची झाली राख

### भाजलेला मृतदेहच लागला हाती



विमान अपघातात केवळ प्रवाशांनीच आपले प्राण गमावले नाहीत, तर ज्या परिसरात अपघात झाला, तेथील लोकांनाही याची झळ बसली. यात सात वर्षीय निष्पाप आकाशचे नाव देखील समाविष्ट आहे. आयुष्यात कधीही विमान प्रवास न केलेला आकाश या अपघाताचा बळी ठरला आणि त्याच्या आईला केवळ त्याची राख मिळाली. आकाशची आई पुष्पा आता राखेतच आपल्या मुलाला शोधत आहे.

घराचे भाडे देण्यास उशीर झाल्याने पुष्पा व त्यांच्या कुटुंबाला घरमालकाने बाहेर काढले. रस्त्यावर आलेल्या कुटुंब बीजे मेडिकल कॉलेज हॉस्टेलजवळील फुटपाथवर राहत होते. त्यांनी फुटपाथवरच चहाची टपरी सुरू केली होती. गुरुवारी पुष्पा चहाच्या टपरीवर असताना सात वर्षांचा आकाश फुटपाथवरील झाडाखाली सावलीत झोपलेला होता. विमान कोसळल्यानंतर झालेल्या स्फोटाच्या विळख्यात आकाश आला आणि झोपेतच त्याचा मृत्यू झाला. त्याच्या अंगावर इमारतीचा ढिगारा कोसळला. गुरुवारी रात्री त्याचा भाजलेला मृतदेह मिळाला. त्याचा चेहराही ओळखू येत नव्हता मात्र त्याच्या हातात असलेल्या तांब्याच्या कड्याने त्याची ओळख पटली. मुलाचा मृतदेह पाहून आईने टाहो फोडला. एकुलत्या एक मुलगा गमावलेल्या आईकडे आता केवळ आकाशच्या आठवणी उरल्या आहे. ■


### आईने गमावला एकुलता एक मुलगा

## लोखंडही वितळले; भगवद्गीता सुरक्षित!

विमान अपघाताशी संबंधित भयानक छायाचित्रे आणि व्हिडीओ समोर येत असतानाच समाजमाध्यमांवर एक व्हिडीओ व्हायरल होत आहे. यामध्ये बचाव दलाच्या हातात एक भगवद्गीता दिसते आहे. एखाद्या प्रवाशाने आपल्यासोबत हा पवित्र ग्रंथ ठेवला असावा, असा अंदाज वर्तविला जात आहे.

एअर इंडियाचे ड्रीमलाईनर विमान पेटल्यानंतर आता अपघाताची भीषणता समोर आली आहे. अगदी जिथे दूरवर अंतरावरील पक्षीही होरपळून गेले, रस्त्यावरील कुत्र्यांचेही सांगाडे झाले, त्या ठिकाणी उष्णतेची तीव्रता अंदाज लावता येणार नाही इतकी भीषण होती. या उष्णतेच्या तडाख्यात आलेले सारे काही जळून खाक झाले. मात्र, भगवद्गीता सुरक्षित राहिली. याचे एक पानही जळालेले नाही. अगदी वाचता येण्याच्या स्थितीत ही प्रत दिसते आहे.

यावरून नेटकऱ्यांनी आश्चर्य व्यक्त केले असून अनेक प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी याला चमत्कार संबोधले आहे. ■



## दरवाजा तुटला अन् सीटसह खाली पडलो...

### वाचलेल्या प्रवाशाने सांगितली आपबिती

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी शुक्रवारी अहमदाबादमधील विमान अपघातातील एकमेव वाचलेले रमेश विश्वास कुमार यांची भेट घेतली. रमेश अपघातात जखमी झाले आहेत आणि त्यांना सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

रमेश यांनी डीडी न्यूजला सांगितले की, पंतप्रधानांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली आणि अपघात कसा झाला, याची विचारपूस केली. रमेश विमानाच्या सीट क्रमांक ११ अ वर बसले होते. अपघातानंतर ते स्वतः अपघातस्थळावरून बाहेर आले.

रमेश म्हणाले, मला विश्वासच बसत नाहीये की मी जिवंत कसा बाहेर आलो. त्यांनी सांगितले की, विमान कोसळताच त्यांच्या बाजूचा दरवाजा तुटला. मग त्यांनी त्याचा सीटबेल्ट काढला आणि बाहेर पळून गेले. सगळं माझ्या समोर घडलं. ते कसं घडलं ते मला माहीत नाही. मी जिवंत कसा बाहेर आलो, यावर माझा विश्वासच बसत नाही. काही क्षण मला वाटलं की मी मरणार आहे. जेव्हा मी डोळे उघडले तेव्हा मला वाटलं की, मी जिवंत आहे. मला वाटलं की, मी इथून बाहेर पडू शकेन आणि मी बाहेर पडलो. ■



अपघातातून वाचलेला एकमेव प्रवासी रमेश विश्वास कुमारची विचारपूस करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी

## अपघातात अनेक प्रवाशांच्या स्वप्नांची राखरांगोळी

**अहमदाबादमध्ये गुरुवारी दुपारी एअर इंडियाचे बोईंग ७८७ ड्रीमलायनर विमान कोसळले. या अपघातात १६९ भारतीयांनी, ५२ ब्रिटिश, ७ पोर्तुगीज आणि एका कॅनेडियन नागरिकाने जीव गमावला आहे. मृतांच्या अनेक हृदयद्रावक आणि शेवटच्या कथा समोर आल्या आहेत.**

### १ डॉक्टर दाम्पत्य आणि तीन मुलांचा मृत्यू

अपघाताच्या वेळी बांसवाडा येथील डॉक्टर दाम्पत्य डॉ. कोमी व्यास आणि डॉ. प्रतीक जोशी, त्यांच्या तीन मुलांसह प्रद्युत, मिराया आणि नकुल हे विमानात होते. डॉ. प्रतीक लंडनमधील एका खाजगी रुग्णालयात रुजू होणार होते आणि डॉ. कोमीही तिथे नवीन नोकरीत रुजू होणार होत्या. त्यामुळे ते तिन्ही मुलांसोबत लंडनला स्थलांतरित होण्यासाठी विमान प्रवासात होते. मात्र या पाचही जणांचा या अपघातात मृत्यू झाला. अपघातापूर्वीचा कुटुंबाचा एक सेल्फी समोर आला आहे.



### २ चार महिन्यांपूर्वी झाले होते खुशबूचे लग्न



राजस्थानातील बालोत्रा जिल्ह्यातील रहिवासी खुशबू कंवर तिच्या पतीला भेटण्यासाठी लंडनला जात होती. तो तिथे डॉक्टर आहे. खुशबूचे लग्न अवघ्या चार महिन्यांपूर्वी म्हणजे १८ जानेवारीला झाले होते. तिने घरून विमानतळावर जाताना हा व्हिडीओ रेकॉर्ड केला होता. यामध्ये खुशबू भावनिक दिसत असून ती तिच्या पालकांना, भावंडांना आणि नातेवाईकांना हात जोडून गाडीत बसून निरोप देते आहे.

### ३ बहीण-भाऊ देणार होते लंडनला भेट

उदयपूर येथील संगमरवरी व्यापारी संजीव मोदी यांचा मुलगा शुभ आणि मुलगी शगुन हे देखील विमानात होते. ते लंडनला सहलीसाठी जात होते. भाऊ आणि बहीण एमबीए पूर्ण केल्यानंतर त्यांच्या वडिलांचा व्यवसाय सांभाळत होते.



### ४ पत्नी आणि मुलाला आणण्यासाठी जात होता अभिनव

बिकानेरमधील श्रीदुंगरगडचे माजी आमदार किशन राम नाई यांचे नातू अभिनव परिहार यांचेही विमान अपघातात निधन झाले. ते लंडनमध्ये व्यवसाय करत होते. अभिनव यांनी पाच दिवसांपूर्वीच अहमदाबादमध्ये व्यापार व्यवसायासाठी एक कार्यालय सुरू केले होते आणि ते भारतात येणार होते. त्यांची पत्नी श्वेता आणि मुलगा विहान यांना लंडनहून भारतात आणणार होते.



### ५ लग्नासाठी आलेल्या सादिकाबेन मुलीसह परतत होत्या

अपघातात मृत्यू झालेल्यांमध्ये वडोदराच्या वाडी परिसरातील सेठवाला कुटुंबातील दोन सदस्यांचा समावेश आहे. सादिकाबेन मोहम्मद मियां सेठवाला आणि त्यांची अडीच वर्षांची मुलगी फातिमा ब्रिटनहून मेहुण्याच्या लग्नासाठी वडोदरा येथे आल्या होत्या. त्यांना सकाळी सासू, आईवडील आणि भाऊ अहमदाबाद विमानतळावर निरोप देण्यासाठी आले होते.



### ६ वडिलांचे अंतिम संस्कार करून परतत होता

या अपघातात लॉरेन्स डॅनियल ख्रिश्चनचाही मृत्यू झाला. तो लंडनमध्ये काम करायचा. लॉरेन्स त्याच्या वडिलांच्या अंत्यसंस्कारासाठी गुजरातमधील मणिनगर येथे आला होता. तो लंडनला परतत होता. त्याची आई त्याला विमानतळावर सोडण्यासाठी आली होती. ही भेट त्यांची शेवटची ठरली.



### ७ एअर होस्टेसचा तो संदेश ठरला शेवटचा

विमान अपघातात एअर होस्टेस नगांथोई शर्मा कोंगब्रैलाटपम यांचा मृत्यू झाला. नगांथोई ही मणिपूरमधील अवांग लेकेई येथील रहिवासी होती. नगांथोईची आई घाबरलेल्या अवस्थेत अल्बम उलटत माझी मुलगी कुठे गेली, अशी आर्त हाक देत होती. परिसरात इंटरनेट बंदी असल्याने व्हिडीओ चॅट करू शकत नव्हती. तिने मेसेज केला की ती लंडनला जात आहे आणि आता आम्ही संपर्क करू शकणार नाही. तिने सांगितले की, ती १५ जून रोजी परत येईल. हा तिचा बहिणीला पाठवलेला शेवटचा संदेश होता.



### ८ आग्र्याचे जोडपे जाणार होते फिरायला

विमान अपघातात आग्रा येथील दाम्पत्याचा मृत्यू झाला. नीरज लवानिया आणि त्यांची पत्नी अपर्णा लवानिया हे आग्र्याच्या अकोला शहरातील रहिवासी होते. नीरज वडोदरामध्ये एका खाजगी कंपनीत काम करत होता. तो अनेक वर्षांपूर्वी तिथे शिफ्ट झाला होता. तो त्याची पत्नी अपर्णा यांना लंडनला सहलीसाठी घेऊन जात होता. त्यांचा १० दिवसांचा दौरा होता.



### ९ क्रू मेंबर दीपकने आईला पाठवला शेवटचा संदेश



ठाण्यातील रहिवासी दीपक पाठक हे देखील विमानात क्रू मेंबर म्हणून उपस्थित होते. अपघातापूर्वी त्यांनी त्यांच्या आईला फोन करून गुड मॉर्निंग म्हटले होते. तो त्याच्या आईशी दोन मिनिटे बोलला. दीपक गेला हे स्वीकारायला त्याची आई तयार नाही.

### १० वृद्ध जोडपे जात होते मुलाला भेटायला

महाराष्ट्रातील सोलापूर येथील वृद्ध जोडपे महादेव पवार आणि त्यांची पत्नी आशा हे त्यांच्या मुलाला भेटण्यासाठी लंडनला जात होते. महादेव गुजरातच्या एका कापड गिरणीत काम करत होते. त्यांना दोन मुले आहेत. एक अहमदाबादमध्ये आणि दुसरा लंडनमध्ये राहत होता. लंडनमध्ये राहणाऱ्या त्यांच्या मुलाला भेटून बराच काळ झाला होता. हे जोडपे बऱ्याच दिवसांपासून या क्षणाची वाट पाहत होते. हे जोडपे मुलाला भेटण्यासाठी खूप उत्साहित होते. तर दुसरीकडे मुलगाही त्यांची वाट पाहत होता. ■



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## अग्रलेख...

# ‘त्यांच्या’ स्वप्नांची राखरांगोळी

अहमदाबादच्या सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून गुरुवारी लंडनसाठी उड्डाण करताच एअर इंडियाचे बोईंग विमान कोसळले. या विमानात २३० प्रवासी, १० क्रू मेंबर आणि २ पायलट असे २४२ जण होते. यातील एक प्रवासी वगळता उर्वरित २४१ जणांचा अतिशय हृदयद्रावक मृत्यू झाला. हे विमान विमानतळानजीकच्या बी. जे. मेडिकल कॉलेजच्या वसतिगृहावर कोसळले. त्यामुळे काही डॉक्टर, काही शिकाऊ डॉक्टर यांचाही दुर्दैवी मृत्यू झाला. यामुळे या विमान दुर्घटनेतील मृतांची संख्या २६५ झाली आहे. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्यामुळे बळींची संख्या आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अपघातग्रस्त विमान बोईंग कंपनीचे होते. त्यांचे विमान आगीचा गोळा झाला. अपघाताचे दृश्य नंतर वृत्तवाहिन्यांच्या पडद्यावर पाहून अंगाचा थरकाप उडाला. हे विमान उड्डाण घेतल्यानंतर काही मिनिटांतच मेघानीनगर भागात असलेल्या एका वैद्यकीय महाविद्यालयाच्या वसतिगृहावर कोसळले. भोजनाची सुटी झाली असल्यामुळे अनेक डॉक्टर्स, शिकाऊ डॉक्टर्स तेथे जेवायला आले होते. पण काही कळण्याआधी म्हणजे हातातला घास तोंडात पोहोचायच्या आधीच त्यांना आपला जीव गमवावा लागला. भरल्या ताटावरूनच नाही तर भरल्या आयुष्यातून या सर्वांना उठावे लागले. रुग्णांच्या सेवेसाठी, त्यांचा जीव वाचवण्यासाठी अतिशय नोबेल असा वैद्यकीय व्यवसाय हौसेने स्वीकारणाऱ्या या शिकाऊ डॉक्टर्सच्या नशिबात रुग्णसेवेचे भाग्य नव्हते, यातील काहींवर तर स्वतःच रुग्ण होण्याची वेळ आली. नियतीची चेष्टा यालाच म्हणत असावे. या विमानात जसे भारतीय प्रवासी होते, तसेच ब्रिटन आणि अन्य काही देशांचेही प्रवासी होते. आपला हा प्रवास शेवटचा आहे, अशी कल्पनाही त्यातील कोणी केली नसावी. कारण आजच्या काळात विमानप्रवास हे कोणासाठीच अप्रूप राहिले नाही. त्यामुळे प्रत्येक जण आपल्या डोळ्यात नवे स्वप्न, नवी आशा आणि नवा उत्साह घेऊन निघाला होता. एकीकडे त्यांच्या मनात मायभूमी सोडून जाण्याचे दुःख जसे होते, तसे नव्या जीवनाची सुरुवात करण्याचे स्वप्नही होते. पण या सगळ्यांची स्वप्नं जागच्या जागीच राहिली. क्षणभरात सर्वांच्या स्वप्नांचीच नाही तर त्यांची स्वतःचीही शब्दशः राखरांगोळी झाली. क्षणभर विचार करण्याची आणि स्वतःला वाचवण्याची संधीही कोणाला मिळाली नाही. जिवंतपणी या सगळ्यांचा अंत्यसंस्कार झाला. मृत्यू डोळ्यासमोर दिसत असताना शेवटच्या क्षणाला हे सगळे लोक कसे सामोरे गेले असतील, त्यांच्या मनात कोणता विचार आला असेल, या कल्पनेनेही अंगाचा थरकाप उडतो. ज्यांच्या आयुष्याची सुरुवातही झाली नव्हती, अशा अनेक लहान मुलांचाही या भीषण दुर्घटनेत करुण अंत झाला. नियतीच्या या क्रूर चेष्टेने संपूर्ण जग हादरले आहे. विमानाने लंडनच्या दिशने उड्डाण केल्यानंतर त्यात बसलेले प्रवासीही स्वप्नांच्या झोपाळ्यावर विराजमान होत कधीच लंडनला पोहोचले होते. यातील प्रत्येकाचे लंडनला जाण्याचे उद्दिष्ट वेगळे होते. कोणाला शिकायला जायचे होते, तर कोणाला नोकरीसाठी, कोणाला आपल्या जीवलगाला भेटायचे होते, तर कोणाला तेथे आपल्या नवीन आयुष्याची सुरुवात करायची होती. त्यासाठी सर्व जण आपल्या मायभूमीचा जड अंतःकरणाने निरोप घेऊन निघाले होते.

गुजरातचे माजी मुख्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते विजय रुपानी यांचाही या अपघातात अंत झाला. आपल्या मुलीला भेटण्यासाठी रुपानी लंडनला चालले होते. पण आता ते आपल्या मुलीला तसेच त्यांची मुलगी आपल्या पित्याला कधीच भेटू शकणार नाही. विजय रुपानीसारखे असे अनेक दुर्दैवी पिता या विमानात असतील. ‘देव तारी त्याला कोण मारी’ या उक्तीचा परिचय देणारी घटनाही घडली. ब्रिटनमधील भारतीय वंशाचे रमेश विश्वासकुमार या अपघातातून आश्चर्यकारकरीत्या बचावले. त्यामुळे मारणाऱ्यापेक्षा वाचवणारा श्रेष्ठ असतो, याचा प्रत्यय येतो. मूळचे नागपूरकर असलेल्या यशा कामदार, त्यांच्या मुलीचा आणि सासूचा या अपघातात मृत्यू झाला असला तरी त्यांचे पती मात्र वाचले आहेत. पासपोर्टमधील काही त्रुटीमुळे त्यांना विमानात चढता आले नाही. त्यामुळे आपण जगल्याचा आनंद मानावा की आपले संपूर्ण कुटुंब दगावल्याचे दुःख अशी त्यांची संभ्रमित मानसिकता झाली असेल. विमानतळावर पोहोचायला दहा मिनिटे उशीर झाल्यामुळे एका प्रवाशाचाही जीव वाचला.

या विमान अपघाताची उच्चस्तरीय चौकशी सुरू झाली आहे. अपघातग्रस्त विमान ज्या बोईंग कंपनीचे होते, त्या कंपनीनेही चौकशीत सहकार्य करण्याची तयारी दर्शवली आहे. अपघात कसा झाला, का झाला, याची उत्तरे विमानातील ब्लॅकबॉक्समधून मिळतील. या चौकशीचा अहवाल काहीही असला तरी ज्यांनी आपले मौल्यवान जीव या अपघातात गमावले, ते कधीच परत येऊ शकणार नाही. एअर इंडियाचे संचालन करणाऱ्या टाटा कंपनीने अपघातातील मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. केंद्र सरकार आणि गुजरात सरकारही मृतांच्या कुटुबीयांना मदत जाहीर करू शकते. मात्र अशी कितीही आर्थिक मदत झाली तरी ज्यांनी आपले जीवलग गमावले, काहींनी आपले माता-पिता, काहींनी पत्नी, काही महिलांनी आपले सौभाग्य, काहींनी मुलं तर काहींनी आपले संपूर्ण कुटुंब गमावले, त्यांची भरपाई जगातील कोणतेच सरकार करू शकणार नाही, यात शंका नाही. हा अपघात की घातपात याचा आता शोध घेतला जाईल. मात्र विमानाचा ज्या पद्धतीने अपघात झाला, ते पाहता हा घातपात असल्याची शक्यता जास्त वाटते. या विमान अपघाताने वर्ल्ड ट्रेड सेंटरमधील विमानाने घडवलेल्या अतिरेकी हल्ल्याची काहीशी आठवण झाली. समाज माध्यमातून घातपाताची शक्यता वर्तवणाऱ्या काही बातम्या येत आहेत. मात्र त्यावर विश्वास ठेवता येत नाही. एनआयएकडे या अपघाताचा तपास सोपवण्यात आला आहे. या अपघातानंतर मानवी मनांची विसंगती दाखवणाऱ्या काही घटना समोर आल्या, त्या विषण्ण करणाऱ्या आहेत. अपघातानंतर जो मलबा खाली कोसळला, त्यातून एका महिलेचे धडविरहित नुसते शिर बाहेर फेकले गेले. तर त्या शिरासोबत काहींनी सेल्फी काढून आपल्या मनातील विकृतीचे घडवलेले दर्शन धक्कादायक असे म्हणावे लागेल. अशा लोकांना माणूस तरी कसे म्हणावे असा प्रश्न पडतो. रेल्वे अपघातानंतर जखमींना मदत करण्याऐवजी त्यांचे सामान, त्यांच्याजवळील मौल्यवान वस्तू पळवण्याच्या अनेक घटना आपल्याकडे घडल्या आहेत. अनेक वेळा तर प्रेताच्या टाळूवरील लोणी खावे तसे मृत व्यक्तीच्या हातातील अंगठी, गळ्यातील साखळी, महिला असतील तर त्यांच्या गळ्यातील मंगळसूत्र आणि अन्य दागिने हिसकवून पळ काढणारे नराधमही आपण पाहिले आहेत. माणसामध्ये वासना आणि वात्सल्य या दोन भावना असतात. या दोन्ही भावना विशेषतः वासनेची भावना मर्यादित ठेवायची असते. ही भावना अनावर झाली, त्यावर नियंत्रण ठेवता आले नाही तर अनर्थ घडतो. त्यामुळे संस्काराचे महत्त्व आहे.

माणुसकीला काळिमा फासणाऱ्या अशा घटना मोजक्या असल्या तरी घडल्या आहेत, दुसरीकडे माणुसकीचे दर्शन घडवणाऱ्या दिलासाजनक काही घटनाही समोर आल्या. दुर्घटनेनंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्वयंसेवकांनी घटनास्थळी धाव घेत मदत आणि बचावकार्यात आपले योगदान दिले. जखमी लोकांसाठी रक्तदान करत रक्ताची तसेच अन्य आवश्यक गोष्टींची व्यवस्था केली. देशात कुठेही नैसर्गिक आपत्ती आली, पूर आला, भूकंप झाला, तर अनेक वेळा स्थानिक प्रशासन जागे व्हायच्या आधी रा. स्व. संघाचे स्वयंसेवक धावून जातात. संघाचे स्वयंसेवक सेवा, समर्पण आणि संस्काराचे अनुकरणीय उदाहरण म्हटले पाहिजे. विमान अपघातातील कारणांचा शोध घेऊन पुन्हा असे भीषण अपघात घडणार नाहीत, याची काळजी घेण्याची जबाबदारी विमान कंपन्यांसोबत सरकारचीही आहे. मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करेल, अशी अपेक्षा आहे. हा विमान अपघात देशातील शेवटचा विमान अपघात ठरेल, अशी अपेक्षा आपण करायची का?

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# पुरुषांनाही समजून घ्या...

नुकतीच वटपौर्णिमा साजरी झाली आहे. अनेक स्त्रियांनी आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी व्रत केलं आहे. मात्र वटपौर्णिमेच्या काही दिवस आधीच एक भयावह प्रकरण उघडकीस आलं. मेघालय हनिमून मर्डर हे प्रकरण सध्या गाजत आहे आणि यात नवनवीन खुलासे होत आहेत. सोनम रघुवंशी या महिलेने तिचा पती राजा रघुवंशीला मारण्यासाठी २० लाख रुपयांची सुपारी दिली. इंदूरमध्ये खुनाचा डाव रचण्यात आला आणि मेघालयात राजा रघुवंशीचा खून करण्यात आला. त्यानंतर सोनमही गायब झाली होती. तिलाही मारलं आहे असा बनाव करण्यात आला. मात्र नंतर ती सापडली आणि सत्य समोर आलं. राज कुशवाह या प्रियकरासोबत तिने हा कट रचला. सध्या पत्नीने पतीचा खून केल्याची प्रकरणे समोर येत आहेत. खरं सांगायचं तर पत्नीने पतीवर अत्याचार केल्याची किंवा खून केल्याची प्रकरणे खूपच कमी आहेत.

नॅशनल क्राईम रेकॉर्ड्स ब्युरोच्या अहवालानुसार, पतीने किंवा त्याच्या नातेवाईकाने केलेल्या खुनाची किंवा अत्याचारांची ३९९६ प्रकरणे आहेत. मात्र पत्नीने केलेले अत्याचार याचे व्यवस्थित आकडे सापडलेले नाहीत. त्यामुळे तुलनेने अशी प्रकरणे कमी असण्याची शक्यता आहे किंवा अनेक प्रकरणांची नोंद नसल्याचीही शक्यता आहे. २०२४-२५ मध्ये सांगली, मेघालय, उत्तरप्रदेशात अशी मोठी प्रकरणे समोर आली आहेत. मात्र यावरून सबंध महिला वर्गाला दोष देणे चुकीचे आहे. सोशल मीडियावर महिला वर्गाला लक्ष्य करणारे पोस्ट्स फिरत आहेत. ज्यात ‘‘इतकी वर्षे महिलांवर बंधने का लादली कळले ना? त्यांना मोकळं सोडलं तेव्हा यांचे गुण दिसू लागले.’’ खरंतर अशा द्वेषपूर्ण वक्तव्याची गरज नाही. कोणावरही बंधने घालणे चूकच आहे. पुरुष वर्गाने महिला वर्गाचा आदरच करायचा आहे. महिला वर्गानेही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की पूर्वी त्यांना प्रचंड त्रास सोसावा लागला असेल, आजही काही महिला बळी पडत असतील म्हणून ‘‘पुरुषी मानसिकता’’ हा शब्दप्रयोग वापरणे देखील चुकीचे आहे. आधुनिक काळात आपण महिलांच्या स्वातंत्र्याची, त्यांच्या इच्छा-आकांक्षांची, त्यांच्या हक्कांची इतकी चर्चा केली की पुरुष हा सर्व बाबतीत दुर्लक्षितच राहिला आहे. जगभरात जर आपण नजर फिरवली तर लक्षात येईल की सर्व महिलांवर घर चालवण्याचा, कमावण्याचा तसा दबाव नसतो. याचा अर्थ महिला काम करून कमावत नाहीत का? तर असं नव्हे. महिला उत्तम करीअर घडवत आहेत. कुटुंबाचा भारही सांभाळत आहेत. मात्र भारतात तरी अजूनही पुरुषाने घर चालवायचं आणि सगळी सुखं आपल्या पत्नीच्या चरणांवर अर्पण करायची अशी पद्धत आहे. हुंडा प्रथा ही जितकी वाईट तितकीच विपरीत-हुंडा प्रथाही वाईट आहे. लग्न करताना मुली मुलांकडून ज्या अपेक्षा करतात त्या विपरीत-हुंडा प्रकारात मोडतात. त्यामुळे आजच्या घडीला केवळ पुरुषाला दोष देता येत नाही. कधी आपण विचार केला आहे का की करीअर करण्यासाठी पुरुषावर किती दबाव असतो? वयात आला की लगेच करीअरची चिंता, मग नोकरी लागल्यावर फ्लॅट घेण्याचा दबाव, त्या कर्जाचे हप्ते फेडता फेडता तारुण्य निघून जातं. त्यात बायकोला समजून घेण्याचं, तिला सुखी ठेवण्याचं सामाजिक दडपण आणि मुलांना चांगलं आयुष्य देण्याचा दबाव. या सर्वांमध्ये पुरुषाचं सँडविच होत असतं. त्यामुळे आता स्त्री-पुरुषांना समान अधिकार आहेत असं म्हणत असताना खरोखरंच पुरुषांच्या अधिकारांकडे, त्यांच्या मानसिक भावनेकडे डोळसपणे पाहण्याची वेळ आली आहे.

तुम्हाला बंगळुरुच्या इंजिनीअरचे प्रकरण आठवत असेल. ज्यात त्याने २४ पानांची सुसाईड नोट लिहिली होती व ८१ मिनिटांचा व्हिडीओ प्रसिद्ध केला होता. पत्नी आणि तिच्या घरच्या लोकांच्या छळाला कंटाळून त्याने आत्महत्या केली. पत्नीने त्याच्याविरुद्ध हुंडा घेतल्याची खोटी तक्रार केली होती. घटस्फोट घेताना ३ कोटी रुपयांची मागणी करण्यात आली आणि लहान मुलासाठी ३० लाख मागण्यात आले होते. या अत्याचाराला कंटाळून त्याने आत्महत्या केली. आता इतके पैसे तो कुठून आणणार? महिलांना मिळणारी पोटगी हा त्यांचा अधिकार आहे. महिला घर सांभाळतात, घटस्फोट घेतल्यानंतर त्यांचा उदरनिर्वाह सुरळीत व्हावा म्हणून केलेली ही तरतूद आहे. परंतु आता महिला याचा गैरफायदा घेत असल्याचे दिसत आहे. मोहित यादव या उत्तर प्रदेशातील तरुणानेही पत्नीला कंटाळून आत्महत्या केली. असेच मध्य प्रदेशातील सुभम व्यास प्रकरण, ज्यात त्याची पत्नी आणि सासू मालमत्ता त्यांच्या नावावर करण्यासाठी दबाव आणत होते. एनसीआरबीनुसार २०२२ मध्ये १,१८,००० पुरुषांनी आत्महत्या केली आहे आणि यापैकी सुमारे ३३ टक्के म्हणजेच ३९,००० प्रकरणे कौटुंबिक वादाशी संबंधित आहेत. अर्थात महिलांनी छळ केल्यामुळे अशा आत्महत्या झाल्या आहेत, याचे आकडे उपलब्ध नाहीत. त्यामुळे थेट आरोप करणे चुकीचे आहे. मात्र काही प्रकरणे ठळकपणे दिसत आहेत. पुरुषांच्या खुनाच्या प्रकरणात खासकरून विवाहबाह्य संबंध समोर येत आहेत. सगळ्यात भयावह प्रकरण म्हणजे मेरठ उत्तर प्रदेश येथील मुस्कानने साहिल शुक्ला या प्रियकरासोबत मिळून पती सौभव राजपूतची हत्या केली. त्याचं प्रेत ड्रममध्ये भरण्यात आलं होतं.

मेघालय हनिमून मर्डरवरून पुरुष वर्ग चिडलेला आहे. लग्नाआधी जर मुलीचं कुणावर प्रेम असेल तर ते प्रेम मिळवण्यासाठी पतीची हत्या करण्याची काय गरज आहे? त्यापेक्षा पतीला याबद्दल सांगितलं तर सहज मार्ग निघू शकेल. हे खरं आहे की घरच्या दबावामुळे मुलीला दुसऱ्याच मुलाशी लग्न करावं लागतं. पण याचा अंत एका निष्पाप मुलाचा बळी देऊन नाही ना होऊ शकणार? विवाहबाह्य संबंध सामाजिकदृष्ट्या गुन्हा मानले जात असले तरी यातून चर्चा करून मार्ग काढला जाऊ शकतो. पतीपासून सुटकाच मिळवायची असेल तर सरळ सांगून टाकणं कधीही श्रेयस्कर आहे. परंतु महिला खुनाचा मार्ग अवलंबत आहेत. अशा कृत्यामुळे तुम्हाला तुमचं प्रेम तर मिळत नाहीच, तुरुंगात आयुष्यभर सडावं लागतंच मात्र एक जीव सुद्धा जातो. जर मुलं असतील तर त्यांचं आभाळ कोसळतं. चांगलं बालपण मिळालं नाही तर भविष्यही चांगलं घडत नाही.

लक्षात घ्या एकवेळ माणूस गरिबीतून वर येईल. मात्र आई-वडिलांची गलिच्छ भांडणे, आत्महत्या, खून या मानसिक धक्क्यातून बाहेर पडणं सोपं नसतं. आपण आता अत्यंत आधुनिक युगात जगत आहोत. या युगात आपल्याला महिलांच्या भावविश्वाचा जसा विचार करायचा आहे तसा पुरुषांच्या बाबतीतही करायचा आहे. ‘‘पुरुषी मानसिकता’’ या हिणकस शब्दाच्या पलीकडे आपल्याला जावं लागणार आहे. पुरुषालाही मन असतं, त्याच्या डोळ्यांतही साठवलेले व कोरडे झालेले अश्रू असतात, त्याचे मूड्स देखील स्विंग्स होतात. बऱ्याचदा त्याच्या हातात असलेल्या व्हिस्कीच्या ग्लासात तो आपलं दुःख विसर्जित करतो. मात्र स्त्री-पुरुष समानता म्हणताना आता आपल्याला पुरुष नव्याने समजून घ्यावा लागणार आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# मोफत उपचारांची अंमलबजावणी गरजेचे!

असं म्हटलं जातं की, कितीही पैसा कमाविला तरी एका आजाराला देखील पुरू शकत नाही. याचा अर्थ आपल्याला एखादा दुर्धर आजार जडल्यास त्याचा इलाज किंवा उपचार एवढा महाग असतो की, आयुष्यभराची जमापुंजी त्यावर खर्च होते. तरीही माणूस हाती लागेल की नाही याची कोणीही शाश्वती देऊ शकत नाही. एखाद्याला कर्करोग, हृदयविकार, मूत्रपिंड निकामी होणे इत्यादी प्रकारापैकी एखादा आजार जडला की, त्यावर मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. या आजारांवरील उपचार देखील खूप महाग झाले आहेत. यासाठीच केंद्र आणि राज्य सरकारने आयुष्मान, मुख्यमंत्री सहायता निधी इत्यादी आरोग्य विषयक योजना सुरू केल्या आहेत. या योजनांची अंमलबजावणी अधिक कठोरतेने करणे आवश्यक आहे.

अनेकदा रुग्णाची प्रकृती एकदम खालावते. त्याला दवाखान्यात नेल्यावर डॉक्टर पुढील उपचारासाठी अकोला, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगरला घेऊन जाण्यास सांगतात. १०८ क्रमांकाची रुग्णवाहिका शासकीय असल्याने मोफत मिळते. पण, वरील शहरातील खाजगी रुग्णालयात रुग्ण नेल्यावर तेथील रिसेप्शनिस्ट सांगतात की, आधी किमान १० हजार रुपये भरा. त्याशिवाय रुग्णाला दाखल करून घेत नाहीत. रुग्णाचे नातेवाईक त्यांच्या गावातील दवाखान्यातून परस्पर रुग्ण घेऊन आलेले असतात. त्यांना रुग्णाला त्वरित दुसऱ्या शहरात हलवावे लागेल याची कल्पना देखील नसते. अशावेळी ते त्यांच्याकडे असलेले आयुष्मान कार्ड किंवा इतर केंद्र, राज्य सरकारच्या योजनेचे कार्ड दाखवितात. पण, रिसेप्शनिस्ट त्याकडे पाहतही नाही. पैसे भरावेच लागतील, असे सांगण्यात येते. मग, पैशाची जमवाजमव करून नातेवाईक त्यांच्याकडे पैसे भरतात. त्यानंतर रुग्णाची तपासणी केली जाते. मग, सर्व चाचण्या पुन्हा कराव्या लागतात. त्याच्या खर्च वेगळा. शिवाय, डॉक्टर फक्त तपासणी करतात. गोळ्या, औषध, इंजेक्शन, सलाईन, सलाईनची सीरिंज, सुईपासून सर्व रुग्णाच्या नातेवाईकांना बाहेरून आणावे लागते. मग, सर्व चाचण्यांचे अहवाल प्राप्त झाल्यावर डॉक्टर आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया करण्यास सांगतात. त्याचा खर्च वेगळा. एखाद्याला हृदयविकाराचा धक्का बसल्यावर त्याला रुग्णालयात नेल्यावर डॉक्टर तपासणी करून त्याची ॲन्जिओग्राफी किंवा ॲन्जिओप्लास्टी करण्याचा सल्ला देतात. अशा रुग्णाकडे शासकीय योजनेचे कार्ड असले तरीही त्यांना हा उपचार कोणत्या शहरातील कोणत्या रुग्णालयात केला जातो, याची माहिती नसते. शासकीय अधिकारी, कर्मचारी आपल्या व आपल्या परिवारासाठी आरोग्य विमा काढतात. पण, प्रत्यक्षात जेव्हा, रुग्णाला दवाखान्यात नेले जाते त्यावेळी त्या रुग्णालयाचे प्रशासन त्यांना प्रथम पैसे भरा. आम्ही तुम्हाला सर्व बिले देऊ. तुम्ही नंतर ती विमा कंपनीकडे पाठवून परतावा मिळवा. विमाधारक परतावा मिळविण्यासाठी विमा कंपनीकडे त्याचा विमा प्रस्ताव पाठवितो. त्या प्रस्तावाची विमा कंपनीची समिति छाननी करते व उपचारावर प्रत्यक्षात झालेल्या खर्चापैकी काही टक्के खर्च कपात करून उर्वरित खर्च विमाधारकाला दिला जातो. यामुळे नोकरदार मध्यमवर्गीयांना देखील अनेक आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागते. गोरगरीब, शेतकरी, यांना तर शासकीय आरोग्य योजनांची अगदी जुजबी माहिती असते. त्यामुळे त्या योजनांचा लाभ कसा मिळवावा याची माहिती त्यांना दिली गेली पाहिजे. शासनाने सुरू केलेल्या आरोग्य विषयक योजनांची कठोर अंमलबजावणी होण्यासाठी विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. अनेकदा हर्नियावरील शस्त्रक्रिया करण्यासाठी खाजगी डॉक्टर शासकीय रुग्णालयात जाण्याचा सल्ला देतात. पण, यामुळे शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण वाढतो. याचा देखील विचार झाला पाहिजे. काही खाजगी रुग्णालयाचे प्रशासन तर आमच्या रुग्णालयात कोणत्याही शासकीय योजनेंतर्गत उपचार होत नसल्याचे अगदी हमखास सांगतात. अशा रुग्णालयांची चौकशी करून तेथे शासकीय मोफत आरोग्य योजनांचा लाभ रुग्णांना देणे बंधनकारक केले पाहिजे. तसेच, आयुष्मान, मुख्यमंत्री सहायता निधी इत्यादी शासकीय योजनांचे कार्ड ज्या रुग्णांकडे आहे त्यांना खाजगी असो की, शासकीय रुग्णालयात कोणतेही शुल्क न आकारता उपचार मिळाले पाहिजेत. तसेच, खाजगी रुग्णालयात उपचार झाल्यावर त्यांच्याकडून शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यावर त्याला त्वरित मंजुरी देऊन त्या रुग्णालयाला त्यांचे बिल तातडीने पाठविण्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. तसे झाले तरच केंद्र आणि राज्य शासनाने सुरू केलेल्या मोफत आरोग्य योजनांचा लाभ तळागाळातील रुग्णांना घेणे शक्य होणार आहे.

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# फडणवीसांची ‘चाणक्य-नीती’!

महाराष्ट्रातील राजकारणामध्ये एक वेगळंच ट्विस्ट आणणारी घटना गुरुवारी सकाळी घडली. ती म्हणजे, वांद्रे येथे असलेल्या ताज लॅण्ड्स एंड या हॉटेलात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट होती. खरंतर संपूर्ण मुंबईत मागील काळात लागलेल्या बॅनर, पोस्टर्सवरून ठाकरे बंधू पुन्हा १९ वर्षांनंतर एकत्र येणार अशी चर्चा महाराष्ट्रात चांगलीच रंगली होती. दोन्ही गटांतील नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी ही मागणी लावून धरली होती. उद्धव ठाकरेंनी तर ‘महाराष्ट्राच्या मनात जे आहे तेच होईल’ असे वक्तव्य करून राज यांना टाळी देण्यास आपण उतावीळ असल्याचे दाखवून दिले होते. असं सगळं घडत असताना, ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चांनी जोर धरलेला असतानाच, ऐनवेळी फडणवीसांच्या एन्ट्रीने ठाकरे बंधूंच्या मनोमिलनामध्ये अचानक ट्विस्ट आला. टायमिंग साधत फडणवीसांनी असा काही खेळ खेळला की त्यांच्या ‘चाणक्य-नीती’ने जवळजवळ उद्धव ठाकरेंचा गेम झालाय, हे वेगळं सांगायची गरज आहे असे वाटत नाही.

मुळात राजकाराणात टायमिंग साधण्याचा आणि ते फिरवण्याचा हातखंडा फडणवीसांकडे आहे. हे यापूर्वी अनेकदा दिसून आलेले आहे. उद्धव ठाकरेंनी पाठ दाखविल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी त्यांना दाखविलेली आपली हातोटी ठाकरे सध्यातरी विसरले असावे असे वाटत नाही. २०१९ मध्ये उद्धव ठाकरेंकडून मिळालेल्या धोक्यानंतर, फडणवीसांनी राज्यसभा, विधान परिषद निवडणुकीत ठाकरेंना चांगलाच इंगा दाखविला. एवढंच नव्हे तर, सत्तेसाठी ज्या फितुरीने, गद्दारीने पाठीत खंजीर खुपसून खुर्चीत जाऊन बसले, तेथून अब्रूची लक्तरं वेशीला टांगून, अत्यंत अपमानास्पदरीत्या खाली खेचून, फडणवीसांनी ठाकरेंची खोड मोडली होती. लोकसभेनंतर थोडं डोकं वर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, अवघ्या काहीच महिन्यांत विधानसभेत तोंड दाखवायला जागा ठेवली नव्हती. आणि आता जेव्हा मुंबई महापालिकेची निवडणूक तोंडावर असताना फडणवीसांनी पुन्हा एकदा दंड थोपटल्याचे दिसत आहे.

राज ठाकरे यांना सोबत घेण्याबाबत तसे फडणवीस नेहमीच सकारात्मक राहिले आहेत. मात्र, राजकीय अपरिहार्यतेमुळे अनेकदा यात यश मिळू शकले नाही, तो भाग वेगळा. मात्र, राज यांनी महायुतीचा भाग व्हावं यासाठी ते नेहमीच आग्रही राहिले आहेत. त्यामुळे फडणवीसांनी यावेळी जी



मैदानात उडी घेतली आहे, ती सहजच असेल असे वाटून घेण्याचं काही कारण नाही. फडणवीस मुरलेले नेते आहेत. त्यांनी महाराष्ट्राच्या मातीतल्या पैलवानाला अस्मान दाखविले आहे. यापूर्वी फडणवीस स्वतः असो, शिंदे असो किंवा सामंतांसोबतची राज ठाकरेंची भेट असो. या सर्व भेटींनंतर या नेत्यांसह फडणवीसांनी आम्ही राज्यातील गंभीर प्रश्नांवर चर्चा केल्याचे वेळोवेळी सांगितले होते. त्यामुळे ताज लॅण्डमध्ये फडणवीस आणि राज ठाकरे यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी युतीबाबत चर्चा जरी झालेली असली तरी, फडणवीस हे राजकारणातील धुरंधर आणि चाणाक्ष राजकारणी आहेत. भेटीच्या मूळ विषयाला बगल देत फडणवीस वेळ मारून नेतील यात शंका नाही. मात्र, त्यांनी आपला जो गोल आहे तो साध्य केलाच असेल, याबाबत दुमत असण्याचं कारण नाही.

मध्यंतरी उद्धव ठाकरेंना मनसे आणि ठाकरे गटात युती होणार का? असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर उत्तर देताना ठाकरेंनी संकेत काय बातमीच देतो असे म्हणत महाराष्ट्रातील जनतेच्या मनात जे आहे तेच होईल असे सांगितले होते. त्यांच्या या उत्तराने मनसे आणि ठाकरे गटातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले होते. मात्र, युती होण्याच्या अंतिमक्षणी फडणवीसांनी राजकीय चक्र फिरवून उबाठा गट-मनसे युतीला ब्रेक लागेल याची पूर्ण तजवीज केल्याचे दिसत आहे.

मुळात उद्धव ठाकरे हे सार्वजनिक ग्राहक झालेले आहेत की काय असा प्रश्न आता या निमित्ताने उपस्थित होतो. कारण उद्धव आणि संजय राऊत यांच्या म्हणण्यानुसार भाजपाने सडवलं. उपयोग संपला आणि अलगद काढून बाजूला केलं. त्यानंतर २०१९ साली महायुतीला स्पष्ट बहुमत असताना, शरद पवारांनी स्वतः सरकारमध्ये येण्यासाठी संजय राऊतांमार्फत पुन्हा उद्धव ठाकरेंना ग्राहक बनवलं. ठाकरेंच्या खांद्यावर बंदूक ठेवून बनवलेलं सरकार मुळात अडीच तीन वर्षे शरद पवारांनीच चालवलं. ठाकरे बिचारे तर दोनदा मंत्रालयात आले. ते देखील शरद पवारांनीच महाराष्ट्राला अवगत करून दिलं. आता सुप्रिया सुळे पंतप्रधान मोदींचे गुणगान गाताना दिसत आहेत. एका इंग्रजी दैनिकात म्हणे, भला मोठा लेखच लिहिलाय् ताईंनी. आणि शरद पवारांची राजकीय कारकीर्द, स्वभाव आणि भाजपा, मोदींबाबतचा त्यांचा दृष्टिकोन सगळ्यांना माहितीच आहे. हे सगळं बघता, पवारदेखील सत्तेत सहभागी व्हायला काही अडचण आजघडीला तरी दिसत नाही. मग ते थेट महायुतीत सहभागी होतील नाहीतर अजित पवारांसोबत येऊन, आडमार्गाने येऊ शकतात. आणि हे सगळं उद्धव ठाकरे उघड्या डोळ्यांनी बघत बसतील, अशी परिस्थिती आज ठाकरेंवर आलेली आहे. एकेकाळी महायुतीतला महत्त्वाचा घटक शिवसेना होता, उद्धव ठाकरे होते. कमळाबाई म्हणून हिणवूनसुद्धा भाजपाने सोबत ठेवून महत्त्व दिलेच होते. पण आता शरद पवारांचे ग्राहक बनून अशी परिस्थिती झाली की ते बाहेर फेकले गेले आणि शरद पवार तेव्हाही मजेत राहिले, भविष्यातही राहतील. तसेच आता राज ठाकरेंनी त्यांना ग्राहक बनविल्याचे दिसत आहे.

महेश मांजरेकरांच्या एका मुलाखतीत एक हाडूक टाकलं, त्याला चघळत उबाठावाले आशा लावून बसले. आता हाडूक टाकून तीन महिन्यांचा कालावधी लोटला आहे. या दोन भावांना एकत्र यायचं असतं तर कधीच आले असते, त्यांना कुठे दिल्लीला, हायकमांडला कुणाला विचारायचे आहे. ना वर कोणाला विचारायचं आहे, ना खाली. तशी या दोन्ही पक्षाची संस्कृतीच नाही. मग माशी कुठे शिंकली? मुळात त्यावेळी शरद पवारांचे राजकारण उद्धव ठाकरेंना समजले नाही आणि आता राज ठाकरेंचे... खरं सांगायचं तर उद्धव ठाकरेंना राजकारणच उलगडलं नाही. माणसानं एकदा का विश्वासघात केला आणि सत्याचा मार्ग सोडला, तर त्याची अशीच ससेहोलपट होत राहते. हेच वास्तव आहे.

९२७०३३३८८६

### नागरिकांचा विश्वासघात का होतो आहे?

राजकारण ही एक जनसेवा असताना किंबहुना राजकीय मंडळी तसेच म्हणत असताना त्यांना पेन्शनमध्ये, भत्त्यांमध्ये, परदेशी प्रवासांमध्ये, तसेच वीज, पाणी, फोन, मोबाईलच्या सवलती कशासाठी? एक पेन्शन दिली गेली तर ठीक आहे. परंतु काही वेळा तीन तीन पेन्शन मिळतात ही कोणाची फसवणूक आहे, हे जरा सद्सदविवेकबुद्धीने राजकीय मंडळींनी तपासण्याची गरज आहे.

जेव्हा वेतन, भत्ते वाढविले जातात तेव्हा सत्ताधारी असो वा विरोधक सर्व एकत्र येतात. त्यावर लवकरच कायदा आणून उपाययोजना व्हावी. तसेच गुन्हेगार किंवा गुन्हेगाराचा ठपका बसलेले निवडणुकीत उमेदवार असता कामा नयेत. संसदेत सेवा करणे हा नक्कीच सन्मान आहे, परंतु अशाप्रकारे जनतेच्या करातून मिळालेल्या रकमेचा अपव्यय म्हणजे विश्वासघातच म्हणावा लागेल. यामुळे काही प्रामाणिक जनसेवेकरी राजकीय मंडळींवर याचा ठपका बसतो याचाही विचार व्हावा.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### आसामच्या मुख्यमंत्र्यांचा योग्य निर्णय

इतिहास काळापासून मुसलमान आक्रमकांनी अनेक हिंदू व बौद्ध मंदिरांचा विध्वंस केला आहे. महमूद ग़ज़नीने सोमनाथाचे मंदिर फोडले अशी ऐतिहासिक नोंद आहे. बाबर या क्रूर इस्लामी शासकाने इ.स. १५२७ मध्ये प्रभू श्रीरामांचे अयोध्या येथील भव्य मंदिर उद्ध्वस्त केले. काशी येथील काशी विश्वनाथ मंदिराजवळ मशीद औरंगजेबाने काशी विश्वनाथ मंदिर पाडून बांधली असा दावा इतिहासकारांनी केला आहे. मथुरा येथे औरंगजेबाने मथुरा कृष्ण जन्मभूमी संकुल मंदिर पाडून मशीद बांधली. आज हीच परंपरा अखंड चालू आहे. इतिहासकालीन किल्ला म्हणा किंवा एखादे हिंदूचे प्रसिद्ध देवस्थान म्हणा पाहायला गेलो तर तेथील लगतच्या टेकडी किंवा डोंगरावर एक तर तुम्हाला मजार किंवा मोठा दर्गा झालेला दिसतो. हा बांधलेला दर्गा किंवा मशीद सरकारी जागा बळकावून असते. महसूल, सरकारी अधिकारी याकडे मुद्दाम डोळेझाक करतात. मग त्याविरुद्ध स्थानिकांनी आवाज उठवला की विषय सांप्रदायिक होऊन बसतो. मग यातून कोर्टकचेरी सुरू झाली की इतक्या वर्षापासून हा येथे आहे याचा दाखला दिला जातो.

## वाचक पत्रे


मतांच्या राजकारणासाठी राजकीय नेते याविरुद्ध बोलण्यास तयार नाही. काँग्रेस पक्षाने तर सर्वधर्मसमभाव स्वीकारला असल्याने त्याच्या एजेंडामध्ये हा विषय नाही. कारण त्याच्या मुस्लिम व्होट बँकेला धक्का लागतो. भाजपने हा मुद्दा लावून धरला तर त्याला सांप्रदायिक रंग दिला जातो. उत्तराखंडमध्ये वन क्षेत्रात अनधिकृतरीत्या मोठ्या संख्येने मजारी बांधल्या गेल्याची माहिती समोर आली आहे. उत्तराखंडला देवभूमी म्हणतात. या ठिकाणी हिंदूंचे हरिद्वार, बद्रीनाथ, केदारनाथ धाम आहेत. याच क्षेत्रात मशिदी, मजारी मोठ्या प्रमाणात बांधल्या जातात ही बाब लक्षात घेण्यासारखी आहे.

पहिल्यांदा आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा यांनी जाहीररीत्या ही बाब बोलून दाखवली आहे की यापुढे आसाममध्ये हिंदूंची धार्मिक स्थळे आणि परंपरा यांच्याशी छेडछाड सहन केली जाणार नाही. परिसरात मशिदी बांधणे सामाजिक सौहार्द धोक्यात आणू शकते, असे सांगत त्यांनी मंदिरांच्या ठिकाणी मशिदी बांधण्यास विरोध केला आहे. प्रत्येक राज्य सरकारने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे. परवानगी देताना बहुसंख्य समाजाच्या भावना दुखावणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. आज या बाबी छोट्या दिसत असल्या तरी कधी विक्राळ रूप धारण करतील हे समजणार नाही.

**अविनाश देशपांडे**/९२८४६७९६२३

### रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

आज १४ जून. आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक रक्तदान दिन म्हणून साजरा केला जातो. ऑस्ट्रेलियातील डॉ. कार्ल लॅंडस्टेनर या संशोधकाच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस जागतिक



रक्तदाता दिन म्हणून साजरा केला जातो. रक्तदान श्रेष्ठदान असं म्हटलं जातं कारण या दानामुळे माणसाचा जीव वाचतो. आपल्या रक्तामुळे कोणाचा तरी जीव वाचतो म्हणूनच रक्तदानाला सर्वश्रेष्ठ दान असे म्हणतात. रक्तदानाच्या रूपाने आपण मानवतेला एक मोठी देणगी बहाल करतो. रक्तदान केल्याने कोणतीही इजा किंवा दुष्परिणाम होत नाही. मनुष्याच्या शरीरात ५ लिटर रक्त असते आणि रक्तदानात केवळ ३५० मिली इतकेच रक्त घेतले जाते.त्यामुळे कोणतीही कमजोरी जाणवत नाही.

विशेष म्हणजे २४ ते ४८ तासांत जेवढे रक्त आपण दान दिले आहे तेवढे पूर्ववत होते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने रक्तदान केले पाहिजे. रक्तदान सर्वश्रेष्ठ दान असले तरी आपल्याकडे रक्तदात्यांची संख्या खूपच कमी आहे. भारतात फक्त ०.६ टक्केच लोक रक्तदान करीत असतात. त्यामुळे देशात रक्ताची खूप कमतरता भासते. जर रुग्णांना वेळीच रक्त मिळाले नाही तर त्यांचा मृत्यूही होऊ शकतो त्यामुळे प्रत्येकाने जागरूक राहायला हवे. रक्तदान म्हणजे जीवनदान, रक्तदान सर्वश्रेष्ठ दान हे लक्षात घेऊन प्रत्येकाने रक्तदान करायला हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# सार्थक लेंगरेची राष्ट्रपती पारितोषिकासाठी निवड; रविवारी होणार सत्कार

**सोलापूर, दि. १३ जून -** येथील पंढरपूर एज्युकेशन सोसायटीच्या द.ह.कवठेकर प्रशालेचा दहावीतील विद्यार्थी सार्थक सिद्धेश्वर लेंगरे याची निवड १५ जून २०२५ रोजी दिल्ली येथे राष्ट्रपती भवनात होणाऱ्या पारितोषिक वितरण समारंभात ज्युनिअर गट (मराठी भाषा) यामध्ये राष्ट्रीय विजेता म्हणून झालेली आहे. टाटा बिल्डिंग इंडिया नेशन या कंपनीद्वारे दरवर्षी राष्ट्रीय पातळीवरती निबंध स्पर्धा घेतली जाते. देशभरातील विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होतात.या स्पर्धेत उत्कृष्ट ठरलेल्या शोधनिबंधास राष्ट्रपती महोदय यांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरवण्यात येते. या स्पर्धेच्या निवडीचे तीन राऊंड असतात. स्पर्धेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची सी.बी.आय.मार्फत गुप्त चौकशी केली जाते व त्यानंतरच अंतिम निवड केली जाते.या स्पर्धेत सार्थक लेंगरे यांनी घन कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन हा शोध निबंध सादर केला होता.



सार्थकला राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते पोरितोषिक देऊन गौरवण्यात येत आहे. सार्थक लेंगरे हा द.ह.कवठेकर प्रशालेचा गुणवंत विद्यार्थी असून यापूर्वी त्याने शिष्यवृत्ती परीक्षेत राज्यस्तरीय यश संपादन केले आहे. तसेच द.ह.कवठेकर भूषण पुरस्कार,विविध निबंध स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा, चित्रकला परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा व नुकतीच झालेल्या डॉ. होमी भाभा, बाल वैज्ञानिक परीक्षा यात धवल यश प्राप्त केले आहे. ज्येष्ठ शिक्षक समीर दिवाण यांचे मार्गदर्शन लाभले.


महावितरण

## ई-निविदा सुचना क्र. ००३/२०२५-२६

महावितरण तसेच शासन ई-नोंदणीकृत व अनुभवी स्थापत्य कंत्राटदारांकडून कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग महावितरण, बारामती अंतर्गत विविध कामे करण्यासाठी खालील प्रमाणे ई-निविदा मागविण्यात येत आहेत .

| निविदा क्र. | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम रूपये |
|---|---|---|
| टि-१४/ २०२५-२६ | सं.व सु. विभाग बारामती जि.पुणे अंतर्गत इंदापूर येथील कार्यालयाचे वेदर शेडचे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९८ लाख |
| टि-१५/ २०२५-२६ | सं व सु विभाग सासवड अंतर्गत फिल्टर युनिट येथे लोडिंग अनलोडिंग प्लॅटफॉर्म व इतर विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-१६/ २०२५-२६ | सं.व सु. विभाग बारामती अंतर्गत उर्जा भवन प्रशासन इमारत येथील गळती रोखण्यासाठी स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-१७/ २०२५-२६ | सं.व सु. विभाग बारामती अंतर्गत ३३/११ के.व्ही.उपकेंद बावडा येथील विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-१८/ २०२५-२६ | सं.व सु. विभाग बारामती अंतर्गत भिगवण येथील नियंत्रण कक्षाचे विविध स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-१९/ २०२५-२६ | सं.व सु.विभाग बारामती अंतर्गत रहिवाशी ईमारत विभाग ४ रहिवाशे गाळा क्र.ब येथील पाणी गळती रोखण्यासाठी स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-२०/ २०२५-२६ | सं.व सु. विभाग बार्शी जि.सोलापूर अंतर्गत ३३/११ के.व्ही.उपकेंद पिंपळनेर येथील पुरूष व महिला शौचालयाचे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.५.५६ लाख |
| टि-२१/ २०२५-२६ | सं.व सु. विभाग सोलापूर जि.सोलापूर अंतर्गत अक्कलकोट शहर व ग्रामीण अंतर्गत ३३/११ के.व्ही.उपकेंद अक्कलकोट शहर येथील महिला शौचालयाचे स्थापत्य दुरूस्तीची कामे करणे. (कालावधी ३ महिने) | रू.३.४७ लाख |
| टि-२२/ २०२५-२६ | सं.व सु. मंडळ कार्यालय जुनी मिल कंपाउंड सोलापूर जि.सोलापूर परिसरामध्ये कॉक्रीट रोडचे काम करणे. (कालावधी ३ महिने) | रू.४६.३१ लाख |
| टि-२३/ २०२५-२६ | सं.व सु.विभाग फलटण अंतर्गत शिरवळ शहर व ग्रामीण शाखा कार्यालय ता. खंडाळा जि.सातारा परिसरामधील कुंपनाची दुरूस्ती करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.३० लाख |
| टि-२४/ २०२५-२६ | सं.व सु.विभाग सातारा अंतर्गत ३३/११ के.व्ही.उपकेंद तारगाव, सासुर्वे व रहिमतपूर ता.कोरेगाव, जि.सातारा येथील स्थापत्य दुरूस्ती करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |
| टि-२५/ २०२५-२६ | सं.व सु.विभाग सातारा अंतर्गत कोरेगाव ग्रामीण शाखा कार्यालय २ ता.कोरेगाव, जि.सातारा येथील स्थापत्य दुरूस्ती करणे. (कालावधी ३ महिने) | रू.९.९९ लाख |

ई- निविदा विक्रीचा कालावधी दि. १४.०६.२०२५ ते दि. २०.०६.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून ई- निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि. २०.०६.२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजेपर्यंत आहे. ई-निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशिलासह व विहीत नमुन्यात सादर करावी. सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क : कार्यकारी अभियंता (स्था), बारामती. मो.७८७५७६८५५५. निविदेची मुदतवाढ झाल्यास वर्तमानपत्रात जाहिरात दिली जाणार नाही. संबंधितानी वेबसाईटला भेट देऊन लक्ष दयावे.मागविलेल्या निविदा कोणत्याही स्तरावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीदारांनी राखुन ठेवलेले आहेत.

**जनसंपर्क अधिकारी बारामती परिमंडळ बारामती ४३/२०२५-२६**

सही/-
कार्यकारी अभियंता (स्था), स्थापत्य विभाग, बारामती



## ब्रह्मदेवदादा माने सहकारी बँक लि., सोलापूर.

नोंदणीकृत कार्यालय : ११३-अ, सिध्देश्वर पेठ, जिल्हा परिषदेसमोर, सोलापूर - ४१३ ००१.
मुख्य कार्यालय : जी प्लॉट, प्लॉट नं.९७, श्री सिध्देश्वर मार्केट यार्ड, रविवार पेठ, सोलापूर - ४१३ ००५.
फोन : ०२१७-२७४४९३०, २७४३२७२, ८६६९९२११०५
Email : bmsb.support@bmsbank.in / bmsb.ceo@bmsbank.in Website : www.bmsbank.in

### वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या बँकेची सन २०२४-२०२५ ची **४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे चेअरमनसो यांच्या अध्यक्षतेखाली रविवार दि.२९.०६.२०२५ रोजी सकाळी ठीक ९.०० वाजता बँकेच्या बी.एम.आय.टी.कॅम्पस बेलाटी शाखा (सोलापूर-मंगळवेढा रोड) येथे** खालील विषयांवर चर्चा करण्यासाठी बोलाविण्यात येत आहे. सदर सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

**-: सभेपुढील विषय :-**

१) मागील दिनांक २१.०७.२०२४ रोजी झालेल्या मा. ४८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडिंग वाचून कायम करणे.
२) सन २०२४-२०२५ सालचा अहवाल, लेखापरिक्षित ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्विकृत करणे.
३) सन २०२४-२०२५ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची वाचून नोंद घेणे व तो स्विकृत करणे.
४) सन २०२३-२०२४ मध्ये झालेल्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास अनुसरून केलेली दोष दुरूस्ती माहितीस्तव व स्विकृतीसाठी.
५) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२०२५ च्या नफा वाटणीस मंजूरी देणे.
६) सन २०२५-२०२६ सालाकरिता मा.संचालक मंडळाने तयार केलेले खर्च व उत्पन्नाचे अंदाजपत्रक मंजूर करणे व सन २०२४-२०२५ सालात बजेटपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
७) बँकेचे सन २०२६-२०२७ या सालाच्या वार्षिक व्यवसाय आराखड्यास (ABP) मंजूरी देणे.
८) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाकरिता बँकेच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी वैधानिक लेखापरिक्षक यांची नियुक्ती करणे व मानधन ठरवणे.
९) सन २०२५-२०२६ सालाकरिता सतत व समवर्ती लेखापरिक्षक यांच्या नेमणूकीस मंजूरी देणे.
१०) संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडील कर्जाची माहिती माहितीस्तव.
११) बँकेनी अहवाल सालात बँकींग व्यवसायाकरिता अधिग्रहीत केलेल्या जागा/इमारतीस कार्योत्तर मंजूरी देणे व बांधकामास परवानगी देणे.
१२) बँकेनी अहवाल सालात दिलेल्या सभासद/संचालक व कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतची व पुढील वर्षाच्या नियोजनाबाबतची कार्यालयीन टिप्पणी माहितीस्तव व मंजूरीस्तव.
१३) सन २०२५-२६ सालाकरिता बाहेरुन कर्ज उभारणीची मर्यादा ठरविणे.
१४) ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या गैरहजेरीस मान्यता देणे.
१५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**सोलापूर.**
**दिनांक : १३/०६/२०२५**

**मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून**
**विनोद रमाकांत कुलकर्णी**
**व्यवस्थापक**

**सूचना :**
१) कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास ती त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर घेतली जाईल. त्या सभेस कोरमची आवश्यकता असणार नाही.
२) दिनांक ३१.०३.२०२५ रोजी संपलेल्या वर्षाचा बँकेचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक बँकेच्या नोटीस बोर्डावर सर्वांच्या माहितीसाठी लावण्यात आलेला आहे.
३) दिनांक ३१.०३.२०२५ अखेरच्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकासंबंधी काही माहिती, स्पष्टीकरण विचारावयाचे असल्यास त्यांनी दिनांक २१.०६.२०२५ च्या आत बँकेच्या मुख्य कार्यालयात बँकेच्या वेळेत व्यवस्थापकांकडे लेखी कळवावे म्हणजे माहिती देणे सोईचे होईल. मुदतीनंतर आलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.
४) ज्या सभासदांनी लाभांश व शेअर्स सर्टिफिकेट अद्याप नेले नसल्यास त्यांनी कृपया बँकेतून घेऊन जावे.
५) ज्या सभासदांनी ३ वर्षापुर्वीचे म्हणजे सन २०२१-२२ या वर्षाचे लाभांश (डिव्हीडंड) अद्याप नेले नसल्यास त्यांनी दि.३०.०९.२०२५ पर्यंत घेऊन जावे अन्यथा बँकेच्या पोटनियम क्र. ५८(ड) नुसार असे लाभांश फॉरफीट करण्यात येऊन रिझर्व्ह फंडास वर्ग करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
६) सहकारी कायद्यानुसार सभासदांना शेअर्स खात्याबाबत वारस (नॉमिनी) म्हणून नांव सुचविण्याचा हक्क आहे. जर आपण असे नांव सुचविले नसल्यास त्याबाबत बँकेचा छापील अर्ज भरावा.
७) ज्या सभासदांच्या भागाची दर्शनी किंमत रु.१०००/- पेक्षा कमी आहे अशा सभासदांनी फरकाची रक्कम जमा करावी.
८) मा.भारतीय रिझर्व्ह बँकेने शेअर्ससह सर्व खात्यांस केवायसी कागदपत्रे फोटो आयडीप्रुफ व अॅड्रेसप्रुफ दाखल करणे व ठरावीक कालांतराने पुन्हा सदर केवायसी कागदपत्रे दाखल करणे अनिवार्य केलेले आहे. ज्या सभासदांनी सदरप्रमाणे केवायसी कागदपत्रे सुरुवातीस व ठरावीक कालांतराने अपडेट केलेले नसल्यास दाखल अथवा अपडेट करण्यात यावीत.

स्नेह आणि विश्वास...... कुटुंबासारखा......


## सद्गुरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर

### स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ मधील नियम १०७ मधील तरतुदीनुसार सद्गुरू ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., मोहोळ ता. मोहोळ जि. सोलापूर या पतसंस्थेच्या ज्या थाकबाकीदार कर्जदार व जमीनदार यांचेविरुद्ध कलम १०१ अनुसार वसुली दाखले प्राप्त झालेले होते अशा कर्जदार / जमीनदारांच्या जप्त केलेल्या खालील वर्णनाच्या स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव संस्थेच्या कार्यालयात गुरुवार दिनांक १७.०७.२०२५ रोजी दुपारी १ वाजता ठेवण्यात आलेला आहे. तरी इच्छुक व्यक्ती व संस्था यांनी सदर लिलावात भाग घ्यावा.

| अ. नं. | कर्जदार/जमीनदार यांचे नाव व पत्ता | जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचे वर्णन गाव, गट नं. व क्षेत्र (है.आर.) | कर्जदाराकडील येणे बाकी (मुद्दल. व्याज व इतर) | राखीव किंमत |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. अनिल जनार्दन गोरे रा. औंढी - कर्जदार | औंढी ता. मोहोळ येथील गट नं.२०५/१ क्षेत्र १.९२ हे. आर. | ७,१६,४२९/- | २९,८०,०००/- |
| २. | श्रीमती. मनीषा रामचंद्र कोकाटे रा. तांबोळे - कर्जदार | तांबोळे येथील गट नं. ७७ क्षेत्र ०.७९ हे. आर. | १३,०२,७२५/- | ६,००,०००/- |

सदरील पहिल्या लिलावास बोली न लागल्यास फेर लिलावाची दुसरी तारीख २५/०७/२०२५ वार शुक्रवार रोजी सकाळी ११.०० वाजता व सदर फेरलीलावाच्या वेळी बोली न लागल्यास पुढील तिसरा व अंतिम फेरलीलाव दिनांक ०१/०८/२०२५ वार शुक्रवार रोजी सकाळी ११.००. वाजता उपरोक्त नमूद स्थळी होईल. लिलावाच्या अटी व शर्ती प्रथम लिलाव प्रक्रिये प्रमाणे कायम राहतील.

**टीपः लिलावाच्या अटी व शर्ती संस्थेच्या कार्यालयात पाहावयास मिळतील.**

**ठिकाण : मोहोळ**
**दिनांकः १३/०६/२०२५**

शिक्का

**सही/-**
**(नितीन रोहिदास जाधव)**
**विशेष विक्री व वसूली अधिकारी**
**सद्गुरू ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था म. मोहोळ**

**मा. अॅड. अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बार्शी, ता. बार्शी जि. सोलापूर यांचे समोर**
लवाद न्यायाधिकरण कार्यालय, श्री. भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को. ऑप. सोसायटी लि. बार्शी, के. टी. ट्रॅक्टर्स शोरूम, (कुबाटा), दुसरा मजला, लातुर रोड, बार्शी ता बार्शी जि. सोलापुर
**(मल्टीस्टेट को ऑप, सोसायटीज अॅक्ट २००२ आणि अब्रिटेशन अॅन्ड कन्सिलेशन अॅक्ट अन्वये)**

**जाहीर नोटीस / समन्स** दि. १२/०६/२०२५

**अर्जदार : श्री भगवंत मल्टिस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि. बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर**
**विरूद्ध - गैरअर्जदार**

१. लवाद अर्ज क. ०१/२०२५ १) सतीश श्रीमंत आरगडे रा. तावडी ता. बार्शी जि. सोलापूर २) आबासाहेब शामराव जराड रा. ७१३, फुले प्लॉट, परांडा रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ३) उमेश शिवाजी ठोंबरे रा. प्लॉट नं. १९, ओंकार निवास, २२ बंगले जवळ, पारिजात हौसिंग सोसायटी, अलिपुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर ४) मोहन केशव शिरामे रा. शिंदे प्लॉट, उपळाई रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापूर
२. लवाद अर्ज क. ०२/२०२५ १) नरसिंग नारायण टेकाळे २) शिवाजी नंदकुमार माने रा. पारू नगर, मेन रोड, मुरूड ता. जि. लातुर ३) प्रमोद पंडितराव यादव रा. शिराढोन ता. कळंव जि. धाराशिव
३. लवाद अर्ज क. ०५/२०२५ १) सागर रामलिंग आगरकर रा. कनकळस प्लॉट, अलिपुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर २) सिद्धेश्वर वसंतराव डंबरे रा. शिवशक्ती मैदानाच्या पाठिमागे, शहा मामा बिडींग समोरील गल्ली, ओपन स्पेस समोर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) गणेश मन्मथ खरात रा. कव्हे ता. बार्शी जि. सोलापुर
४. लवाद अर्ज क. १०/२०२५ १) सुधाकर हंबीरराव फुरडे २) सुभद्राबाई हंबीरराव फुरडे ३) पांडुरंग हंबीरराव फुरडे ४) दिनकर हंबीरराव फुरडे ५) विजयसिंह रामभाऊ फुरडे ६) रामचंद्र दशरथ फुरडे सर्व. रा. कांदलगाव ता. बार्शी जि. सोलापुर
५. लवाद अर्ज क. १२/२०२५ १) बालाजी लक्ष्मण सानप रा. सि.स. ९४१/१/४८ पैकी, धर्माधिकारी प्लॉट, गाडेगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
६. लवाद अर्ज क. १४/२०२५ १) राजशेखर नारायण औदुर्ती रा. प्लॉट नं. १९, पाचवा मजला, युनिटी ड्रीम्स, प्रेम नगर, रोहन प्लाझा शेजारी, जुळे सोलापुर ता. जि. सोलापुर २) मयुरी राजशेखर औदुर्ती रा. प्लॉट नं. १९, पाचवा मजला, युनिटी ड्रीम्स, प्रेम नगर, रोहन प्लाझा शेजारी, जुळे सोलापुर ता. जि. सोलापुर ३) मनोज हिरासिंग मनसावलेरा, शितलादेवी मंदिर जवळ, १४७, उत्तर सदर बझार, लोधी गल्ली, लष्कर, सोलापुर ता. जि. सोलापुर ४) मिलींद पांडुरंग माने रा. २६७, कोनापुरे चाळ, रेल्वे लाईन, उत्तर सोलापुर ता. जि. सोलापुर
७. लवाद अर्ज क. १५/२०२५ १) राजीव विजयकुमार भाटे रा. २५९६, व्यापारी बँकेजवळ, ऐनापुर मारूती रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर २) जितेश अशोक परमार रा. ३४०८, पानगांवकर बोळ, ऐनापुर मारूती रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) बालाजी धर्मराज भोई रा. ४२२, पाण्याच्या टाकीजवळ, गाडेगाव रोड, बार्शी ता. वार्शी जि. सोलापुर
८. लवाद अर्ज क. १६/२०२५ १) सचिन शिवाजी कांबळे रा. कव्हे ता. बार्शी जि. सोलापुर २) करण मनोज थनवाल रा. झाडे किराणा दुकानाजवळ, कावळे यांच्या घराशेजारी, नाळे प्लॉट, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) दैवान अरुण गायकवाड रा. अरणगांव ता. बार्शी जि. सोलापुर
९. लवाद अर्ज क. १७/२०२५ १) सारिका वैभव शिगन २) वैभव रावसाहेब शिंगन ३) सदानंद भाऊ गाडे तिघे, रा. पानगाव ता. बार्शी जि. सोलापुर ४) बाळासाहेब दगडु मोरे रा. मारूती मंदिरा जवळ, घाणेगाव ता. बार्शी जि. सोलापुर
१०. लवाद अर्ज क. २१/२०२५ १) शेख फिरोज रशीद रा. साडे ता. करमाळा जि. सोलापुर २) मोहोळकर धोंडिराम तुळशीराम रा. बार्शी रोड, परांडा ता. परांडा जि. धाराशिव ३) फरतडे पद्माकर काशिनाथ रा. साडे ता. करमाळा जि. सोलापुर
११. लवाद अर्ज क. २७/२०२५ १) नलवडे अनुसया सुनिल २) नलवडे रणजीत सुनिल दोघे. रा. रोसा ता. परांडा जि. धाराशिव ३) जगदाळे हेमंत सुर्यभान रा. खासापुरी ता. परांडा जि. धाराशिव ४) नलवडे सचिन सुभाष रा. रोसा ता. परांडा जि. धाराशिव
१२. लवाद अर्ज क. २९/२०२५ १) अविनाश चंद्रकांत पौळ २) चंद्रकांत रामलिंग पौळ दोघे, रा. खंदाड गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापुर ३) प्रशांत विलास वाघमारे रा. शारदादेवी नगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापुर (४) शरद रामचंद्र उगले रा. खंदाड गल्ली, वैराग ता. बार्शी जि. सोलापुर
१३. लवाद अर्ज क. ३२/२०२५ १) विद्या तुकाराम कादे २) रघुनंदन अण्णासाहेब कादे ३) तुकाराम ज्ञानोबा कादे तिघे. रा. वाळूज ता. मोहोळ जि. सोलापुर
१४. लवाद अर्ज क. ३४/२०२५ १) शिवराज उत्तरेश्वर भंगुर रा. पिंपळगाव ता. बार्शी जि. सोलापुर
१५. लवाद अर्ज क. ३६/२०२५ १) दिपक विजयकुमार लोंढे रा. पंचशीलनगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापुर २) समाधान विनायक भालशंकर रा. सिद्धार्थ नगर, वैराग ता. बार्शी जि. सोलापुर
१६. लवाद अर्ज क. ३८/२०२५ १) उषा आनंद काशीद २) लालासाहेब श्रीरंग काशीद ३) संतोष लहु काशीद तिघे. रा. पिंपरी (पा) ता. बार्शी जि. सोलापुर
१७. लवाद अर्ज क. ३९/२०२५ १) महेश शिवाजी काकडे २) शिवाजी भगवान काकडे दोघे, रा. ढोराळे ता. बार्शी जि. सोलापुर ३) यशवंत शंकर सुतार रा. इर्लेवाडी ता. बार्शी जि. सोलापुर ४) रमाकांत चंद्रकांत मडके रा. मुंगशी (वा) ता. बार्शी जि. सोलापुर
१८. लवाद अर्ज क. ४०/२०२५ १) अमोल नागनाथ हारभरे २) हारभरे नागनाथ मोहन ३) शेंडगे तानाजी शिवाजी ४) नागरगोजे पद्माकर बबन तिघे, रा. उपळाई ता. कळंब जि, धाराशिव
१९. लवाद अर्ज क. ४१/२०२५ १) लांडे सुरेखा सुधाकर २) लांडे अंगद केरबा ३) लांडे बाळासाहेब रावसाहेब तिघे. रा. धोत्रे ता. बार्शी जि. सोलापुर
२०. लवाद अर्ज क. ४२/२०२५ १) शिंदे श्रीकांत अरूण २) शिंदे विजय अशोक ३) शिंदे अविनाश बबन तिघे. रा. कुसळंब ता. बार्शी जि. सोलापुर
२१. लवाद अर्ज क. ४३/२०२५ १) गाढवे नितीन भास्कर रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापुर २) गाढवे कल्पक भास्कर रा. अनगर ता. मोहोळ जि. सोलापुर ३) गाढवे अतुल विजयकुमार रा. काटेगाव ता. बार्शी जि. सोलापुर
२२. लवाद अर्ज क. ४४/२०२५ १) गोरे श्रीकांत देवदत्त रा. आगळगाव ता. बार्शी जि. सोलापुर २) गोरे जानका देवदत्त ३) गोरे रणजीत देवदत्त ४) गोरे अमृता श्रीकांत ५) गोरे संजय भाऊ ६) कल्याण गोवर्धन नांदवटे
२३. लवाद अर्ज क. ४५/२०२५ १) पाटील संदिप बाळासाहेब रा. पांगरी ता. बार्शी जि. सोलापुर २) शिकेतोड संतोष दिनकर रा. पांढरी ता. बार्शी जि. सोलापुर ३) काकडे औदुंबर हरिश्चंद्र रा. पांगरी ता. बार्शी जि. सोलापुर
२४. लवाद अर्ज क. ४६/२०२५ १) अवधुत कल्पना नागनाथ २) अवधुत नागनाथ भुजंग ३) वाघमारे दिगंबर भिकाजी ४) टेकाळे बंकट अर्जुन चौघे. रा. रत्नापुर ता. कळंब जि. धाराशिव
२५. लवाद अर्ज क. ४७/२०२५ १) पवार रामराजा विलास रा. पोलीस स्टेशन जवळ, लातुर रोड, येडशी ता. जि. धाराशिव २) श्रीकृष्ण विलास पवार रा. जगताप नगर, येडशी ता. जि. धाराशिव ३) नकाते शिवदास सुधाकर रा. समता नगर, येडशी ता. जि. धाराशिव ४) नलवडे समाधान बाजीराव रा. गुरव गल्ली, येडशी ता. जि. धाराशिव
२६. लवाद अर्ज क. ५९/२०२५ १) गोरे दिपक सुमंत रा. विठ्ठल नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर २) विभूते विशाल विश्वनाथ रा. दत्त नगर, (राऊत चाळ) बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
२७. लवाद अर्ज क. ७१/२०२५ १) मोरे विकास वामन २) पवार भाऊसाहेब अनिल दोघे. रा. येरमाळा ता. कळंब जि. धाराशिव
२८. लवाद अर्ज क. ८०/२०२५ १) गणेश मन्मय खरात रा. मु. पो. कव्हे ता. बार्शी जि. सोलापुर २) अमर रामेश्वर सपाटे रा. सपाटे कॅन्टीन, शिवाजी कॉलेज समोर, बॉईज हॉस्टेल शेजारी, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) शुभम दिलीप पाटील रा. उंडेगाव ता. बार्शी जि. सोलापुर
२९. लवाद अर्ज क. ८१/२०२५ १) अनिल नवनाथ मिसाळ रा. ४२२ ब, गाडेगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर २) किरण रामलिंग जोशी रा. देशमुख प्लॉट, उपळाई रोड, बार्शी ता. वार्शी जि. सोलापुर
३०. लवाद अर्ज क. ८२/२०२५ १) आकाश नागनाथ शेंडगे २) सुवर्णा नागनाथ शेंडगे दोघे. रा. ३८८५, बगले चाळ, सोलापुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) अमोल अंकुश गाडेकर रा. जवाहरलाल मिल शेजारी, बगले बरड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ४) शरद दिलीप पवार रा. बगले चाळ, सोलापुर रोड, वार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
३१. लवाद अर्ज क. ८४/२०२५ १) जगदीश पद्माकर मांधले २) पद्मजा पद्माकर मांधले दोघे, रा. ७८८, तानाजी चौक, दस्तगीर दर्गा समोर, कसबा पेठ, वार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) नरसिंह दिलीप परंडकर रा. १५५१/१/१८, सुभाष नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ४) संदिपकुमार नामदेव राऊत रा. खोमणे वस्ती, शिरवली ता. बारामती जि. पुणे ५) निखील मधुकर देव रा. ११४५/१, देशपांडे वाडा, भगवंत मंदिरा मागे, कसबा पेठ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
३२. लवाद अर्ज क. ८५/२०२५ १) विठ्ठल दत्तात्रय लोहार रा. सि.स. नं. १८९/१ पैकी नाळे प्लॉट, मार्केट यार्डच्या पाठीमागे, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर २) सतिश गोविंद भालके रा. गट नं. १८९/२ नाळे प्लॉट, गोडाऊन जवळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) शिवकुमार भिमाशंकर क्षिरसागर रा. गट नं. ८६९, प्लॉट नं. १०१, शिंदे प्लॉट, उपळाई रोड, बार्शी ता. बार्शी जि, सोलापुर
३३. लवाद अर्ज क. ८६/२०२५ १) मधुकर खंडू कापसे २) अजिंक्य मधुकर कापसे दोघे. रा. ७३९/४/२७, दिव्यरत्न, पाटील प्लॉट, शिवाजी नगर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) तानाजी मार्तंड मंडलिक रा. जानराव हॉस्पीटल जवळ, कासारवाडी रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ४) अनिल अंबादास जाधव रा. ५६ माळे गल्ली, नगर पालिकेसमोर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
३४. लवाद अर्ज क. ८७/२०२५ १) प्रमोद भारत शिंदे रा. गाळा नं. ८. मुक्ताई डिजीटल, आंबेडकर शॉपींग सेंटर, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर २) श्यामराव तुकाराम ननवरे रा. बावी (आ) प्रकल्पाच्या बांधाजवळ ता. बार्शी जि. सोलापुर ३) प्रविणकुमार अनिल गाढवे रा. २३०३, रोडगा रस्ता, न.पा. नं. ३, शाळेजवळ, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ४) सोमनाथ विश्वनाथ शिवशेट्टी रा. सोमा फोटो स्टुडिओ, नवीन भाऊसाहेब झाडबुके शॉपिंग सेंटर, हिरापेठ चौक, आगळगाव रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
३५. लवाद अर्ज क्र. ८८/२०२५ १) निर्मला महादेव धनवे २) अनिल महादेव धनवे रा. बगले चाळ, सोलापुर रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ३) चेतन प्रविण तातेड रा. अरिहंत नगर, कासारवाडी रोड, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर ४) विशाल बिभिषण लगदिवे रा. प्लॉट नं. ३३, रिंग रोड, कश्यपी प्लॉट, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
३६. लवाद अर्ज क. ८९/२०२५ १) अनुराधा परमेश्वर करडे २) परमेश्वर बापुसाहेब करडे ३) सुहास जगदीश नवले ४) भरतरी बाबासाहेब नवले सर्व. रा. कांदलगाव, बार्शी ता. बार्शी जि. सोलापुर
३७. लवाद अर्ज क. ९०/२०२५ १) श्रीमंत पांडुरंग निंबाळकर २) संग्राम श्रीमंत निंबाळकर ३) शिवाजी परसु जाधव ४) बाळासाहेब गजेंद्र जगताप सर्व. रा. म्हैसगाव ता. माढा जि. सोलापुर

**(प्रत्येक प्रकरणात वर नमूद क्र.१ हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)**

सदर नोटीसव्दारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूध्द वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावणी नोटीस आपणापैकी काहींनी घेवन गैरहजर राहिलात काहींनी नोटीस घेण्यास नकार दिला तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत. तसेच काहीच्या नोटीसा तामिल होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशीकामे आपण दि. २५/०६/२०२५ रोजी सकाळी ११ वा. तुम्ही अथवा तुमच्या वकिलांमार्फत लवाद न्यायाधिकरण कार्यालयास न चुकता हजर रहावे, तुम्ही हजर न राहिल्यास, त्या वाबतीत तुमचे काहीही म्हणणे नाही, असे समजून तुमच्या विरूध्द लवाद अर्जाचा एकतर्फी हुकुम /आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी, सदर नोटीस माझी सही व शिक्यानिशी दिली आहे.

**सही/-**
**अॅड. अजित एम. देशमुख**
**लवाद अधिकारी, बार्शी**

क्र.ए.एल.टी/एस.आर/०२/२३
बार्शी, दि. ०६/०६/२०२५

## जाहीर समन्स / वृत्तपत्राद्वारे

### एफ. आर. शेख, तहसिलदार बार्शी यांचे न्यायालयात

**प्रति,**
**१. वामन दादा पंडित रा पिंपरी (पा) - वादी**

**प्रतिवादी**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अर्जुन रामभाऊ पोफले रा. बावी ता. बार्शी | २ | रुक्मिन भगवान पाटील रा मुंगशी, पो. रातंजन, ता. बार्शी |
| ३ | कमल विष्णू काशिद, रा. महागाव ता. बार्शी | ४ | विमल रघुनाथ मुकरे, रा कांदलगाव |
| ५ | दत्तात्रय दादा सोनार (पंडित) | ६ | कांताबाई विठ्ठल दिक्षीत |
| ७ | पुष्पाबाई पद्माकर दिक्षीत | ८ | दिगंबर दादा सोनार (मयत) वारस |
| ८ अ | सुमन दिगंबर सोनार | ८ ब | राहुलकुमार दिगंबर सोनार |
| ८ क | प्रदीपकुमार दिगंबर सोनार | ९ | शांताबाई विठ्ठल दिक्षीत (मयत) वारस |
| ९ अ | प्रभाकर विठ्ठल दिक्षीत | ९ ब | प्रभावती महादेव वेदपाठक |
| ९ क | नंदा बालाजी पंडित | | |

**मुंबई शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग अन्वये दावा**
**दावा जमिनीचा तपशील**

| गावाचे नाव | गट नंबर | क्षेत्र हे. आर. | पो.ख. हे आर | आका रु. पै. |
|---|---|---|---|---|
| पिंपरी (पान) | ५७५ | १.६९ | ०.०२ | ३.२५ |
| | ५८९ | १.४२ | -- | ४.३१ |

अर्जदार वामन दादा पंडित यांनी दावा जमिनीचे किंमत ठरवून मिळणेबाबत या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

दावा जमिनीबाबत मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ चे कलम ३२ ग अन्वये चौकशीचे तारीख दिनांक ४/१२/२०२३ ते दिनांक ५/६/२०२५ या कालावधीमध्ये ३० वेळा सुनावण्या ठेवण्यात आलेल्या आहेत. तथापि काही प्रतिवादी हे गैरहजर राहिलेले आहेत. तसेच दिलेल्या पत्यावरून नोटीस परत आलेल्या आहेत. त्यामुळे सध्याचा पत्ता समजून येत नसल्याने या जाहीर समन्स द्वारे कळविणेत येते की, वरील नमूद प्रतिवादी हे जिथे कोठे असतील तेथून सदर केसच्या सुनावणी कामी हजर रहावे. सदर दाव्याची पुढील सुनावणीची तारीख दिनांक २६/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता तहसिल कार्यालय बार्शी येथे नेमण्यात आली आहे. तरी तुम्ही सदर दिवशी तुम्ही जातीने अगर तुमच्या अधिकृत अभिकर्त्या मार्फत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह हजर रहावे. जर तुम्ही सदर दिवशी व वेळी हजर झाला नाही तर तुमचे गैरहजरीत एकतर्फी सुनावणी घेतली जाईल व उपलब्ध कागदपत्राआधारे योग्य तो निर्णय देणेत येईल याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**तहसिलदार बार्शी**

पं.न.प/जा.क्र./रो.ला./३११४/२०२५
पंढरपूर नगरपरिषद पंढरपूर
दिनांक :- १३/०६/२०२५.

### पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर, जिल्हा सोलापूर
### ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना

मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर विद्युत विभागाकडील बाँकी टॉकी वायरलेस सेट खरेदी करणे या कामाची ई-निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदारांकडून निविदा सुचनेत नमूद अटी व शर्तीस अधीन राहून निविदा मागविनेत येत आहे. निविदा फॉर्म ऑनलाईन उपलब्ध दि.२३/०६/२०२५ रोजी सायंकाळी ५:०० पर्यंत असून कामाच्या किंमतीबाबत तसेच निविदा किंमत, निविदा स्वीकृती इत्यादींची माहिती http://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**(महेश रोकडे)**
**मुख्याधिकारी**
**पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील व आसपासचे परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. सोलापूर सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे वैराग हद्दीतील गट नं.४१९/२/१६ याचे क्षेत्र १.९४.९१ आर, आकार १९ रु.५० पैसे ही प्लॉटजागा आतील सर्व झाडझुडूपे वगैरे सर्व तदंगभुत वस्तुसह व वहिवाटीचे हक्कासह.

उपरोक्त वर्णन केलेली शेतजमीन ही शैला शशिकांत आडसूळ, श्रीधर शशिकांत आडसूळ, सारीका सुहास हरिदास यांचे स्वतंत्रखरेदी मालकी व कब्जेवहिवाटीची होती व आहे व आजरोजी प्रत्यक्ष मालकी हक्कात व कब्जेवहिवाटीत आहे. विद्यमान मालकांनी सदरची शेतजमीन त्यांचे कायदेशीर गरजेपोटी विक्रीस काढलेली आहे. सदर शेतजमीन मिळकत खरेदी घेण्याबाबत आमचे अशिल व विद्यमान मालक यांच्या दरम्यान सदर शेतजमीनी मिळकतीबाबत खरेदी घेणेबाबत बोलणे झालेले असून खरेदी देणाऱ्यांनी आमचे अशिलाकडून इसार म्हणून काही रक्कमेचा मोबदला स्वीकार केलेला आहे. सदर शेतजमीन मिळकत निर्वेध, निजोखमी, बिनबोजाची खरेदी देण्याची ग्वाही व भरवसा शेतजमीन मालकांनी आमच्या अशिलास दिलेला आहे.

तरी वर नमुद शेतजमीनीवर कोणाचा हक्क अधिकार, हितसंबंध असल्यास सदर शेतजमीन संदर्भात कोणी साठेखत, खरेदीखत, गहाणखत, बँक बोजा, वाटणीपत्र, मृत्यूपत्र, कोर्ट केसेस, बँक केसेस किंवा तत्सम स्वरुपाचा दस्त केला असल्यास किंवा सदर शेतजमीनवर कोणाचा बोजा हक्क, हितसंबंध असल्यास तसेच मोजणी संबंधी काही तक्रारी, हरकती असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत खालील पत्यावर कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर शेतजमीन निर्वेध निजोखमी, बिनबोजाची आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचीही तक्रार, हरकत आल्यास ती आमचे अशिलाचे खरेदीहक्कावर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होवू नये म्हणून ही खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली असे. ता. १६/०६/२०२५

**सही/-**
**श्री. नरेंद्र मधुकर घोडके**
**बी.एस.एल. एल एल.बी (अॅडव्होकेट)**
**वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर**
**अशिलातर्फे अॅडव्होकेट**
**मो.८६०५१२७५९६**

### खरेदीपुर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, डी।। व सब डी।। सोलापूर तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे बोरामणी येथील शेत जमिन यासी गट नं.२६०/अ/१ (७/१२ प्रमाणे गट नं.२६०/१/अ) याचे एकूण क्षेत्र १ हे ४१ आर. त्याचे आकार रुपये २.०० पैसे यासी चतुःसिमा पूर्वेस - गट नं. २६१, दक्षिणेस - गट नं. २६०/अ२, पश्चिमेस - गट नं. २५९, उत्तरेस - रस्ता. येणे प्रमाणे वर नमूद केलेली शेत जमिन व त्यातील तदंगभूत वस्तू सह ही मिळकत श्री. धोंडीबा पिराप्पा पटणे यांचे एकट्या स्वकष्टार्जीत मालकी व कब्जे वहिवाटीची आहे. त्यांनी सदरील मिळकत आमचे अशिल यांना विक्री करण्याचे ठरवून, त्यांचे कडून इसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे व तसेच सदरचे मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे खात्री व हमी आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी वर नमूद मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे गहाण, दान, लिज, भाडे, लिव्ह अॅन्ड लायसन्स, बक्षिस, साठेखत, खरेदी खत, पोटगी, टाच, जप्ती या व इतर अन्य कोणत्याही स्वरुपाचे बोजा, हक्क, व हितसंबंध असल्यास अथवा सदर मिळकती संबंधी कोणाचे ही कोणत्याही न्यायालयात वाद विषय प्रलंबीत असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ७ (सात) दिवसाचे आत आम्हास खालील नमूद पत्यावर लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी वैध हरकती नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलीही तक्रार व हरकत न आल्यास सदरची मिळकत ही संपूर्ण निर्वेध, निजोखमी व बिन बोजाची आहे, असे गृहीत धरून आमचे अशिल वर नमूद शेत जमिनीचा खरेदीचा पुढचा व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचेही हरकत आल्यास ते आमचे अशिलावर व सदर मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद या खरेदीपूर्व जाहीर नोटीसीने घ्यावी. ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. १३/०६/२०२५

**सही/-**
**अशिलातर्फे अॅडव्होकेट**
**अॅड. अमोल कल्याणी कोटीवाले**
**६० शांती नगर, मार्केटयार्ड जवळ, सोलापूर**
**मो. नं.९८९०९१०९६०**


## HEALTH DEPARTMENT GOVERNMENT OF MAHARASHTRA

Tender Notice 2025-26

### CIVIL SURGEON, SOLAPUR

E Tender for Supply of SUPPLY, INSTALLATION AND COMMISSIONING OF MEDICAL EQUIPMENTS & INSTRUMENTS FOR ASHADHI WARI

**Tender Reference No. CSS/Med.Store/Equipment/ E Tender-01/25-26**

Civil Surgeon, Solapur invites proposals from reputed and experienced companies, Recognized Manufacturers, Authorized supplier to participate in the competitive bidding process to **SUPPLY, INSTALLATION AND COMMISSIONING OF MEDICAL EQUIPMENTS & INSTRUMENTS FOR ASHADHI WARI.**

For the detailed tender documents, interested bidders should visit **http://www.maharashtra.gov.in/tenders.**

Tender submission would be online and the deadline to submit the proposals is 25/06/2025 (04.00 PM)

Civil Surgeon, Solapur

Aryan Creation

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# मंदिर परिसरात सुमारे एक महिना वाहनबंदी

## ● जिल्हाधिकाऱ्यांकडून १३ जून ते १० जुलै काळासाठी आदेश; वाहन जप्तीची होणार कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ जून-**

पंढरपूरातील श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिमद्वार, मंदीर परीसर, पुढे महाद्वार चौक परीसर या भागात आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ (ब) नुसार वाहन प्रतिबंध क्षेत्र घोषीत केल्याचा आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढला आहे. सदरचा आदेश दि. १३ जून ते २५ जून या कालावधीत सकाळी ५ वाजेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत व दि. २६ ते १० जुलै कालावधीत २४ तास या वेळेकरीता लागू राहणार आहे.



पंढरपूरात आलेले भाविक दर्शनरांगेकडे व मंदिराकडे पायी चालत जात असतात. अशावेळी प्रदक्षिणा मार्गावर तसेच जागोजागी दुचाकी, चारचाकी वाहने पार्किंग केलेले असतात. तसेच दर्शनासाठी किंवा अन्य कामासाठी वाहनांची अनावश्यक वर्दळ असते. तसेच पायी जाणारे भाविकांच्यामधून वाहनांची ये-जा होत असते. त्यामुळे रस्ता अरूंद होवून भाविकांना रस्त्यावरून ये-जा करण्यास अडचण निर्माण होते. या ठिकाणी वाहतूक कोंडी होऊन अपघात होण्याचाही धोका निर्माण होऊ शकतो. हे टाळण्यासाठी जिल्हाधिकारी सोलापूर तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी वाहन प्रतिबंधक आदेश पारीत केले आहेत.

### आदेशानुसार वाहनांवर बंदी

श्रीकृष्ण मंदीर, चौफाळा ते श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर पश्चिम द्वार, मंदीर परीसर पुढे महाद्वारचौक परीसर दुचाकी चारचाकी व इतर सर्व वाहने चालवण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच वाहने पार्कींग करता येणार नाहीत. तसेच मंदीर परीसरातील छोटया छोटया अरूंद रस्त्यावर वाहने लावता येणार नाहीत.

### या वाहनांस देण्यात आली सूट

शासकीय सेवा, अत्यावश्यक सेवा, मंदीर परीसरात राहणारे, मंदीरात कामकाज करणारे व्यक्तींचे वाहनांसाठी पोलीस प्रशासनाकडून पास प्राप्त झालेनंतर सदरच्या आदेशातून सूट राहील. वाहनाची पार्कींग व्यवस्था पंढरपूर नगर परीषदेमार्फत करण्यात यावी. नगर परीषदेने बॅरीकेड्स लावावेत. मंदीर परिसरात राहणारे, कामकाज करणारे व्यक्तींकरीता नमुद कालावधीसाठी पास देणेची व्यवस्था पोलीस प्रशासनाने करावी. मंदीर परिसरातील व्यावसायिकांनी मालाची ने-आण करणेकामी पोलीस प्रशासनाशी चर्चा करुन ठराविक वेळ निश्चीत करुन वाहतूक करण्याची खबरदारी घ्यावी.



श्री विठ्ठल मंदिराकडे जाण्यासाठी वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. महत्वाचे तसेच राजशिष्टाचार पात्र व्यक्तीसाठी तसेच दिव्यांग व्यक्तींसाठी श्री विठ्ठल रुक्मीणी मंदीरे समीतीने श्रीकृष्ण मंदीर, चौफाळयापासून ने-आण करण्यासाठी पर्यावरणपूरक वाहनांची व्यवस्था करावी. या व्यतिरिक्त वाहने शिवाजी चौकात पार्कींग करावीत. पंढरपूर शहर पोलीस ठाणे यांनी या आदेशाची अंमलबजावणी कोटेकोरपणे करावी. तसेच आदेशाचा भंग करणर्यांविरोधात वाहन जप्तीची कारवाई करावी. या आदेशाचे उल्लंघन झाल्यास उल्लंघन करणर्या विरुध्द राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अन्वये तसेच भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम २२३ अन्वये कारवाईस पात्र राहिल.

**- कुमार आशीर्वाद,** जिल्हाधिकारी



# मोबाईल चोरणाऱ्या दोन आरोपीस मुद्देमालासह अटक

## बार्शी शहर गुन्हे शाखेची कारवाई

**बार्शी,दि.१३ जून-**

आज शुक्रवारी पहाटे हिरेमठ हॉस्पीटल येथील रुम नंबर ५ मध्ये फिर्यादी महेश अरविंद यादव हे त्यांच्या पत्नीवर औषधोपचार चालू असल्याने ते तेथे झोपले असताना टेबलवर ठेवलेले तीन मोबाईल हे पहाटेच्या वेळी कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेलेबाबत बार्शी शहर पोलीस ठाणेस फिर्यादी महेश यादव, रा. सुभाषनगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बार्शी शहर पोलीस ठाणे गु.र.नं. ५०५/२०२५ बीएनएस कलम ३०५ (१) प्रमाणे गुन्हा दाखल होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने बार्शी शहर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेकडील पोसई उमाकांत कुंजीर यांना त्यांचेकडील डीबी स्टाफ घेवून गेले. मालाचा व अज्ञात आरोपीचा शोध घेणेकामी आदेश दिले. सदर गुन्हयाच्या तपासामध्ये पोसइ उमाकांत कुंजीर यांनी तांत्रीक पध्दतीने तपास करुन हिरेमठ हॉस्पीटलचे सीसीटीव्ही फुटेज चेक केले असता त्यामध्ये रेकॉर्डवरील गुन्हेगार सुदर्शन राजू डोंगर, रा. लोकमान्या चाळ, लातूर रोड, बार्शी याने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीस ताब्यात घेवुन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने गुन्हयाची कबुली देवून सदरचा गुन्हा सुदर्शन राजू डोंगर, वय २४ वर्षे, रा. लोकमान्या चाळ, लातूर रोड, बार्शी व विनायक सतीश देवकर, वय २३ वर्षे, रा. टिळक चौक, बार्शी असे दोघांनी मिळून केल्याचे सांगुन त्यांचे अंगझडतीमध्ये गुन्हयात गेलेले तीन मोबाईल १,४८,०००/- रु. चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपीस गुन्हयामध्ये अटक करण्यात आलेली आहे

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री. अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जालीदर नालकुल, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांचे मार्गदर्शनाखाली बार्शी शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोसइ उमाकांत कुंजीर, सपोफौ अजित वरपे, पोहेकॉ १६६७ अमोल माने, पोहेका १९३ बाबासाहेब घाडगे, पोना ७५९ संगाप्पा मुळे, पोकॉ १९७४ सचिन देशमुख, पोकॉ ७८७ अविनाश पवार, पोकॉ १९९५ सचिन नितनात, पोकॉ २०० राहुल उदार, पोकॉ २०२१ प्रल्हाद अकुलवार, चपोका रामेश्वर मस्के सर्व नेमणूक बार्शी शहर पोलीस ठाणे यांनी केली असून त्याबाबत पुढील तपास पोहेकॉ १६६७ अमोल माने हे करीत आहेत.

# टोकन दर्शन प्रणालीची उद्या होणार चाचणी

## मंदिर समिती संकेतस्थळावर आज करा बुकिंग

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१३ जून -**

मंदिर समितीच्या दि.७ जून रोजीच्या सभेत टोकन दर्शन प्रणालीची दि. १५ जून रोजी प्रथम चाचणी घेण्याचा निर्णय झाला. त्या अनुषंगाने प्रथम चाचणी दिवशी सुमारे १ हजार २०० टोकन उपलब्ध होणार असून, त्याचे बुकींग भाविकांना मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून दि.१४ जून पासून उपलब्ध होत असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रूक्मिणी मातेच्या दर्शनासाठी येणा-या भाविकांना सुलभ व जलद दर्शन देण्यासाठी टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेस, बेंगलोर यांच्याकडून सेवाभावी तत्वावर टोकन दर्शन प्रणाली विकसित करून घेण्यात आली आहे. दरवर्षी वारकरी भाविकांची वाढती संख्या पाहता, भविष्यात दर्शन रांग आणि भाविकांच्या सोयींचे योग्य व्यवस्थापनावर काम करणे अत्यावश्यक आहे. या प्रणालीद्वारे भाविकांना आधीच दर्शनाची वेळ निश्चित करून दर्शनासाठी रांगेत न थांबता, ठरावित वेळेत दर्शनहॉलच्या माध्यमातून मंदिरात प्रवेश करता येणार आहे, ही प्रणाली विशेषत: गर्दीच्या काळात गर्दीचे व्यवस्थापन, भाविकांचा वेळ व श्रम वाचण्यास मदत होण्यास प्रभावी ठरेल. टोकन दर्शन प्रणालीच्या प्रथम चाचणीचे टोकन दि. १४ जून रोजी सकाळी १०.०० पासूनwww.




vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावरून बुकींग करता येणार आहे. ऑनलाईन पध्दतीने तयार झालेले टोकन प्रिंट करून, निश्चित करून दिलेल्या वेळी श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडप, पंढरपूरच्या उत्तरेकडील मागीस बाजूस प्रवेश करून टोकनची पडताळणी करून घेणे व तद्नंतर दर्शनहॉलमध्ये प्रवेश दिला जाईल व वेळेनुसार थेट दर्शन रांगेत प्रवेश होऊन भाविकांचे सुलभ दर्शन होणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

टोकन दर्शन प्रणालीची प्रथम चाचणी घेण्यासाठी आवश्यक ती पूर्वतयारी अंतिम टप्प्यात आली आहे. त्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथील दुस-या व तिस-या माळ्यावर प्रतिक्षा हॉल तयार केले असून, त्याठिकाणी बैठक व्यवस्था, प्रसाधन गृह, पिण्याचे पाणी, चहा, सार्वजनिक सुचना प्रसारण प्रणाली, सुरक्षा रक्षक, दिशादर्शक व आपत्कालिन मार्ग फलक, सीसीटीव्ही कॅमेरे इत्यादी अनुषंगीक व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रथम चाचणीचा शुभारंभ मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या हस्ते व सर्व सदस्य महोदयांच्या उपस्थितीत श्री संत ज्ञानेश्वर दर्शनमंडप येथे दि.१५ जून रोजी सकाळी १०.०० वाजता होणार असल्याचे यावेळी व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगीतले.

# पायरीवरून पडून तुळशांती नगरात तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून -**




शहरातील जुना विडी घरकुल परिसरातील तुळशांती नगरात पायरीवरून पाय घसरून पडल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास घडला. चौडप्पा रामुल काळुर (वय ३६) असे जखमीचे नाव आहे. गुरुवारी रात्री ९ च्या सुमारास घरी असताना, घरातील पायरीवरून चौडप्पा हा पाय घसरून पडल्याने त्याच्या डोळ्याजवळ जखम झाली. तसेच छातीत मार लागल्याने मेव्हण नागेश चंद्री याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## क्रीडा

# पुणे वॉरियर्स व सोलापूर स्मॅशर्समध्ये रंगणार डब्लूएमपीएलचा अंतिम सामना आज

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि १३ जून-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित पहिल्या महिलांच्या महाराष्ट्र प्रीमियर लीग (डब्लूएमपीएल) २०२५ स्पर्धेत उद्या (दि. १४ जून) रोजी होणाऱ्या अंतिम सामन्यात पुणे वॉरियर्स व सोलापूर स्मॅशर्स एकमेकांना भिडणार आहेत. अंतिम सामना महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या गहुंजे येथील आंतरराष्ट्रीय मैदानावर सायं ७ वाजता खेळला जाणार आहे.

पुणे व सोलापूरसह रत्नागिरी जेट्स व रायगड रॉयल्स हे दोन संघ ह्या स्पर्धेत सहभागी झाले होते. साखळी फेरीत पुण्याच्या संघाने त्यांचे सर्व सहा सामने जिंकत थाटात अंतिम फेरी गाठली होती, तर दुसऱ्या बाजूला सोलापूर स्मॅशर्सने सहा पैकी चार सामने जिंकले होते.

पुणे व सोलापूर त्यांचा सलामीचा व अखेरचा साखळी सामना एकमेकांविरुद्ध खेळले होते आणि ह्या दोन्ही सामन्यात पुणे वॉरियर्सने पाच गडी राखून विजय मिळवला होता. असं असलं तरीही, सोलापूर स्मॅशर्स संघाची कर्णधार व आंतरराष्ट्रीय खेळाडू तेजल हसबनीस अंतिम सामन्यासाठी उत्सुक आहे.

''महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने महिलांच्या महाराष्ट्र प्रीमियर लीगच्या माध्यमातून अनेक नवीन खेळाडूंना त्यांचा खेळ मोठ्या स्तरावर दाखवण्याची संधी दिली आहे, त्यामुळे मी त्यांची आभारी आहे. ह्या खेळाडूंनी संधीचं सोनं केलं आहे,'' असं तेजल अंतिम सामन्याच्या पूर्वसंध्येला म्हणाली.





''अंतिम सामन्यासाठी आम्ही सर्व जणी उत्सुक आहोत. आम्ही पुण्याच्या संघासोबत ह्याआधी दोन वेळा दोन हात हात केले आहेत, त्यामुळे आम्हाला त्यांचा खेळ चांगला माहिति आहे. आम्ही सुरुवातीपासून सामन्यावर पकड मिळवण्याचा व अंतिम सामना जिंकण्याचा प्रयत्न करू,''असं तेजल पुढे म्हणाली.

पुण्याविरुद्धच्या अखेरच्या साखळी सामन्यात ईश्वरी अवसरे व तेजल हसबनीस अपयशी ठरल्या होत्या आणि त्याचा परिणाम सामन्याच्या निकालावर झाला होता. त्यामुळे सोलापूरच्या आघाडीच्या फलंदाजांच्या कामगिरीवर अंतिम सामन्याचा निकाल ठरु शकेल.

पुण्याच्या संघाने सांघिक कामगिरी करत प्रत्येक सामना जिंकला असला तरी पुण्याच्या कामगिरीत कर्णधार अनुजा पाटीलच्या अष्टपैलू कामगिरीचा मोठा वाटा राहिला आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडू असलेल्या अनुजाने स्वतःच्या कामगिरीचा वस्तुपाठ घालून देत प्रत्येक खेळाडूकडून उत्तम कामगिरी करुन घेतली आहे. त्यामुळे अंतिम सामन्यात पुणे वॉरियर्स संघाचं पारडं जड असेल.

आकडेवारीचा विचार केला तर सर्वाधिक धावांच्या ऑरेंज कॅप स्पर्धेत सोलापूरची सलामीची फलंदाज ईश्वरी सावकर (६ सामने, २४७ धावा) व तेजल हसबनीस (६ सामने, २३९ धावा) ह्या पहिल्या दोन क्रमांकावर आहेत. तर पुणे वॉरियर्सची खुशी मुल्ला (६ सामने, १४९ धावा) पाचव्या क्रमांकावर आहे. रत्नागिरी जेट्सच्या गौतमी नाईक (६ सामने, १७३ धावा) व स्मृती मानधना (५ सामने, १५२ धावा) ह्या अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर आहेत.

सर्वाधिक बळींच्या पर्पल कॅप स्पर्धेत पुण्याची वेगवान गोलंदाज चिन्मयी बोरपळे (६ सामने, १३ बळी) अव्वल क्रमांकावर आहे, तर पुण्याची कर्णधार अनुजा पाटील (६ सामने, ७ बळी) पाचव्या क्रमांकावर आहे. सोलापूर संघातील फिरकी द्वयी - ऑफस्पिनर मुक्ता मगरे (६ सामने, ९ बळी) व डावखुरी फिरकी गोलंदाज आरती केदार (६ सामने, ९ बळी) अनुक्रमे तिसऱ्या व चौथ्या क्रमांकावर आहेत.

अंतिम सामन्यात दोन आंतरराष्ट्रीय खेळाडू कर्णधार असलेल्या संघांमध्ये होणाऱ्या हा लढतीत, पुणे वॉरियर्स सोलापूर वर सलग तिसरा विजय मिळवणार का साखळी फेरीतल्या दोन सामान्यातल्या पराभवाचा वचपा सोलापूर स्मॅशर्स काढणार हे बघणं औत्सुक्याचं ठरेल.

# रायगड रॉयल्सचा ईगल नाशिक टायटन्सला पराभवाचा धक्का

## महाराष्ट्र प्रीमियर लीग क्रिकेट : सिद्धेश वीरची दमदार नाबाद शतकी खेळी

**पुणे, दि. १३ जून-**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग(एमपीएल) २०२५ स्पर्धेत सिद्धेश वीर(नाबाद १०४धावा) याने केलेल्या दमदार शतकी खेळीच्या जोरावर रायगड रॉयल्स संघाने गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या ईगल नाशिक टायटन्स संघाचा डकवर्थ लुईस नियमानुसार ५ धावांनी पराभवाचा धक्का देत आजचा दिवस गाजवला.

### संक्षिप्त धावफलक

**रायगड रॉयल्स:** २० षटकात ५बाद २१६धावा(सिद्धेश वीर नाबाद १०४(६२,९४,६६), हर्ष मोगवीरा २२, ओंकार खाटपे ३०(१९,२४,२६), अजय बोरुडे नाबाद २७, दिग्विजय पाटील १२, प्रशांत सोळंकी २-३७, मुकेश चौधरी २-४२, योगेश डोंगरे १-४३) वि.वि.**ईगल नाशिक टायटन्स:** १३.४ षटकात ४बाद १३४धावा(साहिल पारीख ४७(२०,५४,३६), अर्शिन कुलकर्णी ३८(२४,३४,३६), रोहन दामले ३४(२३,३६), अथर्व काळे नाबाद १४, रणजीत निकम नाबाद ०, तनय संघवी २-२२, विकी ओस्तवाल १-२२); सामनावीर - सिद्धेश वीर.

गहुंजे येथील महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या मैदानावर सुरु असलेल्या या स्पर्धेत रायगड रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हर्ष संघवी(०)ला नाशिकच्या मुकेश चौधरीने त्रिफळा बाद केले. सिद्धेश वीर व हर्ष मोगवीरा यांनी दुसऱ्या विकेटसाठी ३४ चेंडूत ५८ धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. हर्ष मोगवीरा बाद झाल्यावर सिद्धेशने एकहाती सामना गाजवला. सिद्धेशने अवघ्या ६२चेंडूचा सामना करताना नाबाद १०४ धावांची शतकी खेळी साकारली. सिद्धेशने धडाकेबाज



शतकी खेळी करत ९ चौकार व ६ षटकारांचा पाऊस पाडला. एमपीएलमधील हे दुसरे शतक ठरले. त्यानंतर सिद्धेश वीरने ओंकार खाटपेच्या समवेत तिसऱ्या विकेटसाठी ४२ चेंडूत ७३ धावांची खेळी करून संघाची धावगती वाढवली. ओंकार खाटपे ३० धावा काढून बाद झाला. सिद्धेशने अजय बोरूडेच्या साथीत सहाव्या विकेटसाठी २१ चेंडूत ५७ धावा करून संघाला २००धावांचा टप्पा गाठून दिला. १८व्या षटकाच्या शेवटच्या तीन चेंडूत अजय बोरुडेने आक्रमक खेळी करत सलग तीन षटकार मारले.

२१६ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सलामवीर मंदार भंडारी(०) खाते न उघडताच तंबूत परतला. मंदार भंडारी सलग दुसऱ्या सामन्यात त्रिफळा बाद झाला. अर्शिन कुलकर्णीने २४चेंडूत ३ चौकार व ३ षटकारासह ३८ धावांची खेळी केली. तर, साहिल पारीख २० चेंडूत ४७ धावांची वेगवान खेळी करून त्याला साथ दिली. या जोडीने ३०चेंडूत ५२धावांची भागीदारी करून संघाचा डाव सावरला. पण अर्शिनला आक्रमक फटका मारताना रायगडच्या तनय संघवीने झेल बाद करून नाशिक संघाला दुसरा धक्का दिला. त्यापाठोपाठ साहिल पारीख ४७ धावांवर तंबूत परतला. रोहन दामलेने २३ चेंडूत ३षटकाराच्या मदतीने ३४ धावा काढून संघाची धावगती वाढवली. फिरकीपटू विकी ओस्तवालने रोहन दामलेला पायचीत बाद केले. यावेळी ईगल नाशिक टायटन्स संघ १३.४ षटकात ४बाद १३४ अशा स्थितीत होता. पाऊस सुरु झाल्यामुळे खेळ थांबवण्यात आला. त्यामुळे डकवर्थ लुईस नियमानुसार ५ धावांनी विजय मिळवला.

**समोर न्यूझिलंडचा बलाढ्य संघ. लढत अतिशय चिवट, रथी-महारथी कोसळत आहेत. पराभव होणार हे जवळजवळ निश्चित झाले होते. तरीही चिवट आबिद अली एकटा खिंड लढवित होता. मात्र, त्याला भक्कम साथ मिळाली नाही. म्हणूनच भारताला विजयाचे दर्शन झाले नाही. भारतीय संघाची सुरुवात अंत्यत निराशजनकच झाली. लढवय्येपणाबद्दल ख्याती असलेल्या आबिद अलीने सुरेख अष्टपैलू कामगिरी बजावूनही तो भारतीय संघाला विजयी करू शकला नाही.**

# चिवट आबिद अलीने एकाकी खिंड लढविली



**५० वर्षापूर्वी**
**१४ जून १९७५**
**सुरेश फुलपाटी,सोलापूर**

ओल्ड ट्रॅफडच्या खेळपट्टीवर ५० वर्षापूर्वी म्हणजे १४ जून १९७५ रोजी नाणेफकीचा कौल श्रीनिवास व्यंकटराघवनच्या बाजूने लागला. त्याने प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. पूर्व आफ्रिकेविरुद्ध शानदार अर्धशतक झळकाविलेला सुनिल गावसकर व फारुख इंजिनिअर हे सलामीवीर न्यूझिलंडच्या लुफानी माऱ्यासमोर फार काळ तग धरू शकले नाहीत. अंशुमन गायकवाडच्या (३७) धावा खेरीज एकही फलंदाज खेळपट्टीवर पाय रोवू शकला नाही. गावसकर (१२), इंजिनिअर (२४), विश्वनाथ (०२), ब्रिजेश पटेल (०९) व सोलकर (१३) हे बाद झाले. त्यावेळी भारताची स्थिती ६ बाद १०१ अशी झाली होती. अशा संकटसमयी अबिद अलीने बाह्या सरसावल्या. न्युझिलंडच्या गोलंदाजांवर तुटून पडला, मदनलाल (२०) व्यंकटराघवन नाबाद (२६) यांच्याबरोबर त्याने अनुक्रमे ५५ व ६० धावांची भागिदारी केली. आबिद अलीने १०७ मिनिटांत १ षटकार व ५ चौकारांच्या साह्याने ७० धावा चोपून काढल्या. भारताचा डाव ६० षटकांत २३० धावावार संपला.

भारतीय संघाची आक्रमणाची सुरवात मदनलाल व मोहिंदरने केली. परंतु त्यांचा मध्यमगती मारा ग्लेन टर्नर व मॉरीसन यांच्यावर कसलाही प्रभाव पाडू शकला नाही. व्यंकटराघवने बिशनसिंग बेदीला पाचारण केले. बेदीने लगेचेच त्याने मॉरीसनला इंजिनिअरकरवी बाद करून भारताला पहिले यश मिळवून दिले. जेफ हावर्थ व जॉन पार्कर एकापाठोपाठ तंबूत परतले. त्यावेळी न्यूझीलंडची ३ बाद ७० अशी अवस्था केली. तीन विकेट अनपेक्षित पडूनही ग्लेन टर्नर शांतपणे खेळत होता. आपली एकाग्रता शाबूत ठेवून त्यानी भारतीय गोलंदाजासमोर जबरदस्त आव्हान उभे केले ब्रायन हेस्टिंगला साथीला घेत ४व्या विकेटसाठी ६५ धावांची भागिदारी केली. स्पर्धेतील दुसरे शतक ठोकून ग्लेन टर्नर ५८.५ षटकांत विजयाचे उद्दिष्ट गाठून दिले. ग्लेन टर्नरने नाबाद ११४ धावा केल्या. बिशनसिंग बेदीने प्रभावी मारा करीत केवळ १२ षटकांत ६ षटके निर्धाव टाकीत केवळ २८ धावांच्या मोबदल्यात १ बळी घेतला. जिगरबाज आबिद अलीने १२ षटकात ३५ धावांच्या मोबदल्यात २ बळी घेतले आबिद अलीनेला इतराकडून थोडीसी साथ मिळाली असली तर भारत कदाचीत सामना जिंकू शकला असता.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# जिल्ह्यातील ६१ गावांचा 'धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियाना'त समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

देशातील आदिवासी जमातींच्या आर्थिक व सामाजिक विकासाकरीता धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान ही योजना राबविण्यास केंद्रीय मंत्रीमंडळाने मान्यता दिलेली असून, दि. ०२ ऑक्टोबर, २०२४ पासून ही योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते सुरु करण्यात आली आहे. सोलापूर जिल्ह्यातील तीन तालुक्यांतर्गत येणाऱ्या ६१ गावांचा समावेश या योजनेअंतर्गत करण्यात आलेला असून, या गावातील लाभार्थ्यांनी योजनेत सहभाग घ्यावा, असे आवाहन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे सागर नन्नवरे यांनी केले आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी २५ प्राधान्य क्षेत्रे व १७ मंत्रालये निश्चित करण्यात आली आहेत. याव्दारे आदिवासी जमातीच्या सामाजिक व आर्थिक विकास साध्य करण्याचे उद्दिष्ट आहे. या योजनेमध्ये सोलापूर जिल्हयातील ३ तालुक्यामधील एकुण ६१ गावांचा धाराशिव जिल्हयातील २ तालुक्यामधील ०४ गावांचा समावेश करण्यात आलेला आहे. तरी सदर योजना राबविण्याच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील शासकीय यंत्रणाची जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय समिती स्थापन केली असून या गावामध्ये अभियानाविषयी १५ जुन ते ३० जून या कालावधीत जनजागृती केली जाणार असुन अभियांनात सर्व संबंधित विभागांनी सक्रिय सहभागी व्हावे व अभियानाचा लाभ आदिवासीपर्यंत पाहोचवावा असे निर्देश सोलापूर जिल्हाधिकारी यांच्या सुचनेनुसार संबंधीत यंत्रणेला दिले आहेत.

प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान राज्यात सर्वत्र राबविण्यात येत असुन त्यात राज्यातील ३२ जिल्हयांमधील २१४ तालुक्यामधील ४९७५ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यापैकी सोलापूर जिल्हयातील ६१ गांवाचा समावेश असून अक्कलकोट तालुक्यामध्ये ५१ गावे, सांगोला ०९, मोहोळ ०१ गावांमध्ये १५ जून ते ३० जून यादरम्यान जनजागृती केली जाणार आहे. या संदर्भात नुकताच सोलापुर जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय समितीची बैठक घेण्यात आलेली आहे.

आदिवासींच्या विकासासाठी असणाऱ्या योजनांचा लाभ शेवटच्या टण्यापर्यंत पोहोचविणे, आदिवासी क्षेत्रात सेवा व पायाभूत सुविधा पोहोचविणे हा या उपक्रमाचा उद्देश असून प्रत्यक्ष गावात जाऊन शिबीर आयोजित करुन आधार कार्ड, आयुष्यमान भारत कार्ड, जात प्रमाणपत्र, पोएम किसान, जनधन खाते, ई सेवा पुरविणे तसेच सिकलसेल आजाराविषयी जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच आरोग्य, अन्न, पंचायत राज, ग्रामीण विकास, सामाजिक न्याय, कृषी, महसूल आदी विभागांमार्फत दिल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ देण्यात येणार आहे. असे प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प सोलापूर कार्यालयाकडून कळविण्यात येत आहे.

## महत्त्वाचे...




### डॉ. हेडगेवार रक्तपेढीत कोटक म्युच्युअल फंडतर्फे ३० जणांचे रक्तदान

**सोलापूर, दि. १३ जून-**

डॉ. हेडगेवार रक्तपेढीत कोटक म्युच्युअल फंडतर्फे जागतिक रक्तदाता दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ३० जणांनी रक्तदान केले. कोटकचे सिनिअर मॅनेजर लखन चौगुले, डेप्युटी मॅनेजर प्राजक्ता चौगुले, असिस्टंट मॅनेजर मंजुश्री तळे, रक्तपेढीचे संचालक प्रकाश कुलकर्णी, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, वैद्यकीय अधिकारी सुमेधा कंदलगावकर, जनसंपर्क अधिकारी सुशांत कुलकर्णी आदी उपस्थित होते.

### श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चंदनउटी पुजेची सांगता

**पंढरपूर, दि. १३ जून-**

ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठ्ठरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात करण्यात आली होती. सांगता पुजा मंदिर समितीचे सदस्य व अधिकारी यांच्या हस्ते करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. श्रीविठ्ठलाला उन्हाचा त्रास होऊ नये, त्याची तीव्रता कमी व्हावी, थंडावा मिळावा या भावनेतून ही पूजा केली जाते. विठुरायाप्रमाणे रुक्मिणी मातेला देखील यापद्धतीने चंदन उटी लावण्यात येते. श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्या माधवी निगडे व कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके तसेच ह.भ.प.ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) व व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते झाली. यावेळी सदस्या शकुंतला नडगिरे, विभाग प्रमुख पांडूरंग बुरांडे, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे उपस्थित होते. यंदा प्रथमच, भाविकांना श्रींची चंदनउटी पुजा ऑनलाईन पध्दतीने बुकींग करण्यास उपलब्ध करून दिली होती. या पूजेच्या माध्यमांतून मंदिर समितीला सुमारे ३५ लक्ष १३ हजार इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेकडे अनुक्रमे रूपये २१ हजार व ९ हजार इतके देणगी मुल्य होते. दि.३० मार्च ते १३ जून कालावधीत एकूण पुजेचे ७६ दिवस उपलब्ध झाले होते. त्यामध्ये श्री विठ्ठलाकडे १२१ व रूक्मिणीमातेकडे १०८ पुजा उपलब्ध झाल्या होत्या. यापूजेसाठी अंदाजे ९० ते ९५ किलो चंदनाचा वापर करण्यात आला आहे. याशिवाय, चंदनउटीपुजेच्या सांगते निमित्त श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये विशेष भोजन व्यवस्था करण्यात आली होती.



**मंदिर समितीला या पूजेपासून ३५ लक्ष रूपयाचे उत्पन्न,**

## अक्कलकोट शहरातील गजबजलेल्या भागात चोरी




**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जून-**

शहरातील गजबजलेल्या दाट लोकवस्ती असलेल्या व काही अंतरावरच पोलीस स्टेशन परिसर असलेल्या बुधवार पेठ परिसरात अज्ञात चोरट्यांनी घराच्या मागील दरवाजातुन प्रवेश करून सेचाळीस हजार रुपयाचा एवज चोरून नेल्याची घटना निदर्शनास आली.

सदर चोरीची घटना ९ जुन रोजी सकाळी ९ वा. ते दि.१३ जुन २५ रोजी ७ वा.चे दरम्यान घडली . श्रीशैल बाबुराव हुंडेकरी वय ४६ रा बुधवार पेठ यांनी अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्यात घटनेची फिर्याद दिली आहे . फिर्यादीचे राहते घरी मागील दरवाजातून चोरट्यानी प्रवेश केला . बेडरूम मधील लोखंडी कपाटात ठेवलेले ४६ हजार रूपयाचा ऐवज चोरट्यानी चोरून नेला. ९ जून रोजी ९ वाजता ते दि. १२ जून रोजी ७ वा. चे दरम्यान यातील फिर्यादी हे व्होर्ती ता. इंडी कर्नाटक येथे गेले होते . फिर्यादी हे त्यांचे पाठीमागील दरवाजा बंद करणे विसरून गेले होते. यातील अज्ञात आरोपी यांनी मागील दरवाजातून प्रवेश करून फिर्यादीचे बेडरूम मधील लोखंडी कपाटात ठेवलेले तीस हाजार रूपये रोख रक्कम, चांदीचे ८ तोळे वजनाचे लक्ष्मीची मूर्ती अंदाजे किंमत. चार हजार रूपये, दोन हजार रूपये प्रत्येकी ४ तोळे वजनाचे गणपतीची मूर्ती व समई चार हजार रूपये, चांदीचे ८ तोळ्याचे पैंजण चार हजार रूपये व ८ किलो वजनाचा तांब्याचा हंडा कि.अं चार हजार असे एकुण ४६ हजार रूपयाचा ऐवज चोरून नेला. अधिक तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

## मंद्रुपच्या सोसायटी चेअरमनवरील अविश्वास प्रस्ताव मंजूर

### नऊ सदस्यांचे चेअरमन विरोधात मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१३ जून-**

येथील विविध कार्यकारी सेवा सोसायटी क्रमांक १ चे चेअरमन व माजी आमदार दिलीप माने यांचे समर्थक निखिल प्रविण देशपांडे यांच्याविरुध्द दक्षिण सोलापूरचे सहायक निबंधक यांच्याकडे बारा सदस्यांपैकी व्हाईस चेअरमनसह नऊ सदस्यांनी चेअरमन निखिल देशपांडे सदस्यांना विश्वासात न घेता मनमानी कारभाराचा आरोप करून अविश्वास दाखल केला होता. शुक्रवारी सहायक निबंधकासमोर मतदान घेण्यात आले. १३ सदस्यांपैकी महिला सदस्य रखमाबाई सिंदखेडे या मयत झाले आहेत. त्यामुळे १२ संचालकांपैकी ९ संचालकांनी चेअरमन निखिल देशपांडे यांच्या विरोधात मतदान केल्याने देशपांडे यांच्यावरील अविश्वास प्रस्ताव मंजूर करण्यात आला. अविश्वास मंजूर होताच कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.

**व्हाईस चेअरमन यांचा राजीनामा**

चेअरमन याच्याविरूध्द प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर व्हाईस चेअरमन बाळासाहेब कोरे यांनी स्वेच्छेने राजीनामा दिला. त्यामुळे नवीन चेअरमन व व्हाईस चेअरमन निवड करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

सोसायटी निवडणूकीनंतर शरणप्पा ख्याडे यांना चेअरमन करण्याचे ठरविण्यात आले होते. त्यानुसार त्यांचा अर्जही दाखल करण्यात येणार होता. मात्र शेवटच्या क्षणी निखिल देशपांडे यांनी चेअरमन पदाचा अर्ज भरल्याने ख्याडे समर्थक नाराज झाले होते. तेव्हापासून ते देशपांडे यांना चेअरमन पदावरून काढण्यासाठी प्रयत्न करीत होते. शुक्रवारी त्याला मूहूर्त सापडला.

**नावात बदल**

माझे जुने नाव **राजशेखर चन्नय्या हिरेमठ** असे होते ते आता बदलून **राजशेखर चन्नय्या हिरेमठ** असे ओळखले जाईल. अक्कलकोट येथील मे. कार्यकारी दंडाधिकारी यांचे समोर प्रतिज्ञा पत्र क्र. १०११०/२०२५ दिनांक - १२/०६/२०२५

**जाहीर प्रसिध्दीकरण**

दिवाणी कि. अर्ज नं.११९/२०२५

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिश १ सो, यांचे कोर्टात**

१) **मिनाक्षी महादेव कोरके,**
वय-३९ वर्षे, धंदा- शेती व घरकाम, नोकरी,
रा. भोसे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.
२) **सुयोग महादेव कोरके,**
वय-१६ वर्षे, धंदा- शिक्षण, अज्ञान,
अ.पा.क. जनक आई अर्जदार नं.१
मिनाक्षी महादेव कोरके,
रा. भोसे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर.
— **अर्जदार**

**विरुध्द**

**महाराष्ट्र सरकार**
**(सदरची नोटीस जिल्हाधिकारी सो, सोलापूर यांचेवर बजावण्यात यावी)**
— **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं. २ याचे नांवे असलेली मौजे खंडाळी, ता. मोहोळ, जि. सोलापूर येथील शेतजमिन गट नं. १६४/१ या मिळकतीपैकी अर्जदार नं. २ यांच्या हिस्स्याची ० हे.२५ आर एवढ्या क्षेत्राची मिळकत अर्जदार नं. १ ही अर्जदार नं. २ यांची पालन कर्ती जनक आई या नात्याने विक्री करण्यासाठी मे. कोर्टाची परवानगी मिळावी म्हणून या मे. कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी अर्जातील नमुद अर्जदार नं. १ हिस अर्जदार नं.२ यांचे नांवे असलेली वर नमूद मिळकत विक्रीबाबत कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत अथवा दि.२०/६/२०२५ रोजी समक्ष अथवा वकीलामार्फत कोर्टात हजर राहून आपले म्हणणे मांडावेत. मुदतीत कोणाची कसलीही हरकत न आल्यास अर्जदारांना त्यांचे अर्जात मागणी प्रमाणे अर्जातील नमूद जमिन विक्रीस परवानगी दिली जाईल याची नोंद घ्यावी. हे जाहीर प्रसिध्दीकरण आमचे सहीनिशी व शिक्क्यानीशी दिले असे. ता. ११/०६/२०२५

**सही/-**
**लिपीक**
**जिल्हा न्यायालय, सोलापूर**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, सोलापूर**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**ई-टेंडर सूचना**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम) यांनी खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवल्या आहेत. **निविदा सूचना क्रमांक : 18-2025-SrDENC. कामाचे नाव :** 1. KWV-LUR विभागात LC क्रमांक 10, 34, 36, 39, 47 आणि LUR-LTRR विभागात LC क्रमांक 2, 4, 5 आणि 6 येथे रस्ते वापरकर्त्यांच्या सुरक्षिततेसाठी गेट लॉज आणि इतर विविध कामांमध्ये सुधारणा. 2. अप्रोच रोडमध्ये सुधारणा आणि LUR-LTRR विभागात LC 59 आणि LC 4,5,6 येथे मानक उंची गेजची तरतूद. **कामाची अंदाजे किंमत :** 1,51,95,302.1. बयाणा रक्कम: 2.26.000/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 06 महिने. **देखभालीचा कालावधी :** 12 महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** 07/07/2025 दुपारी 15.00 वाजेपर्यंत, www.ireps.gov.in **वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ : 07/07/2025** दुपारी **15.30** वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीकरण लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो. वेबसाइट : **www.ireps.gov.in**

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम)**
**Akar/Sur-52** **सीआर, सोलापूर**

**तिकिटांसाठी यूटीएस ॲप डाउनलोड करा.**

**केंद्रीय रेल्वे**
**प्रकल्प व्यवस्थापन सेवा पुरवण्यासाठी प्राधिकरण अभियंत्यांची नियुक्ती**

उपमुख्य विद्युत अभियंता/नियंत्रक/मुख्यालय मध्य रेल्वे, 3 रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस. मुंबई-400 001 भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून वेबसाइटद्वारे ऑनलाइन खुल्या निविदा मागवत आहेत: **ई-निविदा सूचना क्रमांक : LC/CSMT/CRP/PMS/2025/01/R,** दिनांक 12/06/2025. **कामाचे नाव:** प्रस्तावाची विनंती (RFP) मध्य रेल्वेच्या भुसावळ, नागपूर, पुणे, सोलापूर विभाग येथे नवीन 2x25 केव्ही TSS/SSP/SP बांधण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सेवा पुरवण्यासाठी प्राधिकरण अभियंताची नियुक्ती. **अंदाजे. निविदा किंमत :** 23,38,00,969.08 (रुपये तेवीस कोटी, अठ्ठावीस लाख, नऊशे, एकोणसत्तर आणि आठ पैसे फक्त). **बयाणा पैसे ठेव (EMD) :** 13,19,000/- (रुपये तेरा लाख, एकोणीस हजार फक्त). **निविदा प्रकार :** सामान्य निविदा. **निविदा प्रणाली :** दोन पॅकेट प्रणाली. **निविदा शैली :** प्रत्येक वेळापत्रकासाठी एकच दर. **निविदा पुस्तिकेची किंमत :** शून्य. **पूर्ण कालावधी:** पावसाळा समाविष्ट करून 36 (छत्तीस) महिने. **ऑफरची वैधता:** निविदा उघडल्याच्या तारखेपासून 120 (एकशे वीस) दिवस. **वेबसाइट पत्ता : http://www.ireps.gov.in** **निविदा कागदपत्रांची उपलब्धता :** निविदा सूचना आणि निविदा कागदपत्रे वरील वेबसाइटवर पाहता येतील. **निविदापूर्व परिषदेची तारीख आणि वेळ:** 27/06/2025 रोजी 12:00 वाजता. **निविदा सादर करण्याची आणि उघडण्याची तारीख आणि वेळ :** आवश्यक कागदपत्रांसह सर्व बाबतीत योग्यरित्या पूर्ण केलेल्या ई-निविदा, 24/07/2025 रोजी 15:00 वाजेपर्यंत. ही निविदा (तांत्रिक निविदा) त्याच दिवशी 15.00 वाजता उघडली जाईल. जर त्या तारखेला सुट्टी जाहीर झाली तर, निविदा दुसऱ्या दिवशी वर सांगितल्याप्रमाणे त्याच वेळी उघडल्या जातील. **वर नमूद केलेल्या कामांसाठी निविदाधारकांसाठी महत्त्वाच्या सूचना : अ)** निविदा केवळ ई-निविदाद्वारेच भरल्या जातील. सर्व इच्छुक निविदाधारकांनी प्रथम IREPS वेबसाइटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. **ब)** संभाव्य निविदाधारकांना सूचित केले जाते की त्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांची ऑफर सादर करण्यापूर्वी, अटी आणि शर्ती, पात्रता निकष इत्यादींबद्दल निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. **क)** वेळोवेळी जारी केलेले निविदा दस्तऐवज आणि शुद्धीपत्रक निविदा उघडण्याच्या किमान 15 दिवस आधी या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि वेबसाइटवर पाहिले जाऊ शकतात. **ड)** आर्थिक दर पृष्ठावर प्रविष्ट केलेले आणि योग्यरित्या डिजिटल स्वाक्षरी केलेले दर केवळ विचारात घेतले जातील. **ई)** जोडलेल्या कागदपत्रांवर निविदाकर्त्याने त्याच्या मुख्य भागावर स्वाक्षरी केली पाहिजे.

**AK-174**

**तिकिटांसाठी UTS ॲप डाउनलोड करा**

**जाहीर समन्स**
**मा. अवसायक दि लक्ष्मी को-ऑप. बँक लि. सोलापूर (अवसायनात)**
३९९ दक्षिण कसबा सोलापूर ४१३००७

**दि लक्ष्मी को-ऑप. बँक लि. सोलापूर (अवसायनात) --- अर्जदार**
**विरूध्द**
**(खालील तपशीलातील नमूद केलेले थकबाकीदार सभासद) --- जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ६०/२०२४ | ५६००५६२ | १ब<br>२क | **शांताबाई भानुदास टाकळीकर** ६५ नाईकवाडि प्लॉट ता. बार्शी जि. सोलापूर<br>**श्रुति संजय काजळे** ६५ नाईकवाडि प्लॉट ता. बार्शी जि. सोलापूर |
| २ | ६१/२०२४ | ९२३५६४६ | १ब<br>२क | **शांताबाई भानुदास टाकळीकर** ६५ नाईकवाडि प्लॉट ता. बार्शी जि. सोलापूर<br>**श्रुति संजय काजळे** ६५ नाईकवाडि प्लॉट ता. बार्शी जि. सोलापूर |
| ३ | २/२०२५ | ३८२६४ | १<br>२ | **अनिता वासुदेव काटकर व सहकर्जदार उमेश वासुदेव काटकर** १२७ सोनी नगर विजापूर रोड सोलापूर<br>**सरोजा रेवणसिद्धप्पा जेउरे** १०० सोनी नगर विजापूर रोड सोलापूर |
| ४ | २२/२०२५ | ४५४३३७ | २<br>४<br>५ | **नारायण सिद्राम पुरुड** ३५/३३३ न्यू पाच्छा पेठ सोलापूर<br>**बालम्माबाई सिद्राम पुरुड** ३५/३३३ न्यू पाच्छा पेठ सोलापूर<br>**रूपाली अशोक पुरुड** ३५/३३३ न्यू पाच्छा पेठ सोलापूर |
| ५ | २३/२०२५ | ६४०९७२ | २<br>४<br>५ | **नारायण सिद्राम पुरुड** ३५/३३३ न्यू पाच्छा पेठ सोलापूर<br>**बालम्माबाई सिद्राम पुरुड** ३५/३३३ न्यू पाच्छा पेठ सोलापूर<br>**रूपाली अशोक पुरुड** ३५/३३३ न्यू पाच्छा पेठ सोलापूर |
| ६ | २४/२०२५ | २६९३०५ | २अ<br>२ब<br>२क | **लता नागेश पुरुड** श्रीया रिजन्सी साखर पेठ सोलापूर<br>**बश्रद्धा नागेश पुरुड** श्रीया रिजन्सी साखर पेठ सोलापूर<br>**भक्ती नागेश पुरुड** श्रीया रिजन्सी साखर पेठ सोलापूर |
| ७ | ४५/२०२५ | ६८१५५ | ३ | **शाम बाळकृष्ण ढोबळे** १०६४ उत्तर कसबा सोलापूर |
| ८ | ८३/२०२५ | ५१३७७ | १<br>२<br>३ | **रविकांत विठ्ठल येलगेटी** ३६९, योगेश्वरी नगर विडी घरकुल सोलापूर<br>**रिझवान कय्युम शेख** ५५, पोर्टर चाळ रेल्वे लाईन सोलापूर<br>**विपुल त्रंबक चिलवेरी** १५३९, Group विडी घरकुल सोलापूर |
| ९ | ९९/२०२५ | ४३४२४ | १<br>२<br>३ | **पवन प्रभूलिंग कोळी** प्लॉट नं २ जयप्रकाश नगर मुळेगाव सोलापूर<br>**विवेक पुरषोत्तम तुम्मा** LIG-६७ I ग्रुप विडी घरकुल सोलापूर<br>**दिपक सत्यनारायन दुस्सा** प्लॉट नं ९५ गोकुळ नगर विडी घरकुल सोलापूर |
| १० | १०१/२०२५ | १३२५४९ | १<br>२<br>३ | **महेंद्र दामोदर आडम** वसुंधरा नगर गोंधले वस्ती सोलापूर<br>**व्यंकटेश नारायण सूंचू** ३०/७५ पद्मा नगर ज्ञानेश्वर मदिर जवळ सोलापूर<br>**श्रीधर व्यंकटेश संचू** ३०/७५ पद्मा नगर ज्ञानेश्वर मंदिर जवळ सोलापूर |
| ११ | १०६/२०२५ | २५२४५ | १ | **अनिता निरंजन बोध्दुल** ८८६/८७ न्यू पाच्छा पेठ अशोक चौक सोलापूर |
| १२ | १०७/२०२५ | ४१७०१ | १<br>२ | **मल्लिकार्जुन सिद्धय्या स्वामी** २०३, कुमठे ता. उत्तर सोलापूर लक्ष्मी मंदिरजवळ सोलापूर<br>**अंबादास रामचंद्र सादुल** ३४/अ/१३ गीता नगर सोलापूर |
| १३ | १०८/२०२५ | ६२०४ | १<br>४ | **सुनिता बसवराज तीर्थ** ३९, मल्लिकार्जुन नगर स्वागत सना बेकरी जवळ सोलापूर<br>**बसवराज सुभाष तीर्थ** ३९, मल्लिकार्जुन नगर स्वागत सना बेकरी जवळ सोलापूर |
| १४ | १०९/२०२५ | ११७३४ | २ | **सुनिता बसवराज तीर्थ** ३९, मल्लिकार्जुन नगर स्वागत सना बेकरी जवळ सोलापूर |
| १५ | ११४/२०२५ | ५५४४५ | १<br>२<br>३ | **शिवाजी नारायण धोत्रे** १९१, विनायक नगर राजराजेश्वरी शाळेजवळ एम आय डी सी सोलापूर<br>**वासुदेव मल्लया एडके** २४ अ न्यू सुनील नगर सोलापूर<br>**कमलाबाई व्यंकटेश तट्टी** १६८, विनायक नगर राजराजेश्वरी शाळेजवळ एम आय डी सी सोलापूर |
| १६ | ११७/२०२५ | ६४१८९ | १<br>२<br>३ | **पुरुषोत्तम सत्यनारायण आरकाल, रितेश पुरुषोत्तम आरकाल** ७/८ भगवान नगर गवळी वस्ती सोलापूर<br>**नरेश यल्लप्पा श्रीकोंडा** ३०, आदर्श नगर जुना कुंभारी नाका सोलापूर<br>**व्यंकटेश सत्यनारायण आरकाल** ७/८ भगवान नगर गवळी वस्ती सोलापूर |
| १७ | ११९/२०२५ | ६५६१९ | १<br>२<br>३<br>४ | **उमा श्रीनिवास वड्डेपल्ली** ६७ स्वामी समर्थ गोंदुताई विडी घरकुल कुंभारी सोलापूर<br>**श्रीकांत सुभाष मिरजकर** प्लॉट नं. ५६ भारतरत्न इंदिरा नगर सोलापूर<br>**नागलक्ष्मी श्रीनिवास येले** प्लॉट नं. १४८/२अ, न्यू पाच्छा पेठ सोलापूर<br>**श्रीनिवास व्यंकटेश वड्डेपल्ली** ६७ स्वामी समर्थ गोदुताई विडी घरकुल कुंभारी सोलापूर |
| १८ | १२१/२०२५ | २४४९९ | १<br>२<br>३ | **विठ्ठल नामदेव बोडा** २१७, जोडभावी पेठ सोलापूर<br>**सायण्णा चंद्रशेखर धुळम** ९, ब्रम्हनाथ नगर विडी घरकुल सोलापूर<br>**नागेश विष्णू दारणा** १५० भगवान नगर झोपडपट्टी सोलापूर |
| १९ | १४८/२०२५ | १५६२३ | २ | **भुवनेश्वरी मल्लिकार्जुन गौरय्यापल्ली** घर नं ६, राघवेंद्र नगर विडी घरकुल सोलापूर |
| २० | १४९/२०२५ | ९३२१ | ३ | **भुवनेश्वरी मल्लिकार्जुन गौरय्यापल्ली** घर नं ६, राघवेंद्र नगर विडी घरकुल सोलापूर |
| २१ | १५५/२०२५ | १०३९१४ | ३ | **भास्कर बसप्पा चिल्लमपुरी** २०९, चाकोते नगर विडी घरकुल शिंदे शाळेजवळ सोलापूर |
| २२ | १५६/२०२५ | २८८४७ | १<br>३ | **हरीश नंदकिशोर गणगे** ८३५/३ निलम नगर महांतेश्वर मठाजवळ सोलापूर<br>**नारायण सिद्राम गडगी** १३५, न्यू सुनील नगर, सोलापूर |
| २३ | १६०/२०२५ | १६६११ | १<br>२ | **मोहन अनिल यरझल** ३३/३, न्यू पाच्छा पेठ शिव हनुमान मंदिर जवळ सोलापूर<br>**उमेश गोपीकृष्ण गुंडेटी** २० ब, मुद्रा सनसिटी अक्कलकोट रोड सोलापूर |
| २४ | १६७/२०२५ | ३६५५९२ | २ | **गोवर्धन लक्ष्मीनारायण पोगुल** २१९, गंगा चौक, श्रमजीवी नगर सोलापूर |
| २५ | १७६/२०२५ | ३०६४७ | २ | **बसवराज रुद्राप्पा माई** १०२ ए/२६, भवानी पेठ सोलापूर |
| २६ | १८९/२०२५ | २८२५६ | २ | **सतीश अंकुश अंबारे** प्लॉट नं. १ मित्र नगर शेळगी सोलापूर |

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार बुधवार दि.०९/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता कागदपत्रासह हजर राहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविणेत येते की वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस आगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.१३/०६/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रे सह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**मा.अवसायक**
**दि लक्ष्मी को-ऑप बँक लि. सोलापूर (अवसायनात)**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# पालिका निवडणुक सुरळीत पार पडणार

● महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार येणारी महापालिका निवडणुक सुरळीत पार पडेल. प्रभाग रचना तयार करण्याच्या प्रक्रियेत माझ्यासह पाचजण असतील. त्या समितीलाही शासनाची मान्यता घ्यावी लागेल, अशी आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले असून त्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नगरविकास विभागाने राज्यातील ड वर्ग महापालिकांना प्रभाग रचना तयार करण्याच्या सुचना दिल्या आहेत.



आयोग आणि शासनाच्या आदेशानुसार निवडणुकीची प्रक्रिया सुरु केली आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे प्रभाग रचना करायची आहे. प्रारुप प्रभाग रचनेचे काम सुरु झाले आहे असे सांगून ते म्हणाले, याबाबतचे वेळापत्रक महापालिकेला प्राप्त झाले आहे. राज्यातील सर्व ड वर्गातील १९ महापालिकांसाठी एकच वेळापत्रक आहे. त्याप्रमाणे प्रभाग रचना तयार करण्यात येईल. यामध्ये कोणतेही अडथळे येणार नाहीत. सध्या पावसाळा आहे. प्रत्यक्ष जागेवर जाऊन काही गोष्टींची तपासणी केली जाईल. प्रारुप रचना झाल्यावर ती प्रसिद्ध करण्यात येईल.



लोकांच्या सुचना हरकती मागवण्यात येतील. त्यावर सुनावणी होऊन अंतिम रचना केली जाईल. त्याला शासनाची तसेच आयोगाची मान्यता घेण्यात येईल, असेही आयुक्तांनी सांगितले.

महापालिका निवडणुकीसाठी वापरली जाणारी मतदान यंत्रे वेगळी आहेत. या यंत्रांची पाहणी केली आहे. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणे हा सर्वात मोठा विषय आहे. आयोगाच्या सुचनेनुसार या प्रशिक्षणाचा दिवस ठरवला जाईल. प्रभाग रचना तयार करण्याच्या प्रक्रियेत माझ्यासह पाचजण असतील. त्या समितीलाही शासनाची मान्यता घ्यावी लागेल, असेही आयुक्तांनी सांगितले.

# सशांची शिकार करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १३ जून-**

कारहुणवी कर निमित्ताने भंडारकवठे येथे चार सशांची शिकार काठीला बांधून त्याची मिरवणूक काढण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना वनविभागाच्या पथकाने ताब्यात घेतले. दस्तगी राजासाहेब मुल्ला (वय ४०), राजाभाई महंमद मुल्ला (वय ३६, रा. दोघे, भंडारकवठे) असे त्या शिकाऱ्यांची नावे आहेत.

कर्नाटक सीमावर्ती भागात बैलपोळा म्हणजे कारहुणवीला विशेष महत्व आहे. यादिवशी गोमातासह बैलांची मनोभावे पूजा करून गावातून सवाद्य मिरवणूक काढण्याची प्रथा आहे. कारहुणवीनंतर दुसऱ्या दिवशी कर साजरी करण्याची प्रथा या भागात आहे. कर साजरी करताना अनेक तरूण शेतशिवारात ससा, हरीण, काळवीट, चित्ता, खारूताई यासह इतर प्राण्यांची शिकार करून यथेच्छ भोजनाचा आस्वाद घेतात. वनविभागाने प्राणीसंरक्षणासाठी प्राणी हत्या करणाऱ्यांवर कडक कारवाई सुरू केली आहे. म्हणून वनरक्षक सुरेश कुर्ले यांनी दोघांना ताब्यात घेतले. तसेच, त्यांनी मारून काठीला अडकवलेले ससे, कुऱ्हाड जप्त केली. सहाय्यक वनसंरक्षक अजित शिंदे, वनपरिक्षेत्र अधिकारी रोहितकुमार गांगुर्डे, वनपाल शशिकांत सावंत यांनी दोघा संशयितांवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले.

## महत्वाचे...



### सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांना अन्वेषण पदक प्रदान

**सोलापूर, दि. १३ जून -**

गुन्हे तपासामध्ये उत्कृष्ठ प्राविण्य दाखविणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांच्या सन्मानार्थ केंद्र सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या प्रतिष्ठित केंद्रीय गृहमंत्री उत्कृष्ठ अन्वेषण पदक सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील मंद्रुप पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक मनोज पवार यांना राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. पुणे येथील पोलिस संशोधन केंद्रात झालेल्या कार्यक्रमात पोलिस महासंचालक शुक्ला यांच्या हस्ते सन २०२२ या वर्षासाठी निवड झालेल्या ११ पोलिस अधिकाऱ्यांना हे पदक आणि प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. हे पदक अशा पोलिस अधिकाऱ्यांना दिले जाते, ज्यांनी खून, दरोडा, जबरी चोरी, अपहरण, लहान मुलींचे लैंगिक शोषण, अंमली पदार्थ विरोधी गुन्हे, फसवणुक, मानवी आरोग्यास धोका करणारे गुन्हे, पोक्सोअंतर्गत गुन्हे यासारखे गंभीर गुन्हे अत्यंत कौशल्याने आणि आधुनिक तपास पध्दतीचा अवलंब करून उघडकीस आणले आहेत. सहायक पोलिस निरीक्षक पवार यांनी अडीच वर्षाच्या बालिकेवरील बलात्कार आणि खुनाच्या संवदेनशील गुन्ह्याचा कौशल्यपूर्ण तपास करून आरोपीला फाशीची शिक्षा मिळवून दिली. ज्याचे न्यायालयानेही कौतुक केले आहे.



### आमदार आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी शिबीर

**सोलापूर, दि. १३ जून -**

शिवसेना प्रणीत कामगार सेनेचे वतीने शिवसेना नेते युवासेना प्रमुख आदित्य ठाकरेंच्या वाढदिवसाच्या निमित्ताने लष्कर या भागात नेत्र तपासणी शिबिर व चाषमा वाटप करण्यात आले. प्रथमतः छत्रपती शिवाजी महाराज व हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन जिल्हाप्रमुख अजय दासरी, उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महानगर प्रमुख दत्तात्रय माने, लोकसभा क्षेत्र प्रमुख संतोष केगनाळकर, नाना मोरे, कामगार सेनेचे अध्यक्ष अजय खांडेकर, रवी म्हेत्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी गरजूंना डोळे तपासून चष्मा देण्यात आले. यावेळी संबंधित डॉक्टर व स्टाफचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कामगार सेनेचे अध्यक्ष रवि म्हेत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचाही सत्कार जिल्हाप्रमुख अजय दासरीसर यांनी केले व शुभेच्छा दिल्या.

### कुंभार वेसमधून ४३ हजारांचे कांद्याच्या बियाण्याचे बॉक्स चोरीस

**सोलापूर, दि. १३ जून -**

कुंभार वेसमधून ४३ हजारांचे कांद्याच्या बियाण्याचे बॉक्स चोरीस गेल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत श्रीकांत बसप्पा गाढवे (वय ४३, रा. मुस्ती, ता. दक्षिण सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ जून रोजी सायंकाळी कुंभार वेसमधील बसवेश्वर कृषी सेवा केंद्रातून श्रीकांत गाढवे यांनी १५ किलो कांद्याचे बियाण्याचे बॉक्स विकत घेतले होते. ते बॉक्स दुकानातच होते. चोरट्याने हे कांद्याच्या बियाण्याचे बॉक्स चोरून नेले. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार शिवशरण पुढील तपास करीत आहेत.

# मनपा शाळांमधील २ हजार विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

▶▶ श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि चंद्रनील सोशल फाउंडेशनचा संयुक्त उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

सोलापूर महानगरपालिकेच्या शाळांसह इतर शाळांमध्ये शिकणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असणाऱ्या तब्बल २ हजार विद्यार्थ्यांना दप्तर आणि इतर शालेय साहित्य वाटपाचा कौतुकास्पद उपक्रम श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ आणि चंद्रनील सोशल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने झाला.

श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे उत्सव अध्यक्ष आणि चंद्रनील सोशल फाउंडेशनचे संस्थापक सी. ए. सुशील बंदपट्टे यांच्या पुढाकारातून हुतात्मा स्मृती मंदिरात गुरुवारी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी अहमदाबाद येथील विमान दुर्घटनेत दगावलेल्या नागरिकांना सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या मूर्तीस अभिवादन करून आणि दीपप्रज्वलन करून झाले. याप्रसंगी सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापुरे, काँग्रेसचे अध्यक्ष चेतन नरोटे, भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे शहराध्यक्ष सुधीर खरटमल, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळाचे ट्रस्टी अध्यक्ष पद्माकर काळे, माजी नगरसेवक विनोद भोसले, काँग्रेसचे प्रवक्ते प्रा. अशोक निबंर्गी, श्री शिवजन्मोत्सव मध्यवर्ती महामंडळ उत्सव अध्यक्ष आणि संयोजक सी.ए. सुशील बंदपट्टे, भाजपाचे माजी नगरसेवक जगदीश पाटील, सुनील रसाळे, श्रीकांत घाडगे, संभाजी आरामाचे संस्थापक श्रीकांत डांगे, सुभाष पवार, काँग्रेसचे युवक अध्यक्ष गणेश डोंगरे, मतीन बागवान, विश्वनाथ गायकवाड, काँग्रेसच्या महिला शहराध्यक्ष प्रमिला तुपलवंडे, हेमा चिंचोळकर, राजाभाऊ कलकेरी, दिपक जाधव, महेश अलकुंटे, ट्रस्टी अध्यक्ष सोमनाथ यमपुरे आदी उपस्थित होते.

याप्रसंगी दोन हजार परिवारातील गरजू विद्यार्थ्यांना दप्तर आणि इतर शालेय साहित्य वाटप करण्यात आले. सी. ए. सुशील बंदपट्टे यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लामकाने यांनी सूत्रसंचालन केले. राजाभाऊ कलकेरी यांनी आभार मानले.



### वडिलांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी उपक्रम

माझे वडील प्राथमिक शिक्षक होते. त्यांना शिक्षणाबद्दल अत्यंत आपुलकी होती. अतिशय खडतर परिस्थितीत स्वतःचा भविष्य निर्वाह निधी खर्च करून त्यांनी आम्हा भावंडांचे शिक्षण पूर्ण केले. समाजातील गोरगरीब घरातील विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन यशस्वी व्हावे अशी त्यांची इच्छा होती. त्यामुळे त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी दरवर्षी चंद्रनील सोशल फाउंडेशनकडून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात येते, असे चंद्रनील सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष आणि संयोजक सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी याप्रसंगी सांगितले.

# दोन लाखांचा घोडा चोरीस

**सोलापूर, दि. १३ जून -**

जुना पूना नाका परिसरातील अवंती नगर येथील मोकळ्या मैदानात बांधलेला दोन लाख रूपये किंमतीचा घोडा चोरट्याने चोरून नेला. याबाबत अतिश वसंत पवार (वय २९, रा. जुना पूना नाका, हांडे प्लॉट, सोलापूर) याने दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ जून रोजी अतिश पवार याने त्यांचा दोन लाख रुपये किंमतीचा घोडा स्वामी विवेकानंद शाळेच्या समोरील मोकळ्या मैदानात बांधला होता. १२ जून रोजी सकाळी तो घोडा त्याठिकाणी नव्हता. त्याचा सर्वत्र शोध घेतला, परंतु तो मिळून आला नाही. त्यामुळे याबाबत फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्हा परिषदेतील कक्ष व कनिष्ठ प्रशासन अधिकारी, सहाय्यकांच्या बदल्या



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १३ जून-**

एकाच विभागात तीन वर्षे किंवा पाच वर्षे पूर्ण झालेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची प्रशासकीय बदली प्रक्रिया जिल्हा परिषदेने पारदर्शक पद्धतीने राबविली. या बदली प्रक्रियेत कक्ष अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यकांच्या बदल्या झाल्या. पाणीपुरवठा विभागातील अविनाश गोडसे यांची सामान्य प्रशासन विभागात, सामान्य प्रशासन विभागातील जगताप यांची शिक्षण विभागात तर पशुसंवर्धन विभागातील सोनवणे यांची पाणीपुरवठा विभागात बदली करण्यात आली आहे .

दरम्यान, बदली केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी तिघांनाही नव्या विभागातील कक्ष अधिकारी पदाचा पदभार तत्काळ स्वीकारून कामकाजास सुरुवात केली. मागील एक ते दोन महिन्यांपासून जिल्हा परिषदेत बदल्यांची प्रक्रिया सुरू आहे. जिल्हा परिषदेच्या सर्वच विभागातील वर्षानुवर्षे काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांची बदली प्रक्रिया सीईओ कुलदीप जंगम, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, सामान्य प्रशासन विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांनी यशस्वीपणे व पारदर्शकपणे पार पाडली.

### ग्रामसेवकांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

सीईओ कुलदीप जंगम यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता वर्षानुवर्षे ठाण मांडलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. यात ग्रामसेवकांपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. मुख्यालयातील अनेक विभागात ३ वर्ष किंवा ५ वर्ष एकाच टेबलवर काम केलेल्यांचीही बदली करण्यात आली. या बदली प्रक्रियेमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचारी, अधिकाऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केली जात आहे.




### रक्तदान श्रेष्ठ दान; पूर्वसंध्येला आवाहन...

सोलापूर : शनिवारी (दि. १४) रक्तदान दिनानिमित्त पूर्वसंध्येला दमानी ब्लड बँकेच्या महिला कर्मचाऱ्यांनी रक्तदान हे श्रेष्ठ दान आहे, असे आवाहन केले आहे. याप्रसंगी टिपलेले छायाचित्र.

### डोक्यात कापडी तागा पडून एकजण जखमी

**सोलापूर :** पद्मशाली चौकातील गांगजी या कपड्याच्या दुकानात काम करताना डोक्यात कापडी तागा पडल्याने तरुण जखमी झाली. हा प्रकार शुक्रवारी सकाळी १०.३० वाजता घडला. कुमार नारायण सिध्दल (वय ३२, रा. एमआयडीसी, सोलापूर) असे तरुणाचे नाव आहे. गांगजी या कपड्याच्या दुकानात कुमार हा कामगार म्हणून काम करतो. शुक्रवारी सकाळी दुकानात काम करताना अचानक कापडी तागा त्याच्या डोक्यात पडला. यात त्याच्या डोक्याला जखम झाल्याने सकाळी ११ वाजता अमर गुर्रम याने उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

▶▶ बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाचा सहावा दिवस

# करमाळ्यात प्रहार आक्रमक; अहिल्यानगर-टेंभुर्णी हायवे रोखला

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१३ जून-**

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते मा,मंत्री बच्चुभाऊ कडू यांच्या अनत्याग आंदोलनाचा सहावा दिवस असून त्यांची तब्येत खूपच बिघडली आहे आज सकाळी त्यांना रक्ताची उलटी सुद्धा झाली पाच किलो वजन कमी झाले आहे संपूर्ण महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात आक्रोश होत असून अनेक प्रकारे आंदोलन केली जात आहे सोलापूर जिल्ह्यात ही कालपासून वेगवेगळ्या ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्यात येत आहेत त्याच धर्तीवर आज करमाळ्यात प्रहार जनशक्ती पक्षाच्या तालुका अध्यक्ष संदीप तळेकर यांचा माध्यमातून बच्चू भाऊंच्या समर्थनार्थ रास्ता रोको आंदोलन करण्यात आले.



करमाळा बायपासला हे आंदोलन ताकतीने पार पडले यावेळी अनेक पक्ष संघटनेने पाठिंबा दिला यात बहुजन शेतकरी संघर्ष समिती,सकल मराठा समाज मनोज जरांगे पाटील गट,शिवसेना (उद्धव ठाकरे शिवसेना गट) रासप, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, संभाजी ब्रिगेड मराठा सेवा संघ, रयत क्रांती संघटना बळीराजा शेतकरी संघटना स्वाभिमानी शेतकरी संघटना तसेच वेगवेगळ्या गावातील ग्रामपंचायतीचे सरपंच यांनी पाठिंबा दर्शवला. यावेळी सर्वच पक्षांच्या पदाधिकाऱ्याकडून मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करण्यात आली सरकारचा निषेध करण्यात आला त्याचबरोबर अनेकांनी आपल्या भाषणातून आपला आक्रोश व्यक्त केला.

जर १४ तारखेपर्यंत बच्चुभाऊंच्या आंदोलनाच्या मागण्या शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी शेतकरी हमी भाव, दुधाला ४० रू भाव मिळावा विधवा निराधार महिलांना ४००० रू मानधन,दिव्यांग बांधवांची ६००० रुपये मानधन वाढ यासह इतर पंधरा मागण्या तात्काळ मान्य केल्या नाही तर आम्ही काय संत नाही आज जरी आम्ही आंदोलन गांधीगिरीचे माध्यमातून करतं असेल तरी भगतसिंग आमच्या डोक्यामध्ये आहे या मार्गाने करण्याचा इशाराही प्रशासनाच्या माध्यमातून सरकारला देण्यात आला.

यावेळी प्रहार चे जिल्हाध्यक्ष दत्ता मस्के-पाटील करमाळा तालुकाध्यक्ष संदीप तळेकर,शेतकरी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष दशरथ अण्णा कांबळे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाच्या महिला जिल्हाध्यक्ष आशाताई टोणपे, शाहू दादा फरतडे शंभूराजे फरताडे, संजय शिंदे, प्रवीण कटारिया पंकज परदेशी, रयत क्रांतीचे राजकुमार सरडे शिवशंकर जगदाळे, प्रहारचे सरचिटणीस बापू तळेकर संभाजी ब्रिगेडचे अतुल निर्मळे आजिनाथ माने नितीन खटके, मराठा सेवा संघ तालुका अध्यक्ष सचिन काळे, स्वराज्य संघटना प्रवीण हांनपुडे मनोज दादा जरांगे पाटील समर्थक उदय भैय्या देशमुख, शेतकरी संघटना क्रांतिकारी अध्यक्ष, अमोल घुमरे, मुस्लिम समाज डॉ तुझ्या अब्दुल कलाम संघटना जमीर भाई सय्यद, प्रहारच्या महिला तालुकाध्यक्ष स्वातीताई गोरे, युवा अध्यक्ष विकी मोरे तालुका उपाध्यक्ष सोमनाथ जाधव पप्पू ढवळे प्रहार चे संपर्कप्रमुख सागर पवार संघटक नामदेव पालवे, राहुल निमगिरे संतोष कुंभार बाळासाहेब काळे, जमीर भाई सय्यद बळीराजा शेतकरी संघटनेचे अण्णासाहेब रुपनवर अमित जागते भीम क्रांती ग्रुप शहाजी धेंडे, एपी ग्रुपचे अध्यक्ष अच्युत पाटील, सागर कुर्डे काका पारखे विजयसिंह ओहोळ योगेश ओहोळ सचिन तळेकर बालाजी अवताडे बंडू शिंदे धनराज भोगल तुषार ढवळे अशोक वीर पप्पू टापरे भाऊ मांढरे आजिनाथ कनेरे यांच्यासह अनेक शेतकरी, पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# तरूणीचा विनयभंग; गुन्हा दाखल

**सोलापूर :** महाविद्यालयीन तरूणीचा पाठलाग करून विनयभंग करणाऱ्यावर जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीत तरूणीच्या फिर्यादीवरुन अनिकेत मुकुंद देडे (रा. माने वस्ती, सम्राट चौक, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एप्रिल २०२५ पासून अनिकेत देडे याने यातील पिडीत तरूणीचा वारंवार पाठलाग करून मैत्री नाही केली तर तिला मारण्याची धमकी दिली. तसेच १२ जून रोजी दुपारी पिडीतेच्या घराजवळ विनयभंग केला.




**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.









## ▸▸ महत्वाचे...

### अकरावी प्रवेश Aइनहाऊस कोटासाठी आज अखेरचा दिवस

**सोलापूर, दि. १३ जून-**

विविध तांत्रिक अडचणीमूळे रखडलेली अकरावी प्रवेश प्रक्रियेला गुरूवार १२ जूनपासून सुरूवात झाली आहे. ऑनलाइन नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रवेश टप्यामधील व्यवस्थापन कोटा, संस्थाअंतर्गत कोटा, अल्पसंख्याक कोट्यातील प्रवेशास प्रारंभ झाला आहे. दरवर्षी ऑफलाइन पद्धतीने होणारी अकरावी प्रवेश प्रक्रिया यंदा ऑनलाइन करण्यात आली आहे. प्रक्रियेतील पारदर्शकतेमुळे विद्यार्थ्यांची आर्थिक लूट थांबली आहे. शिवाय हुशार व गरीब मुलांना प्रवेश मिळण्यास मदत होणार आहे. ऑनलाईन प्रक्रीयेत १२ ते १४ जून या कालावधीत व्यवस्थापन, संस्था, अल्पसंख्याक कोटांतर्गत विद्यार्थ्यांना मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय मान्य असेल तर प्रोसेस्ड फॉर ॲडमिशनवर क्लिक करावे, असे विद्यार्थ्यांना सांगितले आहे. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे अपलोड करून व संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयात जाऊन, मूळ कागदपत्रांची पडताळणी करून विहित शैक्षणिक शुल्क भरून प्रवेश निश्चित करावयाचे आहे. अल्पभाषिक, अल्पसंख्यांक संस्थांसाठी इनहाऊस कोटामधील प्रवेशासाठी आज १४ जून अंतिम मुदत आहे. या कालावधीत संस्थेला त्यांच्या कोट्यातील विद्यार्थ्यांना प्रवेश देता येणार आहे. मात्र त्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे आहे. संस्था कोटातील प्रवेश प्रक्रीया संपल्यानंतर गुणवत्ता यादीनुसार प्रवेशप्रक्रीया सुरू होणार असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.



### बिल देण्याच्या कारणातून तिघांना मारहाण

**सोलापूर, दि. १३ जून-**

कुमठा नाका परिसरातील संजय नगर येथे बिल देण्याच्या कारणावरून पती-पत्नीसह मुलीला मारहाण करण्यात आली. ही म ारहाण गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास झाली. नागसेन गौतम गायकवाड (वय ४०), रिया नागसेन गायकवाड (वय१०) व आरती नागसेन गायकवाड (वय ३२, सर्व रा. संजय नगर, कुमठा नाका) असे मारहाण झालेलयाची नावे आहेत. बिल देण्याच्या कारणावरून धम्मपाल सर्वगोड बरोबर नागसेन याची तक्रार झाली. यातून धम्मपाला याने गुरुवारी रात्री दहाच्या सुमारास त्याचे दोन भावांच्या मदतीने नागसेनला त्याच्या पत्नीसह दगडाने व लाथाबुक्यांनी मारहाण केली. नागसेनच्या डोक्याला तर रियाच्या चेह-याला जखम झाली आहे. त्याचबरोबर आरतीच्या सर्वांगास मुकामार लागल्याने रात्री ११.२० वाजता ते सर्वजण उपचारास दाख्ल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

# शहरातील पाणीपुरवठ्याचे होणार सर्वेक्षण : आयुक्त डॉ. ओम्बासे

▸▸ रस्त्यावरील ड्रेनेजलाईनच्या तुटलेल्या झाकणांचा प्रश्नही ऐरणीवर
▸▸ शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजवण्याच्या दिल्या सूचना
▸▸ बे टाईम, दिवसभर पाणीपुरवठा होत असलेल्या ठिकाणांचीही पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून**

शहरात विविध रस्त्यांवर तुटलेले आणि वर-खाली असलेल्या ड्रेनेज झाकणांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. बे टाईम, दिवसभर पाणीपुरवठा होत असलेल्या ठिकाणांचीही पाहणी करण्यात येणार आहे. तसेच रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याचे आदेश संबंधित अधिकाऱ्यांना दिले आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिली.



सोलापूर शहरात विविध रस्त्यांवर ड्रेनेज चेंबर वर बसविण्यात आले आहेत. ही झाकणे निकृष्ट दर्जाची असल्याने वारंवार तुटतात. निकृष्ट दर्जाची ही झाकणे असल्याचा आरोप होतो. तसेच काही ठिकाणी ड्रेनेज झाकणे वर खाली आहेत. यामुळे अपघात होतात. अशा ड्रेनेज चेंबर वरील झाकणांचे सर्वेक्षण तत्काळ करण्यात यावे. त्याचा अहवाल तातडीने पाठवावा, असे आदेश महापालिका आयुक्त डॉ. सचिन उंबासे यांनी सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांना दिले आहेत. दरम्यान, सोलापूर शहरात काही परिसरांमध्ये नियोजित वेळेपेक्षाही अधिक म्हणजे दिवसभर पाणीपुरवठा होतो तर काही ठिकाणी कमी वेळ पाणीपुरवठा होतो. अशा दोन्ही ठिकाणच्या पाणीपुरवठ्याची माहिती घेण्यासंदर्भातही आरोग्य अभियंता चौबे यांना सूचित केले आहे.

सात रस्ता येथील नाना नानी पार्क उद्यानात नियमानुसार कामे झाले नाहीत. त्या कामांचा प्राथमिक अहवाल मागविण्यात आला आहे. शहरात २२ किलोमीटर अंतराच्या रस्ता दुभाजकांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. त्यापैकी काही झाडे जळाली आहेत. त्या तक्रारीनुसार थर्ड पार्टी तपासणीही करण्यात येत आहे.





त्याचा अहवाल आठवडाभरात प्राप्त होईल. त्याचबरोबर महापालिका उद्यान विभागाकडूनही याची तपासणी करण्यात येणार आहे. त्यानंतरच इस्टिमेट नुसार वृक्ष लावले का नाहीत याची तपासणी होऊन पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### ● चार इंडोस्कोपी कॅमेऱ्याद्वारे शोधणार जलवाहिनी गळती

सोलापूर शहरातील विविध ठिकाणी जलवाहिनी गळतीचे प्रकार घडतात. ते शोधण्यासाठी सर्वत्र मोठ्या प्रमाणात खोदकाम करावे लागते. ते टाळण्यासाठी अत्याधुनिक इंडोस्कोपी कॅमेरे वापरण्यात येणार आहेत. या कॅमेरातून व्हिडिओ आणि फोटोही उपलब्ध होणार आहे. मक्तेदारामार्फतच हे चार कॅमेरे उपयोगात आणले जाणार आहेत. कामाप्रमाणे त्यांना बिले अदा करण्यात येतील. वर्क ऑर्डर दिली आहे. यासाठी महापालिकेने दोन कोटीची तरतूद केली आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी सांगितले.

### ● सर्व कायदेशीर प्रक्रिया करून अनधिकृत बांधकाम पाडणार

सोलापूर शहरात यापूर्वी बोगस बांधकाम परवाना देऊन करण्यात आलेली ९६ प्रकरणे त्याचबरोबर केलेल्या सर्वेक्षणात ४० अनधिकृत बांधकामे आढळून आले आहेत. या सर्वांना नोटिसा बजावण्यात येत आहेत. सर्वेक्षण सुरू आहे. ऑनलाइन बांधकाम परवानासाठी अर्ज करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत. ऑनलाइन बांधकाम परवानगीसाठी अर्ज केलेल्यां बांधकामाची तपासणीसह नियमानुसार प्रक्रिया पार पाडणार आहे. तर ऑनलाईन अर्ज न करणाऱ्या संबंधितांवर नोटीस बजावून योग्य संधी देऊन तसेच कायदेशीर प्रक्रिया पार पाडून अनधिकृत बांधकाम पाडण्यात येणार आहे. तत्पूर्वी पंधरा दिवसात अनधिकृत बांधकाम स्वतःहून पाडून घेण्याची नोटीस बजावण्यात येणार आहे. अशा प्रकरणात तांत्रिक अभियंत्यांवरही दंडात्मक कार्यवाही करण्यात येणार आहे, असे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले.

### ● पाकणी जलशुद्धीकरण केंद्रासाठी जागा हस्तांतरणाची प्रक्रिया सुरुच

दुहेरी जलवाहिनी अंतर्गत प्राथमिक जलशुद्धीकरण केंद्रासाठी वन विभागाची जागा हस्तांतरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सध्या पुण्यात प्रस्ताव आहे. त्यानंतर नागपूरला यावर पुढील कार्यवाही होणार आहे. येत्या दीड ते दोन महिन्यात ही कार्यवाही पूर्ण होईल, असेही डॉ. ओम्बासे यांनी सांगितले.

### ● रोस्टर तपासणीनंतर सहाय्यक आयुक्तपदी मिळणार पदोन्नती

सोलापूर महापालिकेतील स्थानिक आस्थापनेवरील सहा अधिकाऱ्यांना सेवा जेष्ठतेनुसार सहाय्यक आयुक्त पदी पदोन्नती मिळणार आहे. त्यासाठी नगर विकास विभागाकडे रोस्टर मंजुरीसाठी पाठवले आहे. ती प्रक्रिया लवकरच पूर्ण होईल. त्यानंतर पात्र तीन-चार अधिकाऱ्यांना सहाय्यक आयुक्त पदी पदोन्नती मिळू शकणार असल्याचेही महापालिका आयुक्तांनी स्पष्ट केले.

## ७ लाखांचे द्राक्ष व चिकू परस्पर विकले

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून -**

७ लाख ३ हजार रुपये किंमतीची द्राक्षे व चिकूचा माल परस्पर विकल्याप्रकरणी ओडिसाच्या ट्रकचालकाविरुध्द एमआयडीसी पालिसठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**ओडिसाच्या ट्रकचालका विरुध्द गुन्हा दाखल**

याबाबत लाडजी यासीन नदाफ (वय ३९, रा. बिस्मीला नगर, मुळेगाव रोड, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरुन रियाजुद्दीन साफिकुर रहमान (वय ३७, रा. मिरजापूर, पूना बझार, भद्रक, ओडिसा) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ३ मार्च रोजी लाडजी नदाफ याने हैद्राबाद रोडवरील त्यांच्या परिचयाचे जाजपूर ओडिसा येथील एस के शाहरूख ए जी ट्रान्सपोर्टचे मालक यांच्या सांगण्यासाठी त्यांच्या रिकाम्या टेम्पों क्र. ओडी ०२ सीएल ९३६३ मध्ये ६७० कॅरेट द्राक्षे व ७९ कॅरेट चिकू असे एकूण ६६ लाख २ हजार ९०० रुपयांचा ७४९ कॅरेट माल भरून दिला. त्या टेम्पोंवरील चालक रियाजुद्दीन रहमान याने गाडीतील माल न्यु फ्रेश फ्रुट सेलरचे मालक मैदुल यांना कोलकत्ता येथे पोहोच न करता त्याने तो माल कोठेतरी मध्येच विकून नदाफ यांची फसवणुक केली. म्हणून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक इंगळे पुढील तपास करीत आहेत.

## पावसाचा जिल्ह्याला यलो अलर्ट

**खरीपाच्या पेरणीला पावसाची खीळ**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

गेल्या काही दिवसांपासून थांबलेला मान्सून अखेर राज्यात सक्रिय झाला आहे. पुढील ४८ तासांत मान्सून संपूर्ण विदर्भ व्यापणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. यासोबतच कोकणात अतिमुसळधार पावसाचा, मध्य महाराष्ट्रात मुसळधार, तर मराठवाडा व विदर्भात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात पुणे, नाशिक, कोल्हापूर, सातारा घाटमाथ्यावर जोरदार पावसाची शक्यता आहे. तर सोलापूर जिल्ह्यातही यलो अलर्ट असल्याने जोरदार पावसाची शक्यता असून, या पावसाने खरिपाच्या पेरणीचा अक्षरशः घोटाळाच केला आहे.

दरम्यान, मे महिन्यात अवकाळी पावसाने कहर केल्याने २३० मिमी इतका पाऊस सोलापुरात नोंदला गेला तर जून महिन्यात आजतागायत ४५.६ मिमी इतका पाऊस नोंदला गेला आहे. मान्सूनचा प्रवास थांबलेला असतानाही आता तो दक्षिण-पूर्व मध्य प्रदेश ते हरियाणा, तसेच आंध्र किनारपट्टीपासून ओडिशा आणि छत्तीसगड दिशेने पुढे सरकत आहे. या सर्व हवामान स्थितीमुळे मान्सूनला पूरक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळेच मुंबईसह कोकण, मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पावसाची शक्यता आहे.

### ▸▸ राज्यात हवामान खात्याकडून दिले असे अलर्ट

रेड अलर्ट (अतिमुसळधार पाऊस) रायगड - १४ जून, सिंधुदुर्ग - १५ जून, ऑरेंज अलर्ट (मुसळधार पाऊस), मुंबई - १४ जून, ठाणे - १४ जून, रायगड - १३, १५, १६ जून, सिंधुदुर्ग - १३, १४, १६ जून, कोल्हापूर घाटमाथा - १३, १६ जून, सातारा घाटमाथा - १३, १६ जून, सांगली - १३ जून, अकोला, अमरावती - १३ ते १५ जून, चंद्रपूर, गडचिरोली - १३ ते १५ जून, गोंदिया, नागपूर - १३, १४ जून

### ▸▸ यलो अलर्ट (वादळी वारे, विजांसह पाऊस)

पालघर, ठाणे, मुंबई, धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, पुणे, सातारा, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अमरावती, वर्धा, वाशिम, यवतमाळ, भंडारा

### ▸▸ ओल्या दुष्काळाची भीती

गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेला पाऊस अखेर गुरुवारी (१२ जून) रात्री जिल्ह्याच्या काही भागात जोरदार पडला. मेघगर्जना, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह झालेल्या या पावसाने शेतकरी बांधवांना अक्षरशः थक्क केले. काही भागांमध्ये मुसळधार सरी बरसल्या, तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपात पावसाने हजेरी लावली. सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. रात्री १२ वाजण्याच्या सुमारास जिल्ह्याच्या काही भागांमध्ये पावसाने जोरदार हजेरी लावली. या पावसामुळे आता जमिनीचा वापसा होण्यास विलंब लागणार असून, असाच पाऊस लागून राहिला तर पेरणी अजून लांबण्याची शक्यता आणि ओला दुष्काळही पडण्याची भीती जाणकार शेतकरी वर्तवित आहेत.

## फ्लॅट व बांधकामासाठी पैसे घेऊन फसवणूक; गुन्हा दाखल

● **फ्लॅटसाठी ९२ तर बांधकामासाठी १२ लाख रुपये घेतले**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून -**

फ्लॅट व बांधकामासाठी पैसे घेऊन १ कोटी ४ लाखांची फसवणुक केल्याप्रकरणी दोघांविरुध्द सदर बझार पोलिस इाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबत अनस बशीर शेख (वय २८, रा. रेल्वे लाईन, ताज हॉटेल, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अब्दुल रशीद अब्दुलगनी बाडीवाले (रा. रा. सम्राट नगर, मजरेवाडी) आणि आसिफ इक्बाल नजीर सय्यद (रा. लुडस अपार्टमेंट, मोदी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऑगस्ट २०२२ मध्ये अनस शेख यांसकडून अब्दुल रशीद बाडीवाले व आसिफ सय्यद यांच्या मजरेवाडी येथील सम्राट नगरातील सर्व्हे नं. ५४/६२ मधील इंम्पिरिअर टॉवर येथील फ्लॅट नं. ५०१,५०२ आणि ३०१ हे तीन फ्लॅट खरेदी करण्यासाठी बाडीवाले व सय्यद यांनी दुय्यम निबंधक वर्ग २, उत्तर सोलापूर या कार्यालयात ९२ लाख ६ हजार रुपये घेतले. पैसे दिल्यानंतर बाडीवाले व सय्यद यांनी खरेदी खत करून देतो असे म्हणून अद्यापपर्यंत खरेदी खत करून दिलेले नाही. तसेच बांधकामासाठी बाडीवाले व सय्यद यांना पैसे कमी पडू लागल्यावर त्यांनी अनस शेख यांचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून आणखी ११ लाख ७० हजार रुपये घेतले. फ्लॅटच्या किंमतीशिवाय बाडीवाले व सय्यद यांनी शेख यांच्याकडून जादा पैसे घेऊनदेखील शेख यांना फ्लॅटची खरेदी करून दिलेली नाही. त्यामुळे याबाबत फसवणुक झाल्याचे निदर्शनास आल्याने शेख यांनी याबाबत सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक निरगुडे पुढील तपास करीत आहेत.

# ‘फार्मर आयडी’ नोंदणी नसल्यास पीएम किसान सन्मान निधी नाही

▸▸ जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले
▸▸ जिल्ह्यातून ६० टक्के शेतकऱ्यांचीच नोंदणी
▸▸ उर्वरित शेतकऱ्यांनी फार्मर आयडी घ्यावा

**तभा वृत्तसेवा । अविनाश गायकवाड**
**सोलापूर, दि. १३ जून-**

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध शेतीविषयक योजनांचा लाभ घ्यायचा असल्यास शेतकऱ्यांकडे शेतकरी ओळखपत्र असणं आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी विकास मंत्रालयाकडून ‘ॲग्रीस्टॅक’ या डिजीटल उक्रमाद्वारे शेतकऱ्यांना ओळखपत्र देण्यासंदर्भात निर्णय घेतला गेला आहे.

महाराष्ट्रात देखील शेतकऱ्यांना ॲग्रीस्टॅक अंतर्गत डिजीटल शेतकरी ओळखपत्रासाठी नोंदणी करावी लागणार आहे. या फार्मर आयडीसाठी सोलापूर जिल्ह्यातील ८ लाख ९३ हजार ६७७ शेतकऱ्यांपैकी ४ लाख १३ हजार ३८१ शेतकऱ्यांची ५९.८५ टक्के ऑनलाईन नोंदणी झाली आहे. दरम्यान, उर्वरित शेतकऱ्यांनी नोंदणी न केल्याने त्यांना या महिन्याखेरला पडणार पीएम किसान स

तालुकानिहाय स्थिती पाहता बार्शी तालुक्यातून ४२ हजार २५३, करमाळा ४९ हजार ७१९, उत्तर सोलापूर १२ हजार ०६४, अक्कलकोट ३५ हजार ७२२, द. सोलापूर २६ हजार ५५३, मंगळवेढा ३३ हजार ७०९, पंढरपूर ४८ हजार ४०७, माळशिरस ४७ हजार १५८, माढा ४१ हजार ७१८, मोहोळ ३३ हजार ५४३, सांगोला ४२ हजार ५३५ अशी जिल्ह्यातील एकूण ४ लाख १३ हजार ३८१ शेतकऱ्यांनी फार्मर आयडीसाठी नोंदणी केली आहे. आता या शेतकऱ्यांना शासनस्तरावरून शेतकरी ओळखपत्र लवकरच मिळणार आहेत.




### फार्मर आयडीसाठी काय लागतात कागदपत्रं?

केंद्र व राज्य सरकारकडून शेतीविषयक योजना चालवल्या जातात. त्या योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र आवश्यक आहे. हे ओळखपत्र काढण्यासाठी आधार कार्ड, सात बारा उतारा, गट क्रमांक, नमुना ८ अ खाते उतारा क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि लाभार्थी शेतकरी नोंदणीवेळी उपस्थित असणं आवश्यक आहे. फार्मर आयडी नोंदणीसंदर्भात तलाठी कार्यालय, कृषी सहाय्यक आणि सीएससी केंद्र चालकांशी संपर्क करून आपला अर्ज ऑनलाईन भरता येतो.

### पीएम किसान सन्मान निधीसाठीही लागणार फार्मर आयडी

शेतकऱ्यांना जर पीएम किसान सन्मान निधीच्या आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास फार्मर आयडी मिळवावा लागेल. पीएम किसान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना एका वर्षामध्ये ६००० रुपयांची रक्कम तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. त्यामुळं आगामी हप्त्याची रक्कम मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना फार्मर आयडी मिळवणं आवश्यक आहे. यामुळे शेतकरी बांधव ई-सेवा केंद्रांवर गर्दी करताना दिसून येत आहे.

### फार्मर आयडी सर्व शेतकऱ्यांनी लवकर काढावा

ॲग्रीस्टॅक हे असं डिजीटल फाऊंडेशन असेल ज्याद्वारे डेटा आणि डिजीटल सेवा वापरुन शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलं जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांना डिजीटल ओळखपत्र दिलं जाईल. त्यामध्ये त्यांच्या शेतीसंदर्भातील माहितीचा समावेश असेल. यामध्ये प्रामुख्यानं नोंदणीचे तीन संच असतील. यामध्ये शेतकऱ्यांचा आणि त्याच्या शेतांचा आधार संलग्न नोंदणी संच, भूसंदर्भिकृत व्याप्त दर्शवणारा गाव नकाशांचा नोंदणी संच, हंगामी पिकांचा नोंदणी संच असेल. यामुळे जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा.

**- शुक्राचार्य गायकवाड,** जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी

### कार्ड नाही काढाल तर शासकीय योजनांना मुकाल

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, पीक विमा योजना, कृषी विभाग यांत्रिकीकरण योजना, थेट लाभाच्या हस्तांतरण योजना, पीक कर्ज सुलभपणे मिळवण्यासाठीच्या या ओळखपत्राचा उपयोग होणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र काढणे आवश्यक आहे. जर शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढलं नाही तर त्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळं नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढणं आवश्यक आहे.

### १८ वर्षे वयानंतरच मिळणार किसान क्रेडिट कार्ड



किसान क्रेडिट कार्ड योजनेत शेतकऱ्यांना अर्थिक मदत दिली जाते. या योजनेसाठी अर्जदाराचे वय किमान १८ वर्षे असावे लागते. मात्र योजनेमध्ये कमाल वयाची मर्यादा नाही. आता सरकार या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त ५ लाख रुपयांचे कर्ज देण्यात येणार आहे. हे कर्ज पाच वर्षांपर्यंत घेता येते. किसान क्रेडिट कार्डची वैधता देखील पाच वर्षांपर्यंत आहे.

### करोडो शेतकऱ्यांचा फायदा

केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विविध घोषणा केल्या आहेत. यामधील महत्वाची घोषणा म्हणजे किसान क्रेडिट कार्डची मर्यादा वाढवण्यात आली आहे. ही मर्यादा ३ लाख रुपयांवरुन ५ लाख रुपये करण्यात आली आहे. शेतकरी आता १ एप्रिल २०२५ पासून ५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जासाठी अर्ज करु शकतील. याचा फायदा करोडो शेतकऱ्यांना होणार आहे.

## २४ जूनपासून दहावी, बारावीची पुरवणी परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर , दि. १३ जून-**

राज्य शिक्षण मंडळाने ५ मे रोजी बारावीचा, तर १३ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर केला. या परीक्षांतील अनुत्तीर्ण, एटीकेटी प्राप्त विद्यार्थी, श्रेणी सुधार करू इच्छिणारे विद्यार्थी यांना संधी मिळण्यासाठी पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. पुरवणी परीक्षा जुलै-ऑगस्टमध्ये घेतली जात होती. मात्र, यंदा परीक्षा लवकर घेतली जाणार आहे. विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यात आले आहेत.



राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावीच्या जून - जुलै पुरवणी परीक्षेचे प्रवेशपत्र ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आले आहेत. २४ जूनपासून या पुरवणी परीक्षांना सुरुवात होणार आहे. राज्य मंडळाच्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इयत्ता दहावी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इयत्ता बारावी पुरवणी परीक्षा जून-जुलै मध्ये होणार आहेत. त्यानुसार इयत्ता बारावी अभ्यासकमाची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै या कालावधीत आहे. तसेच इयत्ता बारावी माहिती तंत्रज्ञान, सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने १५ व १६ जुलैला होईल. तर, २४ जून ते ८ जुलै या कालावधीत दहावीचे प्रात्यक्षिक, तोंडी, अंतर्गत मूल्यमापन केले जाणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११४६

**तुजसीं अंतराय होईल । मग सांगे आमुचें काय उरेल ।**
**तेणे दुःखे हिये फुटेल । तुजवीण कृष्णा ।।**

नितीनियमाला अनुकुल असे वर्तन केल्यानंतर, तसेच धर्माचरण केल्यानंतर म्हणजेच सत्कर्मानंतर ईश्वर प्राप्ती होते. ही ईश्वर प्राप्ती मला माझ्या अनेक जन्मीच्या पुण्याईने झाली आहे. माझ्यामध्ये जोपर्यन्त सत्कर्माची भावना आहे, जोपर्यन्त मी सद्वर्तनी असणार आहे तोपर्यन्तच ईश्वर माझ्यासोबत राहील आणि ज्या क्षणी मी वाईट, अयोग्य वर्तनास प्रारंभ करेन तेव्हा ईश्वर आपोआप माझ्यापासून दूर जाईल. म्हणून मी हे लाखो लोकांच्या हत्येचे पाप करणार नाही असे अर्जुन भगवंतांना म्हणाला. जेव्हा ईश्वर आपल्यापासून दूर जाईल तेव्हा त्याच्या विरहाने आपले हृदय दुःखाने फुटून जाईल अशी भीती त्याने वर्तविली. ईश्वर हा सत्याचा अंश आहे. जिथे चांगुलपणा, सदवर्तन, न्यायी आचारविचार आहेत त्या ठिकाणी ईश्वराचे वास्तव्य आहे. वाईट, अन्याय, दुष्कृत्य घडतील तेव्हा त्या ठिकाणाहून ईश्वर आपोआप दूर निघून जाईल. अर्जुनाच्या, तुजसीं अंतराय होईल । मग सांगे आमुचें काय उरेल । तेणे दुःखे हिये फुटेल । तुजवीण कृष्णा ।। या वक्तव्यातून हे लक्षात येते की, ईश्वराचे स्थान सद्वर्तनी माणसांजवळ आहे. आपण जर सदवर्तनी असू तर ईश्वराला ईतरत्र शोधण्याची गरज नाही. मी लाखो निष्पाप लोकांच्या, आप्तेष्टांच्या मृत्यूला कारणीभूत झालो तर माझ्या पुर्व पुण्याईने प्राप्त झालेला ईश्वर माझ्यापासून दूर जाईल व माझी होणारी हानी कशानेही भरुन निघणार नाही. म्हणून मला राज्य सुखोपभोग नको तर ईश्वरच पाहिजे असे अर्जुन म्हणतो आहे. त्याचे म्हणणे विचार करण्यासारखे आहे. अशी व्दीधा अवस्था घालवण्यासाठी श्रीकृष्णांसारखाच गुरु आवश्यक आहे.



उद्यानात आग लागली तर कोकीळ किंवा ईतर कोणताही पशु, पक्षी, त्या उद्यानात थांबत नाहीत. चिखलयुक्त सरोवर पाहून चकोर त्यातील जलाचे सेवन करीत नाही. याप्रमाणे आपल्यातील पुण्याचा ओलावा संपला व पाप अंगाला चिकटले तर प्राप्त झालेला ईश्वर दूर जाईल असे अर्जुनाला वाटते. राज्यसुख किंवा ईतर सुखोपभोगापेक्षा आपणाला ईश्वरच पाहिजे ही अर्जुनाची मानसिकता आहे. अर्जुनाच्या या मानसिकतेशी आपण आपली मानसिकता जुळवायला हरकत नाही. प्रयत्न केला तर आपली मानसिकता अशी होऊ शकते. अनेकांना ईश्वर, किंवा संतसंगापेक्षा धनसंपदाच जास्त आवडते त्यामुळे लोक खऱ्या सुखापासून दूर असतात. ईश्वरालाही सतत सत्ता, संपत्ती किंवा नाशवंत बाबी मागत असतात. सत्ता, संपती, सौंदर्य हे नाशवंत असून ईश्वर व संतसहवास खऱ्या अर्थाने शाश्वत व सुखावह आहेत याचा बोध या ओवीतून घ्यायला हवा. हा बोध घेतला आणि जीवनात उतरवला तर खऱ्या अर्थाने आनंद मिळू लागेल असे आम्हास वाटते. संतांच्या वचनांचे अर्थ हे आम्ही आमच्या अल्पबुध्दीने काढत आहोत. त्यामुळे आपल्यासारख्या सुजाण वाचकांनी आमच्या चुका, उणीवा आपल्या पदरात घ्याव्यात अशी याप्रसंगी प्रार्थना करीत आहोत.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# मोकाट जनावरांनी घेतला दुभाजकाचा कब्जा

### रोपांची होतेय नासधूस; महापालिकेचे दुर्लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून-**

सोलापूर शहरातील विजापूर रोड विविध अतिक्रमनासाठी प्रसिद्ध बनला आहे. एकीकडे भाजी विक्रेते फूटपात रस्ता सोडण्यास तयार नाहीत; तर दुसरीकडे मोकाट जनावरे देखील त्यांचाच कित्ता गिरवत रस्त्यावर तर कधी दुभाजकांमध्ये अतिक्रमण केल्याचे दिसत आहे. एरवी रस्त्याच्या मधोमध ठिय्या मांडणाऱ्या मोकाट जनावरांनी आज विजापूर रोडवरील दुभाजकांचा कब्जा घेतल्याचे दिसून आले. विजापूर रोडवरील सोनी कॉलेज समोरील दुभाजकांमध्ये ओळीने मोकाट जनावरे बसलेले दिसून आले. जणू हेच आमचे घर असा त्यांचा अविर्भाव होता.



दरम्यान, स्मार्ट सिटी अनेक अतिक्रमण वाढत आहेत. अतिक्रमणच्या संख्येमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असताना प्रशासन कारवाई करताना दिसत नाही. सत्तर फूट मार्केट येथे कारवाई केली. परंतु या कारवाई मधून सातत्यता समोर आली नाही. वास्तविक पाहता शहरांमध्ये अनेक मार्केट रस्त्यावर भरतात. त्यामुळेच ही मोकाट जनावरे येथे सर्रासपणे फिरतात. त्यांच्यामुळे रहदारीला मोठ्या प्रमाणात अडथळा होतो.

शहराच्या विविध स्मार्ट रस्त्यांवर मोकार जनावरे सर्रासपणे फिरतात. रस्त्याच्या मधोमधच ठिय्या मांडतात. अशातच अपघात होण्याचा धोका बळावतो. मात्र याकडे महापालिका प्रशासन आणि संबंधित कोंडवाडा विभाग अनभिज्ञ असल्याचे दिसत आहे. आज देखील विजापूर रोडवर हे चित्र दिसून आले. दुभाजकांमध्ये रोपांऐवजी मोकाट जनावरे दिसून आली. रस्त्याच्या मधोमध असणारे दुभाजक आणि त्यामध्ये बसलेले जनावरे भरधाव वेगाने येणाऱ्या वाहनधारकांसाठी अपघाताला आमंत्रण देणारे ठरत होते.

#### मोकाट जनावरांचा सुळसुळाट

सोलापूर स्मार्टसिटीत मोकाट जनावरांचा नेहमीच प्रश्न निर्माण होत आहे. भाजी मार्केट, प्रमुख महामार्ग तसेच अंतर्गत रस्त्यांवर जनावरे बसतात. यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागते. याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे.

**- संतोष पवार, वाहनधारक**

#### गुरे वाहक वाहन मारत्यांची केवळ नावालाच गस्त

सोलापूर महानगरपालिकेचे स्वतंत्र कोंडवाडा विभाग आणि गुरे वाहक वाहन तसेच यंत्रणा कार्यान्वित आहे. मात्र शहरातील विविध भागात फिरणाऱ्या मोकाट जनावरांवर कारवाई करतात की नाही याबाबत साशंकता आहे. मार्केट असलेल्या ठिकाणी सदरचे गुरे वाहक वाहन केवळ उभारलेले असते. कोंडवाडा विभागातील कर्मचारी केवळ नावालाच गस्त घातलात का असा प्रश्न आता स्थानिक नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

#### शहरात व प्रमुख महामार्गावर देखील जनावरांचा कब्जा

एरव्ही सोलापूर शहरात व अंतर्गत रस्त्यांवर मोकाट जनावरे फिरतात. मात्र महामार्गावर देखील मोकाट जनावरांचा वावर वाढलेला आहे. महामार्गावर वाहने भरधाव वेगाने येतात. अशा परिस्थितीत भयंकर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याकडे संबंधित कोंडवाडा विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.

**- संजय राठोड, वाहनधारक**

## पत्ता विचारणाऱ्यावर ब्लेडने हल्ला; दोघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

पत्ता विचारणाऱ्यावर ब्लेडने हल्ला करून जखमी करणाऱ्या दोघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन विलास गायकवाड (वय ४०, रा. रामवाडी मशिद जवळ) यांच्या फिर्यादीवरुन मुक्या बोधीवाले व गणेश बोधीवाले (रा. नळबझार चौक, लष्कर, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ जून रोजी नळ बझार चौकात सचिन गायकवाड यांनी त्यांच्या ओळखीच्या मुक्या बोधीवाले व गणेश बोधीवाले या दोघांना राम जमादार यांचा पत्ता विचारला. त्यावेळी बोधीवाले या दोघांनी गायकवाड यांस आम्हांला कशाला पत्ता विचारतो, मी का त्याच्याकडे कामाला आहे का असे म्हणून मुक्याने गायकवाड यास शिवीगाळ करून त्याच्या हातातील ब्लेडने गायकवाड यांच्यावर वार करून जखमी केले. तसेच गणेश याने माहाण केली. हवालदार पापडे पुढील तपास करीत आहेत.

# अखेर ‘ते’ वादग्रस्त स्वच्छतागृह बंद

### वीरशैव व्हिजनसह समस्त सिद्धेश्वर भक्तांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून-**



सिद्धेश्वर मंदिराच्या ईशान्य दिशेला लक्ष्मी मंडई समोर विष्णू घाट येथे प्रवेशद्वार आहे. तेथील स्वच्छतागृह बंद करण्याचा निर्णय महापालिका प्रशासनाने २९ मे रोजी घेतला होता. त्या निर्णयानुसार ११ जून रोजी ते वादग्रस्त शौचालय कायमचे बंद करण्यात आले आहे. वीरशैव व्हिजनसह, अनेक संघटनांनी व सिद्धेश्वर भक्तांनी ही मागणी केली होती. यासाठी ५ फेब्रुवारीपासून लढा सुरू केला होता. त्याला ११५ दिवसांनी यश आले.

प्रवेशद्वाराच्या शेजारी सुलभ शौचालय आहे. तसेच तिथे कचराकुंडीत कचरा टाकला जातो, प्रचंड घाणीचे साम्राज्य असते. त्यामुळे वीरशैव व्हिजनने ते शौचालय हटवण्याची मागणीचे निवेदन आयुक्त सचिन ओंबासे व अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांना दिले होते. त्यानंतर २५ महिला संघटनांनी एकत्र येऊन सिद्धेश्वर मंदिरात महाआरती केली होती. तसेच बसव ब्रिगेडचे पत्र आंदोलनही सुरू होते. या इमारतीत बदल करून महापालिका घनकचरा व्यवस्थापन कार्यालयासाठी वापर करणार आहे. तसेच पर्यायी स्वच्छतागृह मंडई येथील राखील जागेत बांधणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

#### समस्त सिद्धेश्वर भक्तांना आनंद



जगात मंदिराच्या प्रवेशद्वार शेजारी शौचालय कोठेच आढळून येणार नाही. पण सिद्धेश्वर मंदिराच्या दारापुढे होते. त्यामुळे वीरशैव व्हिजनने महापालिका आयुक्त यांच्याकडे ते शौचालय हटवण्याची मागणी केली होती. आमच्या मागणीला अनेक भक्तांनी बळ दिला. भक्तांच्या या बळाच्या आधारावर मनपाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे शौचालय बंद केले आहे. याचा समस्त सिद्धेश्वर भक्तांना आनंद झाला आहे.

**- राजशेखर बुरकुले,** अध्यक्ष, वीरशैव व्हिजन



## श्राविका महाविद्यालयात साने गुरूजी पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

उमाबाई श्राविका क. महाविदयालय आणि अ.भा. साने गुरुजी कथामाला महाविदयालयीन शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविदयालयात साने गुरुजी पुण्यतिथीनिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी प्राचार्य सुकुमार मोहोळे यांच्या हस्ते साने गुरुजी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक प्रा. गणेश लेंगरे यांनी केले. आभार प्रा.अर्चना कानडे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा कंगळे यांनी केले. यावेळी प्रा. सोमनाथ राऊत, प्रा. प्राजक्ता काळे, प्रा. कल्याणप्पा हायगोंडे उपस्थित होते.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शनिवार | दिनविशेष - चांगला दिवस, संकष्टी चतुर्थी |
| दि. १४ जून २०२५ | जाग. रक्तदाता दिन |
| विक्रम संवत् २०८१ | ....राहू काल.... |
| शके - १९४७ | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| संवत्सर - विश्वावसु | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| मास - ज्येष्ठ | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| कृ. तृतीया (१५.४६) | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| ऋतु - ग्रीष्म | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| नक्षत्र - उत्तराषाढा (२४.२१) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| योग - ब्रह्मा (१२.१२) | शनिवार : स. ९ ते १०.३० |
| करण - बव (२७.५१) | |

### राशीभविष्य

**मेष :** बुद्धीचे कामे अधिक करू नका. आहारात नियमितता ठेवा. व्यापार मध्यम राहील. व्यक्तिगत समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. कुटुंबातील जबाबदारीकडे लक्ष द्या.

**वृषभ :** अडकलेली कामे वेळेत पूर्ण होतील. व्यापारात फायदा होईल. मोठ्या लोकांशी संबंध वाढतील. आर्थिक चिंता सलत राहील. कौटुंबिक तणाव रहाण्याची शक्यता.

**मिथुन :** आपल्या चातुर्याचे आपले अधिकारी कौतुक करतील. चांगल्या बातम्या ऐकण्यास मिळतील. आर्थिक आवक वाढेल. कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा.

**कर्क :** व्यवसायात अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. भ्रमात न राहता स्व:विवेक बुद्धीने काम करा. कौटुंबिक परिस्थिती तणावपूर्ण राहील.

**सिंह :** शुभचिंतकाची भेट झाल्यामुळे आनंदी रहाल. कौटुंबिक व सामाजिक स्तरावर मान सन्मान व प्रतिष्ठा मिळेल. खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

**कन्या :** विचारपूर्वक काम करून आर्थिक स्थिती सुधरू शकता. आशाजनक वातावरण निर्माण होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. प्रवास शक्यतो टाळा.

**तुळ :** कोणत्यातरी प्रसिद्ध व्यक्तिशी संबंध वाढतील. आरोग्य चांगले राहील व्यापारामध्ये विस्तार होईल. स्थावर मालमत्तेची विक्री करतांना घाई गडबड करू नका.

**वृश्चिक :** कौटुंबिक सहकार्य मिळाल्याने आजचा दिवस आनंदी जाईल. पराक्रम व क्षमतेमुळे आपल्याला यश व फायदा होईल. खर्च विचार करून करा. रोजगारात प्रगती राहील.

**धनु :** धार्मिक, शुभकार्याची आखणी कराल. आपल्या लोकप्रियतेचा फायदा होईल. आरोग्य मध्यम राहील. मेहनतीवर विश्वास ठेवा चांगले फळ मिळेल. कौटुंबिक सुख मिळेल.

**मकर :** चांगल्या व्यक्तींचा संप ठेवा. आर्थिक आवक वाढणार आहे. आपल्यापेक्षा मोठ्या लोकांचा आदर व सेवा करा. आळस सोडून द्या. समाजात आपली पत वाढेल. मानसिक ताण कुटूंबाचा खूप राहील. आर्थिक फटका बसेल.

**कुंभ :** व्यापारातील फायदा, मानसिक प्रसन्नता व उत्साह वाढविल. मुलांच्या भविष्याची काळजी राहील. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**मीन :** रोजगारात परिवर्तन कींवा नवीन संधी चालून येईल.



## वालचंद कॉलेजच्या विद्यार्थिनीचे यूपीएससी परीक्षेत यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्सच्या, राज्यशास्त्र विभागामध्ये पीएचडी करणाऱ्या संपदा वांगे यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या सनदी सेवेच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

संपदा वांगे यांनी अखिल भारतीय सनदी सेवेच्या परीक्षेत ८३९ वा क्रमांक मिळवला आहे. त्या वालचंद कॉलेजमध्ये राज्यशास्त्र विभागाच्या पीएचडी संशोधन केंद्रामध्ये राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सिद्राम सलवदे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय राज्यघटनेतील अल्पसंख्यांक विषयक तरतुदींचा चिकित्सक अभ्यासविषयावर संशोधन करीत आहेत. या यशाबद्दल त्यांचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोहर जोशी, प्रा.डॉ.संगमेश्वर नीला, प्रा. डॉ. सतीश मित्रगोत्री, प्रा. अभिजीत जाधव, संतोष सरसमकर, मनोज मुळकुटकर उपस्थित होते.

## पी.एफ. कार्यालयातील खाजगी दलालांवर कारवाई करा; अन्यथा आमरण उपोषण

### कामगार सेनेचे विभागीय आयुक्तांना दिले मागण्यांचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून-**

सोलापूर भविष्य निर्वाह निधी कार्यालयात येणाऱ्या, खाजगी दलालांवर कारवाई करा अन्यथा महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने, आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा व मागण्यांचे निवेदन विभागीय आयुक्त पुरुषोत्तम मीना यांना कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष विष्णू कारमपुरी यांच्या नेतृत्वाखाली विडी कामगारांच्या शिष्टमंडळाद्वारे दिले आहे.

दरम्यान, सोलापूर भविष्य निर्वाह निधी, विभागीय कार्यालयात खाजगी दलालांचा मोठ्या प्रमाणात वावर होत असून, पी.एफ कार्यालयातील अधिकारी व खाजगी दलालांच्या संगनमताने, गरीब व अशिक्षित महिला विडी कामगारांची आर्थिक फसवणूक करून, लूट करत आहेत. याबाबत महाराष्ट्र कामगार सेनेच्या वतीने अनेक वेळा विभागीय आयुक्तांना निवेदन देण्यात आले. तरीदेखील दलालांचा वावर कमी होताना दिसत नाही. गरीब कामगारांची लूट थांबत नसल्याने दलालांना कार्यालयात बंदी न केल्यास आमरण उपोषण आंदोलन करण्याचा इशारा निवेदन देण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्तांनी शिष्टमंडळाबरोबर चर्चा करून, यापुढे दलालांचा बंदोबस्त केला जाईल, असे आश्वासन दिले. या कार्यालयात येणाऱ्या सर्व कामगारांना कार्यालयीन कर्मचारी व सुरक्षारक्षक यांच्याकडून योग्य वागणूक देण्यात यावी. अशी ही मागणी करण्यात आली.

यावेळी शिष्टमंडळात, रेखा आडकी, विठ्ठल कुराडकर, पप्पू शेख, श्रीनिवास बोगा, गुरुनाथ कोळी, राधिका मिठ्ठा, सविता दासरी, राणी दासरी, पद्मा मॅकल, लक्ष्मी गुंटला, शोभा पोला, यांच्यासह विडी कामगार व कामगार सेनेचे पदाधिकारी यांचा समावेश होता.

## वर्ल्ड फादर्स-मदर्स डे निमित्त रविवारी सत्कार

**सोलापूर, दि. १३ जून-**

जागतिक वडील (वर्ल्ड फादर डे) व जागतिक आई (मदर डे) दिनाच्या निमित्ताने अशाच पद्मशाली समाजातील काही निवडक पालकांचा रविवार दि. १५ जून रोजी ‘सन्मानपत्र’ देऊन गौरवण्यात येणार आहे, अशी माहिती फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गौरीशंकर कोंडा, पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा मेघा इट्टम यांनी दिली. पूर्व भागातील दाजीपेठ येथील श्रीराम मंदिरात रविवारी सकाळी ११.३० वाजता विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात येत आहे. वडील, अल्पशिक्षित असूनही, आपली मुले आपल्यासारखे आयुष्य न जगता भविष्यात मोठ्या हुद्यांवर गेले पाहिजे, म्हणून प्रतिकूल परिस्थितीवर मात करुन, आपल्या मुलांना शिक्षणाची गोडी लावली. त्यांना खंबीर साथ म्हणून विड्या वळणा-या पत्नीने रात्रंदिवस काबाडकष्ट करुन आपल्या मुलांना संस्कार, शिक्षण दिले अशा आई- वडिलांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# राज्यात तीन वर्षांत अपघातांमध्ये ४६ हजार निष्पापांचा बळी

### दर १० हजार वाहनांमागे सात अपघात; वेगाची नशा जीवावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

राज्यात दरवर्षी ३२ हजारांहून अधिक अपघात होत असून, त्यात सरासरी १५ हजार नागरिकांचा मृत्यू, तर २८ हजार ५०० नागरिक जखमी होत आहेत. राज्य शासनाच्या अहवालानुसार मागील वर्षी दर १० हजार वाहनांमागे सात अपघातांची नोंद झाली आहे. २०१५ मध्ये हे प्रमाण तब्बल २५ इतके होते. अहवालानुसार, गत तीन वर्षांत राज्यात अपघातांमध्ये ४६ हजार निष्पापांचा बळी गेला आहे.

राज्यात दरवर्षी सरासरी २२ लाख नवीन वाहनांची नोंद होत असते. तसेच डिसेंबर २०२४ पर्यंत राज्यात वाहन चालवण्याचा वैध परवाना संख्या ४ कोटी २८ इतकी होती, तर सुमारे २६ लाख शिकाऊ परवाना वितरीत करण्यात आले होते. त्यामुळे राज्यभरात कोट्यवधी वाहने दररोज रस्त्यावर धावत असतात. त्यात वाहतूक नियमांचे पालन न केल्यामुळे अपघात होतात.

#### अतिवेगामुळे अपघाती मृत्यू...

सर्वाधिक अपघात वाहनांच्या वेगामुळे झाल्याचे समोर आले आहेत. अतिवेगामुळे अपघात होऊन सर्वाधिक मृत्यूही झाले आहेत. त्यामुळे बेशिस्त वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई केली जाते. तसेच रस्ते सुरक्षा या संकल्पनेवर आधारित पथनाट्ये व व्याख्याने आयोजित केली जातात. त्यामुळे अपघातांची संख्या घटण्यास मदत होत असल्याचे बोलले जात आहे. २०१५ साली राज्यात दर १० हजार वाहनांमध्ये २५ अपघात होत असत, आता हे प्रमाण ७ पर्यंत आले आहे.

#### एका वर्षात दीड कोटी वाहनधारकांवर कारवाई...

बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी राज्यात सुमारे ६ हजार ३०० ई-चलान उपकरणे वाहतूक पोलिसांना देण्यात आली आहेत. तसेच ९६ इंटरसेप्टर वाहनेही महामार्गांवर कार्यरत आहेत. मागील वर्षी १ कोटी ६९ लाख बेशिस्त चालकांना १ हजार ५३३ कोटी रुपयांचा दंड करण्यात आला. त्यापैकी सुमारे ४० लाख चालकांनी दंड भरला आहे, तर १ कोटी २७ लाख १५ हजार चालकांकडील सुमारे १ हजार २३४ कोटी रुपयांची दंडवसुली अद्याप बाकी आहे.

#### राज्यातील रस्ते अपघात...

| वर्ष | अपघात | मृत्यू | जखमी |
|---|---|---|---|
| २०२२ | ३३,३८३ | १५,२२४ | २७,२३९ |
| २०२३ | ३५,२४३ | १५,३६६ | २९,७६४ |
| २०२४ | ३६,०८४ | १५,३३५ | ३०,७३० |

## एमआयएमच्या वतीने आज गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

### माजी खासदार इम्तियाज जलील यांची उपस्थिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

एमआयएम पक्षाच्या वतीने शनिवार १४ जून रोजी सायंकाळी ७ वाजता सोलापुरातील हुतात्मा स्मृती मंदिर येथे माजी खा. इम्तियाज जलील यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. दरम्यान, विविध कार्यक्रमाचे आयोजनही करण्यात आले आहे, अशी माहिती माजी नगरसेवक तौफिक हत्तुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हुतात्मा स्मृती मंदिरातील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यात माजी आ. ॲड. वारीस पठाण (मुंबई),सोलापूरचे निरीक्षक अन्वर सादात (हैदराबाद) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. याप्रसंगी यूपीएससी आणि एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या यशस्वीतांचाही सन्मान करण्यात येणार आहे. दरम्यान, सहारा मल्टीपर्पज हॉल नई जिंदगी, जिंदाशहा मदार चौक या ठिकाणी कार्यकर्ता संवाद मेळावा होणार आहे.

सायंकाळी ६ वाजता माजी नगरसेवक तौफिक हत्तुरे यांच्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. शाहिद खरादी यांच्या कार्यालयाचे उद्घाटन सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे. या पत्रकार परिषदेत नदीम डोणगावकर, शौकत पठाण, अजहर हुंडेकरी, सादिक नदाफ आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.

## महत्वाचे...



### वटवृक्ष मंदिरातील सत्कार जीवनातील मोठा गौरव : भाजपा प्रवक्ते केशव उपाध्ये

**अक्कलकोट दि.१३ जून-**

स्वामी कृपेने माझ्या जीवनातील पत्रकार ते प्रवक्ता ही वाटचाल आणि दर्शनानंतर लाभलेलं असून श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरातील विश्वस्त समितीच्या वतीने झालेला सत्कार म्हणजे जीवनातील मोठा गौरव असल्याचे मनोगत भारतीय जनता पार्टीचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी व्यक्त केले. ते येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास सहकुटुंब भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी प्रवक्ते केशव उपाध्ये यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे,विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, सुनिल कटारे, प्रा.शिवशरण अचलेर, गिरीश पवार, विपुल जाधव, रवी मलवे, प्रसाद सोनार, महेश मस्कले, दर्शन घाटगे उपस्थित होते.



### सांगोला येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाचे तहसीलदारांना निवेदन

**सांगोला, दि. १३ जून-**

श्री शनिशिंगणापूर मंदिराच्या पवित्र चौथऱ्यावर अन्य पंथियांना प्रवेश दिल्याबद्दल तात्काळ कार्यवाही करावी या मागणीचे निवेदन सांगोला येथे महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या वतीने तहसीलदारांना देण्यात आले. हिंदू मंदिरांमध्ये इतर धर्मिय कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे विशेषतः ज्यांच्या आचरणात मांसाहार, गोमांससेवन व धर्म परंपरेप्रती अनास्था आहे अशा व्यक्तींना मंदिरांच्या अंतर्गत पवित्र स्थळांमध्ये प्रवेश देणे हे मंदिराच्या सात्विकतेला आणि धार्मिक परंपरांना बाधा पोहोचवणारे आहे तसेच हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावणारे आहे. पावित्र्य भंग करणारे आहे तरी ज्यांनी कोणी या कामाचे कंत्राट दिले आहे व त्यांची नियुक्ती केली आहे त्यांचे निलंबन करून त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे, या मागणीचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री, अहिल्यानगर जिल्हा, जिल्हाधिकारी यांच्या नावाने सांगोला येथे तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी डॉ. मानस कमलापुरकर, श्रेयश तोडकरी, अजय तेली, गणपत पटेल, नवनाथ कावळे, विकास गावडे, भीमाराम चौधरी, बिरुदेव आगलावे, बाळासाहेब सावंत, विकास सावंत, अक्षय गायकवाड, किशोर शास्त्रे, मच्छिंद्र माने, गोपाळ देशपांडे, विक्रम चव्हाण उपस्थित होते.



### शिवसेना (शिंदे गट) कामगार सेनेच्या जिल्हाध्यक्षपदी जाधव

**करमाळा, दि.१३ जून -**

करमाळा तालुक्यातील कामगारांसाठी सतत लढणारे व सम ाजकार्यात उल्लेखनीय असणारे करमाळा तालुक्याचे सुपुत्र अमोल जाधव यांनी १ मे कामगार दिनाच्या औचित्याने शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. श्रमिक कामगार सेना शिंदे गट महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सुरेश मोहिते यांच्या आदेशानुसार व महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष बाबासाहेब चव्हाण व महाराष्ट्र संघटक विजय लोळे यांच्या नेतृत्वाखाली शासकीय विश्राम गृह करमाळा येथे अमोल जाधव यांची श्रमिक कामगार सेना (शिवसेना शिंदे गट)सोलापूर जिल्हाअध्यक्षपदी निवड करण्यात आली. यावेळी शिवसेना (शिंदे गट) तालुका उपाध्यक्ष दादासाहेब तनपुरे, युवासेना शहरप्रमुख विशाल गायकवाड, पै.आदित्य जाधव, भाळवणी सरपंच पांडुरंग वाघमारे, पिंपळवाडी उपसरपंच दत्तात्रय चव्हाण, नवनाथ काळे, भीमराव नाळे, चेतन आव्हाड, मजनू शेख, मदन अडसूळ, आर्यन भोसले, रोहन परदेशी, योगेश बेंद्रे, अविनाश वाघमारे, अमोल भोसले, स्वप्निल कांबळे, सुशील गायकवाड, गणेश झिंजाडे, सोनू भोसले, सोनू वाघमारे उपस्थित होते.

### चौभेपिंपरी येथील शिबिरात ६५ जणांचे रक्तदान

**मोडनिंब, दि. १३ जून-**

भारतीय सैनिकांच्या सन्मानार्थ, सर्व महामानवांच्या जयंती निमित्त चौभेपिंपरी ग्रामस्थांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पार पडलेल्या शिबिरात ६५ जणांनी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पोलीस हवालदार धनाजी माळी, शेतकरी सेना (शिंदे गट) जिल्हाध्यक्ष योगेश जाधव, सरपंच प्रतिनिधी हनुमंत खताळ, रासपा जिल्हाध्यक्ष विकास आलदर, ग्रामपंचायत सदस्य सुनील देवकर, संतोष उरमोडे, अशोक बंडगर, धनेश भगत, किशोर बोरकर, सतिश बनसोडे, पोलीस पाटील भारत लंबटकर, तंटामुक्ती अध्यक्ष दत्तात्रय खताळ उपस्थित होते. शिबीर यशस्वीतेसाठी काका चव्हाण, श्रीकांत दबडे, पांडुरंग जाधव, विनोद हागरे, केशव शेडगे, संतोष बनसोडे, युवानेते राज जाधव, आबा आलदर, शिवसेना अध्यक्ष दादा सातव, राजकुमार चौगुले, रणजीत जाधव, लक्ष्मण खताळ, अक्षय जाधव, किर कांबळे, निलेश भगत,पप्पू भगत, सोमनाथ काटे, निकम, काळे, धोडीराम जळखुटे, दत्तात्रय जळखुटे, माधव शेडगे, काशीनाथ, विक्रांत लबटकर, अमित लबटकर, शामराव चौगुले, अशुतोष सातव, अमोल भडारे, बालाजी बाबर, उमेश भगत आदींनी परिश्रम घेतले.

# पंढरपूर कॉरिडोरबाबत बचाव समितीतर्फे आज मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १३ जून-**

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीच्या वतीने विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातील बाधितांचा पंढरपूर कॉरिडॉरला विरोध आहे की पाठिंबा आहे. जनतेचे काय मत आहे हे जाणून घेण्यासाठी शनिवारी ता.१४ जून रोजी गुप्त मतदान पद्धतीने कौल घेण्यात येणार असल्याची माहिती पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष अभयसिंह कुलकर्णी (इचगावकर) यांनी दिली. दरम्यान प्रशासनाचा खोटारडेपणा उघड करण्यासाठी आयोजिण्यात मतदानाविरुध्द प्रशासन नेमकी काय भूमि का घेतेय याकडे पंढरपूर शहरवासियांचे लक्ष लागले आहे. तसेच हा चर्चेचा विषय बनला आहे.

अध्यक्ष कुलकर्णी यांनी सांगितले की, शासनातर्फे नुकताच कॉरिडोरमध्ये बाधित होणाऱ्या संभाव्य बाधितांचा सर्व्हे केला गेला. त्या वेळेला बहुतांशी नागरिकांनी आपला विरोध दर्शविला होता. तरीसुद्धा शासनाकडून बाधित सकारात्मक आहेत असे चित्र निर्माण केले होते. त्यावेळेला जिल्हाधिकारी खोटे बोलत होते. असे वृत्तपत्रे आणि वाहिन्यांना दिलेल्या म लखतीच्या बातम्यांवरून वाटत होते. आता जिल्ह्याचे पालकमंत्री देखील व्यापारी आमच्या पाठीशी आहेत असं खोटे बोलत आहेत. त्यामुळे या प्रश्नाचा निश्चित उलगडा करण्यासाठी म्हणून बचाव समितीच्यावतीने हे चाचणी पद्धतीने मतदान घेतले जाणार आहे. खरंतर हे मतदान शासनाने घ्यावे अशी आम्ही मागणी केलेली होती परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. म्हणून ही मतदान प्रक्रिया आम्ही राबवत आहोत. जे लोक कॉरिडारचे संभाव्य बाधित आहेत, त्यांनी आपण कशा पद्धतीने बाधित आहोत, हे दर्शवणारे काही कागदपत्राचे प्रती घेऊन ठरलेल्या दिवशी त्या वेळेमध्ये मतदान ठिकाणी यावे. त्याला मतपत्रिका दिली जाईल व ती मतपत्रिका तो मतपेटीम ध्ये टाकेल अशा पद्धतीच्या हा मतदान कार्यक्रम राबवण्यात येणार आहे.



#### मतपत्रिकेवर अशा प्रकारचा असणार मजकूर

दरम्यान कॉरिडोर भागातील जे संभाव्य बाधित आहेत त्यांनी मग भले ते कारिडार विरोधी असू द्यात अगर पाठिंबा देणारे असू द्यात, आगर त्यांचे काहीही मत नसू द्यात हे तीन पर्याय मतपत्रिकेवर देण्यात आलेले आहेत. या तीन पर्यायांपैकी एक पर्याय निवडण्याची संभाव्य बाधित मतदारांना संधी दिली आहे. तरी संभाव्य कॉरिडोर बाधितांनी आपला पर्याय नोंदवावा, मतदान करावे अशी देखील विनंती तीर्थक्षेत्र बचाव समितीचे अध्यक्ष कुलकर्णी यांनी केलेली आहे.

#### प्रशासनाच्या भूमिकेकडे लागले लक्ष

जिल्हा प्रशासनाने दाखविलेल्या कॉरिडोर आराखड्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी जिल्हा प्रशासनास 'गो अहेड' असे सांगितले होते. त्यानंतर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संभाव्य कॉरिडोरबाधित नागरिकांची बैठक घेऊन त्यांच्याशी संवाद साधला. कॉरिडोर बाधितांना चांगले पॅकेज देण्यासाठी खास सर्व्हे देखील करुन घेतला. मात्र जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्री कॉरिडोरला नागरिकांचा मोठा पाठिंबा आहे असे खोटे सांगत आहेत. त्याम ुळे हा खोटेपणा उघड करण्यासाठीच आम्ही मतदान प्रक्रिया राबवित असल्याचे बचाव समितीकडून स्पष्ट करण्यात आलेले आहे. मतदान घेणे हा जिल्हा प्रशासनाचा अधिकार आहे. विधानसभा निवडणूकीनंतर माळशिरस तालुक्यात घेण्यात आलेल्या प्रारुप मतदानाला प्रशासनाकडून मोठा विरोध करण्यात आला होता. त्यामुळे जिल्हा प्रशासन पंढरपूरातील कॉरिडोर बाधितांच्या आयोजिण्यात आलेल्या म तदान प्रक्रियेबाबत नेमकी काय भूमिका घेते याकडे आता तमाम पंढरपूरवासियांचे लक्ष लागले आहे.

#### बचाव समितीची नूतन कार्यकारणी

पंढरपूर तीर्थक्षेत्र बचाव समितीची नुकतीच बैठक होऊन कार्यकारिणी निवडण्यात आली. अभयसिंह इचगावकर (अध्यक्ष). माऊली महाराज गुरव, ऋषिकेश उत्पात आणि आदित्य फत्तेपूरकर (उपाध्यक्ष). बाबाराव महाजन, व्यंकटेश गलगलकर, ॲड. विनायक उंडाळे (कार्यवाह). श्रीकांत हरिदास (पुरुष संघटक) आणि डॉ. प्राजक्ता बेणारे ( महिला संघटक). गणेश लंके (कोषाध्यक्ष). महेश खिस्ते व रामकृष्ण महाराज वीर (प्रवक्ते). निलेश महाजन बडवे व मयूर पिंपळनेरकर ( तज्ज्ञ सदस्य ) तर सदस्य म्हणून कौस्तुभ गुंडेवार, गजानन भिंगे, माधव कौलगी, राज येवनकर, अनिल गवळी, श्रीपाद मामेडवार, मोहन मंगळवेढेकर, सारंग बडोदकर, वैभव रणदिवे यांची निवड करण्यात आलेली आहे. स्वागत विवेक बेणारे व संचालन गणेश लंके यांनी केले.

#### आज या ठिकणी होणार मतदान

येत्या शनिवार दिनांक १४ जून २०२५ रोजी सकाळी दहा वाजलेपासून दुपारी तीन वाजेपर्यंत घ.न.१९९९ हिंदूमहसभा भवन, नामदेव पायरी जवळ महाद्वार पंढरपूर येथे मतदान प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या मतदानासाठी जास्तीत जास्त कॉरिडोर बाधित नागरिकांनी सहभागी व्हावे असे देखील बचाव समितीच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे.

## प्रहारच्यावतीने शेतकरी कर्जमाफीसाठी आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जून-**

बच्चु भाऊ कडु हे अमरावती मोझरी गुरुकुंज या ठिकाणी शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे, दिव्यांगांना व विधवा महिलांसाठी ६ हजार रुपये म ानधन देण्यात यावे या मागण्यांसाठी ७ दिवसापासून बेमुदत अन्नत्याग आंदोलनास हजारो शेतकऱ्यांसोबत बसले आहेत . याची त्वरीत दखल शासनाने घ्यावी या मागणीसाठी ठिय्या आंदोलन करून तहसिलदार विनायक मगर यांना अमर शिरसट यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

या आंदोलनाची दखल त्वरित घ्यावी यासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रहारच्या वतीने विविध आंदोलने केली जात आहेत. अक्कलकोट येथेही प्रहारच्या वतीने समर्थनार्थ अक्कलकोट तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले प्रहार सैनिकांच्या तीव्र भावना तहसीलदार मगर यांच्या मार्फत पत्राद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना त्वरीत कळवण्यात याव्यात अशी मागणी केली. यावेळी प्रहारचे पदाधिकारी अनेक कार्यकर्ते निराधार महिला, विधवा महिला उपस्थित होते.




#### सध्याचे आंदोलन हे सांविधानिक पद्धतीने केले आहे

लवकरात लवकर सरकारने बच्चु कडुंच्या मागण्या मान्य न केल्यास येत्या दोन दिवसांत अक्कलकोट सोलापूर हायवे चक्का जाम करणार असल्याचे प्रहारचे तालुकाध्यक्ष अमर शिरसाट यांनी सांगितले.

### उमरड येथे आज ऊस पीक चर्चासत्र

**करमाळा दि.१३ जून-**

उमरड (ता. करमाळा) येथे बारामती ॲग्रो व कृषी विज्ञान केंद्र बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने ऊस पीक चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. शनिवार दि. १४ जून रोजी दुपारी ३ वाजता हनुमान मंदिर उमरड येथे हे चर्चासत्र होणार आहे. यात ऊस पीक तज्ञ मार्गदर्शकासह बारामती ॲग्रो चे प्रमुख मा.राजेंद्र (दादा ) पवार हे शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्यासोबत बारामती ॲग्रोचे व्हाईसचेअरमन सुभाष (आबा ) गुळवे उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रात आर्टिफिशील इंटलेजस ( ए आय ) मशीनचा वापर तसेच ठिबक सिंचन विषय असतील. चर्चा सत्रासाठी पंचक्रोशीतील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मोहोळ ग्रामीण रुणालयात बी.पी. मोजमाप आधुनिक मशीन दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.१३ जून-**

उच्चतम कंपनीची बी. पी. तपासणीची मशिन महाराष्ट्र शासनां मार्फत ग्रामीण रुग्णालय मोहोळ येथे रुग्णांचे बी. पी. तपासणीच्या सेवेस दाखल झाली आसल्यांची माहिती वैद्यकीय अधिक्षक डॉ. रागिणी पवार यांनी दिली.

ग्रामीण रुग्णालय मोहोळ येथे बाह्य रुग्ण व अंतर रुग्णाची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. रुग्णांचा बी. पी. तपासणी करिता पुर्वी जुन्या व छोटया मशिन क्युप्रेशरने बराच विलंब लागत असत शिवाय काही अंशी बी.पी. चे प्रमाण ही कमी अथवा जास्त दाखवत असत. जुन्या मशिनच्या ठिकाणी इलेक्ट्रीक उच्च तम प्रतीच्या महागड्या किंमतीच्या म शिन ग्रामीण रुग्णालयात रुग्णांच्या आरोग्य तपासणीसाठी दाखल केल्यामुळे रुग्णांद्वारे समाधान व्यक्त केले जात आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वैद्यकीय मदत कक्षाच्या सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष प्रीती घाडगे यांनी या आधुनिक विकसित इलेक्ट्रॉनिक मशिनद्वारे बी. पी. तपासणी करुन घेतली या नवीन विकसित बी. पी. मशिनच्या सहाय्याने आरोग्याच्या दृष्टीने रुग्णांना अचूक माहिती प्राप्त होणार आहे ही मशिन रुग्णांना सर्वाधिक फायदेशीर राहील तेव्हा रुग्णांनी उपलब्ध मशिनचा लाभ घ्यावा, असेही ते म्हणाले. बालाजी गवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. अभिषक गायकवाड, प्रियंका द्विवेदी, दत्तात्रय कुलकर्णी, शशिकांत बोडके यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## अन्नछत्र मंडळातर्फे आज वृक्षारोपण

#### सुवासिक व शोभिवंत रोपांची होणार लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १३ जून-**

वसुंधरा बचाव अभियाना अंतर्गत श्रीस्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्यावतीने सुवासिक व शोभीवंत शंभर झाडांचे वृक्षारोपण व टीगार्डसह संवर्धन कार्य करण्यात येत आहे. त्याचा शुभारंभ शनिवारी दि.१४ जून रोजी सकाळी अकरा वाजता फत्तेसिंह क्रिडागणावर आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते होणार असल्याचे साचिव शाम मारे व उपाध्यक्ष अभय खोबरे यांनी सांगितले.


मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व मुख्य कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या पुढाकाराने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. या वृक्षारोपण संवर्धन कार्यक्रमाच्या तयारीची पाहणी नुकतीच करण्यात आली.

या वृक्षारोपण संवर्धन मोहिमेत नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, पोनि. राजेंद्र टाकणे, मुख्याधिकारी रम ाकांत डाके, रोहित खोबरे, सौरभ मोरे, मॉर्निंग व सुप्रभात ग्रुपचे सर्व पदाधिकारी व सदस्य, अमोलराजे भोसले मित्र मंडळ व लेझीम संघाचे कार्यकर्ते सहभागी होणार आहेत. पर्यावरण संतुलनासाठी वसुंधरा बचावासाठी साऱ्यांनी वृक्षारोण संवर्धन कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांनी केले आहे.

## उदय कीर्ती बँकेचे लऊळ येथे सोमवारी उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. १३ जून-**

उदय कीर्ती अर्बन को-ऑप क्रेडिट सोसायटीच्या लऊळ येथील नव्या शाखेचे उद्घाटन सोमवार, (दि. १६) रोजी मोहोळ विधानसभा मतदारसंघाचे माजी आम दार यशवंत माने यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती बँकेचे चेअरमन व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे नेते उदय माने यांनी पत्रकार परिषदेत दिली.



या उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी रयत क्रांती संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रा. सुहास पाटील असतील. या प्रसंगी श्री संत शिरोमणी सावता म हाराजांचे वंशज रमेश महाराज वसेकर, दत्त महाराज उपासक संतोष महाराज देवकर, सरपंच पवन भोंग, माजी उपसभापती प्रतापराव नलवडे, माजी सरपंच प्रियांका कांबळे, गोरख माळी, कापड उद्योजक बंडू नलवडे, माजी पंचायत समिती सदस्य प्रभाकर भोंग, मुख्याध्यापक मोहन नलवडे, बापू लोकरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. लऊळ येथे सुरू होणारी ही उदय कीर्ती सोसायटीची पहिली शाखा असून संस्थेचे एकूण २ हजार ८९९ सभासद आहेत. संस्थेचा मिश्र व्यवसाय ९ कोटी रुपये, तर भाग भांडवल ८१ लाख रुपये आहे. आत्तापर्यंत ६.५० कोटी रुपयांच्या ठेवी, तसेच २.५० कोटी रुपयांपर्यंत कर्जवाटप करण्यात आले आहे, अशी माहिती व्हाईस चेअरमन आकाश उदय माने यांनी दिली.

## मंगळवेढ्याच्या न्यायाधीशपदी एम. एस. माळी रूजू

#### तुळशीच्या रोपांची केली लागवड

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.१३ जून-**

मंगळवेढा येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयातील न्यायाधीश एस.एन.गंगवाल-शाह यांची प्रशासकीय बदली कर्जत (जि. रायगड) येथे झाली असून मंगळवेढा येथे नव्याने न्यायाधीश एम.एस.माळी यांची नियुक्ती झाल्याने त्यांनी आपल्या पदाचा कार्यभार स्विकारला आहे.

न्यायाधीश एस.एन.गंगवाल-शाह यांनी त्यांच्या कारकिर्दीत अवैध वाळू उपसा करणाऱ्या दोघा वाळू तस्करांना शिक्षा लावली होती. या शिक्षेमुळे वाळू तस्करामध्ये खळबळ उडून वाळू चोरीला लगाम बसला होता. त्यांची नुकतीच कर्जत येथे बदली झाल्याने त्यांना नुकताच निरोप देण्यात आला. दरम्यान त्यांच्या जागेवर न्यायाधीश एम.एस.माळी या पुणे येथून दाखल झाल्या असून त्यांनी आपला पदभार स्विकारला आहे. मंगळवेढा न्यायालयात दोन महिला न्यायाधीश झाल्याने महिला वर्गातून समाधान व्यक्त होत आहे. न्यायालय परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा मानस त्यांनी व्यक्त करुन तुळशीची २५ रोपे लावली आहेत. परिणामी यामुळे ऑक्सीजन मोठ्या प्रमाणात मिळणार आहे.

# रखडलेल्या विकासकामांना गती द्या

#### दिशा समितीच्या बैठकीत खा. प्रणिती शिंदे यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

केंद्र सरकारच्या जनकल्याणाच्या योजना राबविण्यासाठी खासदार आमदारांचे नियंत्रण असलेल्या दिशा समितीची बैठक नियोजन भवन सोलापूर येथे दिशा समितीचे अध्यक्ष खासदार प्रणिती शिंदे व सहअध्यक्ष खासदार ओमराजे निंबाळकर, सहअध्यक्ष खासदार धैर्यशील मोहिते-पाटील, तसेच सदस्य आ. सुभाष देशमुख, सदस्य आमदार अभिजीत पाटील तसेच सदस्य सचिव जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद व जिल्ह्यातील विविध खात्याच्या प्रमुखांच्या उपस्थितीत संपन्न झाली.

यामध्ये जिल्ह्यातील नॅशनल बँक व प्रायव्हेट बँका शेतकऱ्यांना देताना त्यांचे सिबिल पाहून प्रकरण रद्द करू नये ही अट रद्द करण्यात आलेली आहे. प्रत्येक बँकेच्या शाखेकडे कोणत्या गावाचे पीक कर्जसाठीचे किती अर्ज आले आहेत याची यादी तसेच या यादी पैकी किती जणांचे प्रकरण मंजूर केले व किती जणांचे नामंजूर कोणत्या कारणामुळे केली या संपूर्ण बाबीचा तपशील जिल्ह्यातील सर्व खासदारांना व आमदारांना द्यावा, असे आदेश देण्यात आले.




ज्या शेतकऱ्यांच्या वर्ग दोन च्या जमिनी आहेत त्यांना पीक कर्ज नाकारल्याचे भरपूर प्रकरण समोर आले आहेत. शेतकऱ्याची वर्ग दोन ची जमीन जरी असेल तरी त्यांना पीक कर्ज द्यायला पाहिजे असे शासनाचे आदेश असताना बँक मॅनेजर मनमानी करतात ते थांबवण्याच्या सक्तीचे सूचना या बैठकीत देण्यात आल्या. पिक विमा देत असताना लहान शेतकरी व मोठे शेतकरी हे कोणत्या आधारावर ठरवले जाते बँकांनी असा भेदभाव न करता सर्व शेतकऱ्यांना लागणारे पीक कर्ज मंजूर करावे, ज्या बँकेकडे गाव दत्तक आहे, त्या बँका तेथील दोन-चार नागरिक डिफॉल्ट असल्याने पूर्ण गावातील नागरिकांना कर्ज देण्यास नाकारतात अशा बँकांवर जिल्हाधिकारी महोदयाने तात्काळ कारवाई करावी अश्या प्रकरणाचे पुष्टी झाल्यास अधिकाऱ्यांनी संबंधित बँकेच्या शाखा प्रबंधक वर गुन्हा नोंद करावा. यासह घरकुल ज्या जागी आहेत त्यांना नियमित करा, सोलापूर शहरातील ज्या ठिकाणी पिण्याच्या पाईपलाईन मध्ये देण्याचे पाणी मिस होते किंवा इतर कारणामुळे दूषित पाणीपुरवठा होत आहे अशा ठिकाणी वॉशआउट घेण्याचे ठरले होते याबद्दल काय कारवाई झाली आहे. स्मार्ट सिटी माध्यमातून व एनटीपीसीच्या अनुदानातून समांतर जलवाहिनी प्रकल्प पूर्ण झाला, असे सांगण्यात येते प्रत्यक्षात त्याची चाचणी होऊन सोलापूर शहरवासी यांना त्याद्वारे पाणीपुरवठा कधी होणार असा प्रश्न दिशा समितीचे अध्यक्ष खासदार प्रणिती शिंदे यांनी उपस्थित केला. यावर मनपा आयुक्त डॉक्टर सचिन ओंबासे यांनी पाकणी पर्यंतची पूर्ण झाली असून उद्या सोरेगाव यांची चाचणी पूर्ण होणार आहे ती पूर्ण झाल्यावर त्यात कोणतेही त्रुटी न आढळल्यास १५ ते २० दिवसात या समांतर जल वाहिनी द्वारे सोलापूरवासियांना पिण्याचा पाण्याचा पुरवठा करण्यात येणार आहे.

यासह जगजीवनराम झोपडपट्टीसारखे घरकूल योजना करावी, ग्रामीण भागातील पिण्याचे पाणीपुरवठा, जलजीवन मिशन, ग्रामीण आरोग्य सेवा, सिव्हिल हॉस्पिटल, ग्रामीण भागातील शाळांची दुरुस्ती, गणवेश, बांधकाम कामगार योजनेत भ्रष्टाचार, वाखरी येथील रस्ता, पालखी तळ, पालखी मार्ग, स्मार्ट सिटी, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न, महावितरण, आरोग्य, स्वच्छता आणि इतर विषयांचा आढावा घेण्यात आला..

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश उपाध्यक्षपदी बळीरामकाका साठे

**उत्तर सोलापूर, दि. १३ जून-**

गेली साठ वर्षांपासून देशाचे नेते पद्मविभूषण खासदार शरद पवार यांच्यावर निष्ठा ठेवून त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेले जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते बळीरामकाका साठे यांची राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार जयंत पाटील यांनी काका साठे यांना नियुक्तीपत्र दिले आहे. गेली साठ वर्षांपासून काका साठे हे खा.शरद पवार यांच्या एकमुखी नेतृत्वाखाली राजकारणात सक्रिय आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस निर्मितीच्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीच्यावेळी जिल्ह्यातील दिग्गज नेतेमंडळींनी खा. शरद पवार यांच्या पक्षाकडे पाठ फिरवली होती. त्यावेळी काका साठे यांनी पक्षाचे नेतृत्व केले. एक पक्षाचे व एक आघाडीचे असे दोन खासदार, तीन आमदार निवडून आणण्यात त्यांचे योगदान आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस निर्मितीच्या वेळी त्यांना काँग्रेसमध्ये राहण्यासाठी माजी मंत्री कै. दीनानाथ कमळे गुरुजी यांनी ऑफर दिली होती. मात्र पवार निष्ठेपुढे कोणतेही पद गौण असल्याचे सांगून त्यांनी पवार यांच्या सोबतच राहणे पसंद केले. पंधरा दिवसांपूर्वी साठे यांची तब्येत अचानक ढासळली होती. मात्र दवाखान्यातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर विश्रांती न घेता पक्ष कार्यासाठी ते सक्रिय झाले.



## महत्वाचे...

### पालखीसाठी वीज दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात : शाखा अभियंता एस.एस. डोळे

**माळशिरस,दि.१३ जून-**

श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा १ जुलै रोजी माळशिरस मुक्कामी येत असून पालखी सोहळ्यात वीज पुरवठा खंडित होऊ नये यासाठी देखभाल दुरुस्तीची कामे सुरु असून अंतिम टप्प्यात आली असल्याची माहिती महावितरणचे शाखा अभियंता एस. एस. डोळे यांनी दिली. माळशिरस शहर व परिसरात टँकरमध्ये पिण्याचे पाणी भरण्याचे स्त्रोत आहेत त्या ठिकाणचे सर्व रोहित्र व बॉक्स व केबल यांचे मेंटेनन्स करण्यात आले आहे. तसेच शहरात पाणी पुरवण्याच्या ठिकाणचे रोहित्रचे मेंटेनन्स करण्यात आले आहे. ३३ केव्ही वाहिनी, ११ केव्ही वाहिनी, गावठाण वाहिनी, अर्बन वाहिनी यांचे मेंटेनन्स चालू आहे. सुरेक्षेच्या दृष्टीने लूज गाळे ओढून घेण्याचे कामी सुरु आहे. सर्व वाहिन्यावरील तारा मध्ये आलेली झाडे झुडपे तोडण्यात आली आहेत,पालखी ठिकाण व शहरातील रोहीत्राचे मेंटेनन्स करण्यात आले आहे.सर्व पाणी भरण्याच्या ठिकाणी,पालखीच्या मुक्काम ठिकाणी व सर्व शहरातील रोहीत्रांच्या ठिकाणी कर्मचारी नेमण्यात आले आहेत. पालखी सोहळ्यात वीज पुरवठा खंडित होणार नाही याची काळजी घेण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.





### कौठाळी आरोग्य उपकेंद्र इमारतीसाठी निधी द्यावा; स्वाभिमानीची मागणी

**पंढरपूर, दि.१३ जून-**

तालुक्यातील मौजे कौठाळी येथे प्राथमिक आरोग्य उपकेंद्र मंजूर करून इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन द्यावा ह्या मागणीचे निवेदन राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांना प्रत्यक्ष भेटून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष सचिन आटकळे यांनी निवेदन देऊन मागणी केली. कौठाळी गावची लोकसंख्या सुमारे ५ हजार २३० एवढी मोठी असून या गावात आरोग्य उपकेंद्र नसून रुग्णांची सतत गैरसोय होत आहे, लोकसंख्या जास्त असल्याने रुग्णांची संख्या ही जास्त प्रमाणात आहे, शिवाय गावात आरोग्य सेवक व आरोग्य सेविका उपलब्ध असतात परंतु पेशंटला बसायला जागा नसून सध्या दवाखाना हा विकास सेवा सोसायटी च्या ऑफीस मध्ये सुरू असून ,तिथे डॉक्टरची व रुग्णांची गैरसोय होत आहे. कौठाळी हे गाव भीमा नदीच्या काठावर वसलेले असून वारंवार या गावाला महापुराचा धोका असतो,याच काळात साथीचे रोग वगैरे पसरतात,मात्र अनेक वेळा आरोग्य विभागाला ग्रामपंचायतीच्या माध्यमातून ठराव मंजूर करून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविण्यात आले असून,या बाबत आमच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे, तरी आपण प्राधान्याने लक्ष घालून कौठाळी गावाला प्राथमिक उपकेंद्र मंजूर करून इमारतीसाठी निधी मंजूर करून द्यावा, या मागणीसाठी निवेदन देण्यात आले.

### काँग्रेसच्या अक्कलकोट तालुकाध्यक्षपदी मल्लिकार्जुन पाटील

**पंढरपूर, दि.१३ जून-**

काँग्रेस पक्षाचे अक्कलकोट तालुका अध्यक्षपदी युवा नेता मल्लिकार्जुन पाटील यांची प्रदेश अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निवड जाहीर केले. या निवडीमुळे शहर व तालुक्यात ठिकठिकाणी कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला. शंकर म्हेत्रे यांनी काँग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर बरेच दिवस तालुका अध्यक्षपद रिक्त होते. या जागी अक्कलकोटचे माजी आमदार कै.महादेव पाटील यांचे चिरंजीव माजी सभापती युवा नेता मल्लिकार्जुन पाटील यांची अक्कलकोट तालुका काँग्रेसचे अध्यक्षपदी निवड करण्यात आली. ही निवड देशाचे नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे व खासदार प्रणिती शिंदे यांच्या शिफारशीने प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी ही निवड जाहीर केली आहे. या निवडीबद्दल सोलापूर जिल्हा काँग्रेसचे निरिक्षक मोहन जोशी, सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष ॲड. नंदकुमार पवार यांनी त्यांचे अभिनंदन केले. काँग्रेस पक्ष अक्कलकोट तालुक्यात मजबूत होणे ही काळाची गरज बनली आहे. यासाठी जिद्द आणि चिकटीने प्रयत्न करून तालुक्यात काँग्रेस पक्षाला पुनर्व वैभव प्राप्त करून देण्यासाठी आहोरात्र झटणार आहे, असे प्रतिपादन मल्लिकार्जुन पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.



### भांतबरेतील औषध प्राशन केलेल्या विवाहितेचा मृत्यू

**सोलापूर, दि.१३ जून-**

अज्ञात कारणातून कोणतेतरी औषध प्राशन केलेल्या विवाहितेचा मृत्यू झाला. बुधवारी रात्री अकराच्या सुमारास विवाहितेने बार्शी तालुक्यातील तांबेवाडी भांतबरे येथील राहत्या घरात औषध प्राशन केले होते. विद्या ज्योतीराम पवार (वय २७) असे विवाहितेचे नाव आहे. बुधवारी रात्री अकराच्या सुमारास विद्या या विवाहितेने औषध प्राशन केल्यानंतर तिला धाराशिव येथील रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. तेथून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. उपचार सुरु असताना तिचा शुक्रवारी मृत्यू झाला. या घटनेची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## कुरनूर धरण शंभर टक्केच्या दिशेने

**• बोरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१३ जून-**

संपूर्ण अक्कलकोट तालुक्यासाठी वरदायिनी ठरलेले कुरनूर धरणामध्ये जून महिन्यामध्ये पहिल्यांदा पाणीसाठा ८६.१९ टक्के इतका झाला असून सद्य स्थितीमध्ये सलग पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे केव्हाही धरण १०० टक्के भरू शकते. यामुळे मोठ्या प्रमाणात धरणातून पाणी खाली सोडावे लागत असल्याने धरणाखालील बोरी नदीच्या दोन्ही तीरावरील गावातील लोकांना प्रशासनकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कुरनूर धरण मध्यम प्रकल्प पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्याने पाणीसाठा झपाटाने वाढ होऊन धरणामध्ये आज अखेर ८६.१९ टक्के इतका पाणी साठा आहे. सद्यस्थितीमध्ये सलग पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे धरण कधीही १०० टक्के भरते. यामुळे पूर नियंत्रणासाठी धरणाच्या वक्राकार द्वारामधून केव्हाही मोठ्या प्रमाणात पाणी धरण्याचा खाली सोडावे लागते. त्या अनुषंगाने धरणाखालील बोरी नदीच्या दोन्ही तीरांवरील गावातील लोकांना आपल्या स्तरावरून सतर्कतेचा इशारा देण्याबाबत अककलकोट तहसीलदार यांना शाखा अभियंता बोरी पाटबंधारे शाखा अक्कलकोट कडून कळविण्यात आले आहे. गेल्या महिन्यापासून सुरू असलेल्या पावसाने हे सकारात्मक चित्र तालुकावासीयांना अनुभवास येत आहे. कुरनूर धरणाच्या आजवरच्या इतिहासात जून महिन्यात धरण शंभर टक्के भरण्याची ही पहिलीच सुखद वेळ आहे. बोरी व हरणा नदीच्या संगमावर कुरनूर धरणाची उभारणी केली आहे. सद्यस्थितीत मराठवाड्यात सुरू असलेल्या जोरदार पावसामुळे बोरी नदीतून पाण्याचा मोठा प्रवाह कुरनूर धरणात येऊन मिसळत आहे. कुरनूर धरण भरण्यासाठी दरवर्षी देवाकडे शेतकरी प्रार्थना करत असे. आजवर परतीच्या पावसावरच धरण कमी-जास्त प्रमाणात भरत आले आहे. मात्र यंदाच्या वर्षी जून माहीन्यात निसर्ग देवतेच्या कृपेने कुरनूर धरण ८६.१९ टक्के भरले आहे, असे इतिहासात पहिल्यांदाच घडत आहे.



### मोटारी काढण्यासाठी नदी काठच्या शेतकऱ्यांची लगबग

कुरनूर धरणात मोठ्या प्रमाणात पाणी येण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे धरणात पाण्याची लक्षणीय वाढ झाल्याने केव्हाही धरणातून पाणी खाली सोडण्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे नदी काठावरील गावातील लोकांना प्रशासनकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. यामुळे नदीकाठच्या शेतकऱ्यांनी आपापल्या पाणबुडी मोटारी काढण्यासाठी लगबग सुरू केली आहे. धरणामध्ये आज अखेर ८६.१९ टक्के इतका पाणी साठा आहे. सद्यस्थितीमध्ये सलग पाऊस पडण्याची शक्यता असल्यामुळे धरण कधीही १०० टक्के भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे धरणातून पाणी सोडल्यास नदीकाठच्या शेतातून पाणी घुसण्याची शक्यता लक्षात घेऊन सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## अक्कलकोटमधील विश्वास नगरात सहा लाखांची घरफोडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १३ जून -**

अक्कलकोट येथील जेऊर रोडवर असलेल्या विश्वास नगरातील बंद घर फोडून चोरट्याने १० तोळ्याचे सोन्याचे दागिने व रोख २ लाख रुपये असा ६ लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला.

याबाबत राजू शेऊ राठोड (वय ३६, रा. विश्वास नगर, अक्कलकोट) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राजू राठोड ८ जून रोजी रात्री घराला कुलूप लावून परगावी गेले होते. ते परत ११ जून रोजी घरी आले. त्यावेळी त्यांना घरामध्ये चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्याने राठोड यांच्या बंद घराचा कडी कोयंडा कुलूप तोडून घरातील लोखंडी कपाट तोडून कपाटातील सोन्याचे दागिने व रोख २ लाख रुपये चोरून नेले. चोरट्याने राठोड यांच्या घरातून प्रत्येकी दोन तोळ्याच्या २ हातातील सोन्याच्या पाटल्या, अडीच तोळ्याचे सोन्याचे गंठण, एक तोळ्याचे नेकलेस, सोन्याची कर्णफुले, सोन्याच्या पिळ्याच्या अंगठ्या, लॉकेट असे १० तोळे २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेल्याची नोंद अक्कलकोट उत्तर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहायक पोलिस निरीक्षक बागव पुढील तपास करीत आहेत.

## घरगुती वादातून लाकडाने पत्नीने पतीला बदडले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून -**

पती पत्नीत कौटुंबिक कारणातून झालेल्या वादानंतर पत्नीने पतीला लाकडाने बेदम मारहाण केली. हा प्रकार १२ जून रोजी रात्री आठच्या सुमारास मंगळवेढा तालुक्यातील मिरी गावात घडला.समाधान शशीकांत भोई (वय ३३) असे मारहाण झालेल्या पतीचे नाव आहे. १२ जून रोजी समाधान आणि त्याची पत्नी या दोघांत कौटुंबिक कारणातून वाद झाला. यानंतर संतापलेल्या पत्नीने घरातील लाकाडने त्याला समाधान यास चांगलेच बदडले. यात डोक्याला जखम झाल्याने मध्यरात्री २.१५ वाजता रुग्णवाहिकेतून त्याला शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## ▸▸बार्शी तालुका पोलीस ठाणे नवीन इमारतीत

## स्थलांतरामुळे ग्रामीण नागरिकांची गैरसोय दूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १३ जून-**

सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुका पोलीस ठाणे आता नवीन इमारतीत स्थलांतरित झाले आहे. हे पोलीस ठाणे आता महात्मा फुले चौक, कोर्टाच्या मागे, उपळाई रोड, बार्शी येथे कार्यरत झाले आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाच्या अंतर्गत येणारे हे ठाणे पूर्वी बायपास रोडवर होते, ज्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना येण्या-जाण्यासाठी मोठी गैरसोय सहन करावी लागत होती.

नवीन ठिकाणी स्थलांतरामुळे नागरिकांच्या सोयी वाढल्या असून पोलीस प्रशासनाची कार्यक्षमता आणखी प्रभावी होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. नवीन इमारतीत आधुनिक सुविधांसह पोलीस ठाणे कार्यरत झाले असून, यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना तक्रारी नोंदवणे, मदत मिळवणे आणि अन्य पोलीस सेवा सहज उपलब्ध होणार आहेत. यापूर्वी बायपास रोडवरील ठिकाणामुळे ग्रामीण भागातील लोकांना लांबचा प्रवास करावा लागत होता, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि खर्च वाढत होता. आता महात्मा फुले चौकाजवळील नवीन जागेमुळे ही अडचण दूर झाली आहे. सोलापूर ग्रामीण पोलीस दलाने नागरिकांच्या सोयीसाठी आणि प्रशासकीय कामकाजाच्या सुधारणेसाठी हा निर्णय घेतला आहे. नवीन पोलीस ठाण्याचा संपर्क क्रमांक (०२१८४) २२३३३० आणि ९११२२२६३२६ असा आहे. या स्थलांतरामुळे पोलीस सेवांचा दर्जा सुधारेल आणि नागरिकांना जलद सेवा मिळेल, अशी अपेक्षा आहे.




## सोमवारी शाळा सुरु; शिक्षकांकडून स्वच्छता मोहीम

**मंद्रुप शाळेला आ.देशमुख देणार भेट**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १३ जून-**

सोमवार दि.१६ जून पासून शैक्षणिक वर्षाला सुरूवात होत आहे. त्यामुळे जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक शाळा, वर्ग खोल्या व परिसर स्वच्छतेच्या कामात मग्न असल्याचे दिसून आले. शुक्रवार व शनिवार दोन दिवस शाळांची स्वच्छता करण्यात येणार आहे. पहिल्या दिवशी मुलांना स्वच्छ परिसर व वातावरण अनुभवास यावा यासाठी शिक्षण विभागाकडून सूचना देण्यात आली आहे.

त्यानुसार शुक्रवारी जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक शाळांच्या स्वच्छते मोहिमेत सहभागी झाल्याचे दिसून आले. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा करण्यात येणार असल्याने व प्रवेशोत्सवासाठी लोकप्रतिनिधीसह अधिकारी उपस्थित राहणार असल्याने सर्व शाळांची स्वच्छता मोहीम युद्ध पातळीवर सुरू होती. यावेळी कचरा विल्हेवाटसह धान्यांचीही स्वच्छता केली.

### शिक्षणाधिकारी यांची मंद्रूप शाळेला भेट

जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी कादर शेख यांनी मंद्रुप येथील जिल्हा परीषद केंद्र शाळेला भेट देऊन स्वच्छतेची पाहणी केली. तसेच यावेळी मुलांना देण्यात येणाऱ्या पोषण आहारातील तांदूळ व इतर धान्याची तपासणी करून मुख्याध्यापक व शिक्षकांना सूचना दिल्या. यावेळी मुख्याद्यापक प्रकाश कुंभार व सुहासिनी शेंडे उपस्थित होते.

### आमदार देणार भेट

शाळेचा पहिला दिवस प्रवेशोत्सव म्हणून साजरा करण्यात येत असताना लोकप्रतिनिधी व अधिकारी यांची उपस्थिती असणार आहे. त्या अनुषंगाने मंद्रूप येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेला आमदार सुभाष देशमुख उपस्थित राहणार असल्याने शिक्षणाधिकारी यांनी भेट देऊन सूचना केली आहे. शाळा स्वच्छतेसाठी सर्व शिक्षकांची उपस्थिती होती.

**- कलप्पा हेळवी, केंद्रप्रमुख, मंद्रुप.**

## घरगुती वादातून महिलेने प्राशन केले औषध

**सोलापूर, दि. १३ जून -**

घरगुती कारणातून महिलेने कोणतेतरी औषध प्राशन केल्याने तिला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. हा प्रकार गुरुवारी रात्री ८ च्या सुमारास घडला. संगिता अनिल धोत्रे (वय ३६, रा. वडाळा ता. उ. सोलापूर) असे महिलेचे नाव आहे. गुरुवारी रात्री वडाळा येथील राहत्या घरात असताना, संगिता या महिलेचा घरगुती कारणातून वाद झाला. यानंतर झालेल्या मानसिक त्रासातून संगिता यांनी घरातील कोणतेतरी औषध प्राशन केले. यात त्रास होऊ लागल्याने रात्री ९ वाजता नातेवाईक अविनाश जाधव यांनी उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

## उमरडच्या शेतकऱ्यांनी स्वखर्चाने ओढ्यावर उभारला पूल

**▸▸आ. नारायण पाटील यांनी दिले सिमेंट पाईप**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १३ जून-**

उमरड (ता. करमाळा) येथील शेतकऱ्यांनी शासनाच्या पूल निर्मितीची वाट न पाहता स्वतः पुढाकार घेऊन पूल उभारला आहे. उमरड-विहाळ शिव रस्ता झाला. परंतु तेथे शासनाकडून पूल उभारला नाही. युवा शेतकऱ्यांनी आत्मनिर्भर होत शक्य तशी वर्गणी जमा केली ही माहिती आमदार नारायण पाटील यांना समजली त्यांनी तत्वतः या शेतकऱ्यांना सिमेंटचे पाईप दिले. ते पाईप घेऊन शेतकऱ्यांनी जेसीपीच्या सहाय्याने पाईप टाकून पूल उभारला आहे.

उमरड-विहाळ शिवरस्ता ओढ्यात येणाऱ्या पाण्यामुळे धोकादायक बनला होता. ओढ्याच्या पलीकडे राहणाऱ्या वस्त्यावरून अनेक शेतकरी,शालेय विद्यार्थी, दूध उत्पादक तसेच उमरड व विहाळकडे जाणारे प्रवाशी यांची होणारी गैरसोय तात्पुरती थांबली आहे. शासनाने या ओढ्यावर कायमस्वरूपी पूल उभारण्याची मागणी शेतकरी करताहेत.या पूल उभारणीत प्रदीप कोठावळे, परशुराम गायकवाड, शंतनू निंबाळकर, कानिफनाथ मारकड, गोवर्धन कोठावळे, बापू कोठावळे यांनी पुढाकार घेतला.



## ‘सहकार महर्षि’कडून प्रथम ॲडव्हान्स व अनुदान रक्कम बँकेत वर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.१३ जून-**

सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचे सिझन २०२४-२०२५ मध्ये दि.२७ डिसेंबर२०२४ अखेर गाळप झालेल्या ऊसास प्रती मे.टन २ हजार ६०० रूपये तसेच दि.२८ डिसेंबर २०२४ पासून पुढे गळीत हंगाम बंद होईपर्यंत गाळप झालेल्या ऊसास प्रती मे.टन २ हजार ८०० रूपये प्रथम ॲडव्हान्स रक्कम शासनाच्या धोरणानुसार ज्या-त्या पंधरवड्यामध्ये त्यांच्या बँक खातेवर वर्ग करणेत आली आहे.

गळीत हंगाम २०२४-२०२५ मध्ये गळीतास आलेल्या ज्या सभासद, बिगर सभासद, दिर्घमुदत करारदार यांना प्रथम ॲडव्हान्स रक्कम रु.२,६००/- दिला आहे त्यांना बैल पोळयासाठी प्रती मे.टन रक्कम रु.२००/- व दिपावली सणाकरीता रक्कम रु.१००/- आणि ज्यांना प्रती मे.टन रक्कम रु.२,८००/- प्रमाणे प्रथम ॲडव्हान्स रक्कम अदा करणेत आला आहे. त्यांना दिपावली सणाकरीता प्रती मे.टन रक्कम रु.१००/- तसेच दि.१/०२/२०२५ चे पुढे गळीतास आलेल्या ऊसास प्रती मे.टन रक्कम रु.१००/- इतके अनुदान द्यावयाचे धोरण ठरले आहे. तथापी, कारखाना कार्यक्षेत्रामध्ये मे महिन्यामध्ये पाऊस झाल्याने लागण हंगाम २०२५-२०२६ (गळीत हंगाम २०२६-२७) करीता सभासद शेतकरी यांना नवीन ऊस लागवड, जमीन मशागत व खते खरेदी करणेसाठी पैशाची निकड लक्षात घेता मा.संचालक मंडळाने दि.१५ नोव्हेंबर २०२४ ते दि.२७ डिसेंबर २०२४ या कालावधीमध्ये गळीतास आलेल्या ऊसास प्रति मे.टन रक्कम रु.२००/- प्रमाणे तसेच माहे-फेब्रुवारी २०२५ पासून पुढे गळीत झालेल्या ऊसास प्रति मे.टन रक्कम रु.१००/- इतकी अनुदान रक्कम दि.११ जून २०२५ रोजी यांचे बँक अकौंट वरती वर्ग करणेत आली असून दिपावली सणाकरीता प्रति मे.टन रक्कम रु.१००/- असा एकुण रक्कम रु.२,९००/- प्रति मे.टन ऊस दर देण्यात येणार असलेची माहिती चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी दिली.



कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांच्या नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर आहे. वाहतूक कंत्राटदार यांची संपुर्ण बिले दि.२२ मार्च २०२५ रोजी तसेच वाटखर्ची व डिपॉझीट रक्कम दि.२६ मे २०२५ रोजी बँक खातेवर वर्ग करण्यात आली आहे. गळीत हंगाम २०२५-२०२६ मधील वाहतूकीचे वाहन करार सुरू असून सदर हंगामामध्ये १० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दीष्ट ठेवले असल्याने सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी केले. व्हा. चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालिका स्वरुपाराणी मोहिते-पाटील, संचालक लक्ष्मण शिंदे, सतीश शेंडगे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार, रावसाहेब मगर, संग्रामसिंह जहागिरदार, रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, महादेव क्षिरसागर, भिमराव काळे, अमरदिप काळकुटे, गोविंद पवार, सुभाष कटके, जयदिप एकतपुरे, रामचंद्र ठवरे, तज्ञ संचालक, प्रकाशराव पाटील, रामचंद्रराव सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक - रणजित रणनवरे लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, कालीदास मिसाळ, दत्तात्रय चव्हाण, विनायक केचे, राजेंद्र भोसले, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके, हर्षाली निंबाळकर, श्रीमती पुष्पा महाडीक उपस्थित होते.